पुणें मराठी ग्रंथालय
नाटक
क्रमांक— ८६

# मला.



पुणें मराठी
व. क्रमांक नाटक
अनुक्रमांक

नाना०—अरेरे! अशा शुद्ध प्राण्याला शिष्टाचाराकरितां म्हणून थोडा वेळ कां होईना पण दुर्गुणांच्या हवेंत मी आपण होऊन नेत आहें. [अं. १ प्र. २ पृ. १२]

# कमला.

हें पुस्तक

रा. रा. यशवंत नारायण टिपनीस,

महाराष्ट्र नाटक मंडळींतील एक प्रसिद्ध नट

यांनीं लिहिलें

तें

रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं

पुणें येथें

८१८ सदाशिव पेठेंत

'चित्रशाळा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( आवृत्ति पहिली )

सन १९११.

किंमत ०|१२ आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या आक्टाप्रमाणें नोंदलें असून सर्व
हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

'कमला' हें नाटक माझे तरुण मित्र रा. रा. यशवंतराव टिपनीस, प्रसिद्ध 'महाराष्ट्र-नाटक' मंडळींतील प्रमुख नट, यांनीं लिहिलें आहे. **मेरी कॉरेली** या जगत्प्रसिद्ध विदुषीनें 'थेल्मा' नांवाची एक रसभरित कादंबरी लिहिली आहे, तिचें हें रूपांतर आहे. रा. रा. टिपनीस यांचा हा प्रथमच प्रयत्न आहे. या दृष्टीनें प्रस्तुतचें नाटक बरेंच चांगलें झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या नाटकावर प्रतिकूल व अनुकूल असे बरेच टीकात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत. या टीकात्मक लेखांची योग्यता वाचकांच्या आणि प्रेक्षकांच्या लक्षांत लवकर यावी, एतदर्थ या नाटकाचें संविधानक थोडक्यांत सांगतों.

राधाबाई या नांवाची श्रीमंत, सुंदर, पण स्वच्छंदी व मानी अशी एक स्त्री होती. बाबासाहेब हे तिचे पति होत. उभयतांसही अर्वाचीन तऱ्हेचें शिक्षण मिळालें होतें. बाबासाहेब स्वभावानें शांत, प्रेमळ, गंभीर, सुखभावी, सहनशील, स्वातंत्र्याचे खरे चाहाते व पितृधर्मदक्ष असे होते. यांची दिनचर्या बहुधा विद्याव्यासंगांत आणि आपल्या मुलाच्या शिक्षणामध्यें व्यापलेली असे. पण स्वच्छंदी राधाबाईला नटण्यामुरडण्याची अतिशय हौस असल्यामुळें व पतीकडून ही तिची हौस पूर्ण होत नसल्यामुळें तिची पतिनिष्ठा दिवसानुदिवस कमी होत गेली. तिचें मन तरुण व श्रीमंत नानासाहेब जहागिरदारांच्या सर्वांग-सुंदरतेनें व स्वातंत्र्यप्रिय आचारविचारांनीं ओढून घेतलें. त्यांच्या सौंदर्यावर तिचें प्रेम बसलें व अतिरिक्त प्रेमानें ती आंधळी झाली. नानासाहेबांचे दिव्य सद्गुण, त्यांची परमेश्वरी निष्ठा आणि त्यांचा प्रेमळ पण करारी स्वभाव या गोष्टी राधाबाईला दिसल्या नाहींत. भावी कालांतील स्वतंत्रतेच्या दीक्षेनें मंडित झालेल्या स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजांत नानासाहेब व राधाबाई यांच्या गांठी पुष्कळ वेळ पडल्या. त्यांचा परिणाम मात्र असा झाला कीं, राधाबाईची स्वच्छंदी वृत्ति अनावर झाली. आणि तिनें नानासाहेबांच्या सौजन्याची संधि घेऊन त्यांच्याशीं अयोग्य स्नेह करण्याचा प्रयत्न केला. हें राधाबाईचें अमर्याद वर्तन पाहून नानासाहेबांच्या शुद्ध मनाला स्त्रियांचा, संसाराचा, अर्वाचीन समाजाचा आणि जीवित्वाचा तिटकारा

येऊन ते वैतागले व तीर्थयात्रेला निघून गेले. फिरतां फिरतां ते बद्रिकाश्रमास गेले. तेथें कमला नामक एका तपस्वी कन्येची व त्यांची गांठ पडली. ही कुमारी शुद्ध व निर्व्याज प्रेमामध्यें शकुंतलेसारखी वाढलेली होती. हिची विद्या उच्च, संस्कृति उच्च, शिक्षण उच्च आणि आश्रमांतील परिस्थितिही उच्च प्रतीची होती. तसेंच, इचें सौंदर्यही अनुपम होतें. उभयतांच्या गांठी पुष्कळ वेळ पडल्या, उभयतांमध्यें शुद्ध, आणि निष्कपट प्रेम उत्पन्न झालें, कमलेच्या पित्याची या वृद्धिंगत होणाऱ्या प्रेमाला अनुमति मिळाली व ह्या प्रेमाच्या परिपाकांत उभयतांचें यथाविधि लग्न झालें आणि हें दंपत्य आपल्या शुद्ध वर्तनानें आपल्या स्वैर व कृत्रिम समाजास निराळें वर्तन द्यावें, असा संकल्प करून स्वनगरीं परत आलें. ही नानासाहेबांच्या लग्नाची वार्ता राधाबाईस समजली तेव्हां नानासाहेबांच्या शुद्ध प्रेमामृतपूर्ण संसारामध्यें विष कालविण्याचा तिचा संकल्प झाला. नानासाहेबांच्या अंतःकरणांतून कमलेवरील त्यांचें प्रेम बहिष्कृत केलें तर आपल्याला तेथें जागा मिळेल अशी तिची वेडी कल्पना होती. याच वेळीं तिनें आपल्या हाताशीं आनंदराव नांवाच्या एका उल्लू, लफंग्या, हलकट, सर्वव्यसनपरिपूर्ण, कर्जबाजारी इनामदाराशीं प्रेमकथा बोलण्यापुरता मात्र स्नेह धारिला होता. हा उल्लू पुरुष काय वाटेल तें करावयास मागेंपुढें पाहाणारा नव्हता. याची आणि कमलेची गांठ घालून द्यावी, आणि आपण नानासाहेबांची प्राप्ति करून घ्यावी, हा राधाबाईचा उद्देश होता. कर्म-धर्म-संयोगानें याच समयास ‘तारा’ या नांवाची एक उनाड बायको आपली नाटक मंडळी घेऊन त्या नगरांत आली होती. ही पराकाष्ठेची छचोर असे. दुर्गुणाममध्यें आनंदराव मोठा, किंवा ही ताराजी मोठी हें सांगतां येणें शक्य नाहीं. ही बाई गणपतराव नांवाच्या सद्गुणी पण भ्याड अशा एका गृहस्थाची उठून गेलेली बायको होती. गणपतराव हा नानासाहेबांचा खास–चिटणीस होता. यजमानाचें गणपतरावावर भारी प्रेम असे, कारण गणपतराव कर्तव्यदक्ष होता. गणपतरावाची सांसारिक दुःस्थिति नानासाहेबांस कळली तेव्हां तिचा परिहार करावा, एतदर्थ परोपकारी नानासाहेबांनीं ताराजीची तीनचार वेळ गांठ घेतली; पण त्यांच्या मनाप्रमाणें कोणतीच गोष्ट झाली नाहीं. इकडे नानासाहेबांची व छचोर ताराजीची अनेक वेळ गांठ पडली, हें कमलेशीं मायावी स्नेह करून तिच्या मनांत नवऱ्यांविषयीं संशय उत्पन्न कर-

प्याची खटपट करणाऱ्या राधाबाईच्या पथ्यावर पडलें. त्या एका गोष्टीवर तिनें असा घाट जमवून आणिला कीं, कमलेची व आनंदरावाची एकांतांत गांठ पडावी, निदान गांठ पडली असा बोभाटा व्हावा, नानासाहेब आणि ताराजी यांच्या गांठी एकांतांत पडतात ही बातमी कमलेच्या कानावर परस्पर जावी आणि याप्रमाणें उभयतांमध्यें बिघाड होऊन कमलेनें नाहींसें व्हावें. निष्कपट स्वभावी कमलेचें शुद्ध मन कलुषित व्हावें, म्हणून तिनें नानासाहेबांनीं ताराजीस लिहिलेलें एक साधें पत्र नानासाहेब परगांवीं गेले आहेत असें पाहून कमलेला दाखविलें. हा शेवटचा विषारी बाण कमलेच्या जिव्हारीं लागला; पण आपल्या पतीवर न रागावतां आपली स्वतःची योग्यताच अत्यंत कमी आहे अशी आपली प्रामाणिक समजूत करून घेतली आणि या कृत्रिम शिष्टाचारी समाजाला कंटाळून जाऊन कमलेनें माहेरची वाट धरली. घरीं परत आल्यावर नानासाहेबांस ही दुर्वार्ता समजली. आपल्या हातचें बनावट पत्रही त्यांस मिळालें तेव्हां या कपट नाटकाची सूत्रधार राधाबाई आहे, असें त्यांस वाटलें. तेव्हां बाबासाहेबांस हें सर्व राधाबाईचें दुष्कृत्य कळवून आपण बद्रिकाश्रमास जावें असा त्यांनीं निश्चय केला. परंतु यदृच्छेनें असा योग आला कीं, बाबासाहेबांनीं नानासाहेबांच्या समक्षच राधाबाईला या कृष्ण-कारस्थानाची हकीकत विचारली. तेव्हां तिच्या मुद्रेवर जी प्रेतकळा उत्पन्न झाली, तिच्यावरून नानासाहेबांचा निश्चय दृढ झाला कीं, आपल्या संसारांत बिघाड करण्याचें दुष्ट कृत्य राधाबाईचेंच आहे. ते बद्रिकाश्रमास निघून गेले. इकडे पतीच्या शुद्ध वर्तनानें अंतःकरणांत वचकत असलेल्या राधाबाईसमोर बाबासाहेबांनीं जेव्हां तिचें कारस्थान, तिचें कौटिल्य, तिचा स्वच्छंदीपणा आणि तिचें सांसारिक औदासिन्य यांचें पूर्ण चित्र तिच्यापुढें उभें केलें, आपण केवळ पुत्रप्रेमास्तव तिच्या स्वच्छंदी वर्तनाची आजपर्यंत उपेक्षा केली, पण प्रथमतः तिच्यावर आपलें प्रेम शुद्ध व निष्कपट होतें हा जेव्हां पाढा वाचिला आणि शेवटीं तिला पूर्ण स्वच्छंदानें वागतां यावें म्हणून 'पुत्रासह आपण बाहेरगांवीं जाणार ' असें जेव्हां कळविलें, तेव्हां राधाबाईचे डोळे उघडले. नवऱ्यानें आपल्यावर केलेलें निःसीम प्रेम, त्याची पुत्र-निष्ठा, आपला पतिद्रोह, पतीची आपल्याविषयींची दयाळु वृत्ति, हीं जेव्हां तिला पूर्ण समजलीं, आपल्या दुष्ट वर्तनानें एका प्रेमळ दंपत्याच्या सुखामध्यें आपण माती कालविली, याचें

स्पष्ट चित्र जेव्हां तिच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें, हलकट आनंदराव व बदमाष ताराजी यांची नीच व कपटी वर्तणूक जेव्हां पूर्ण स्वरूपानें तिच्या नजरेस आली, आणि चाकरमाणसेंसुद्धां आपला तिरस्कार करितात हें तिला समजलें, तेव्हां ती पूर्ण पश्चात्तापानें विव्हल व व्याकुल झाली, तिला खरा अनुताप झाला आणि शुद्ध प्रेमांत काय जादू भरलेली असते, ती तिला समजली. असो; आपल्या दुर्वर्तनाची क्षमा करून ' पूर्ण प्रेमानें वागवीन ' असें बाबासाहेबांनीं सांगितलें, तेव्हां त्यांच्या निःसीम औदार्याविषयीं तिच्या मनांत पराकाष्ठेचें कृतज्ञ प्रेम अवतीर्ण होऊन ती त्यांची दासी झाली आणि कृतापराधाच्या क्षालनार्थ कमलेचेंही दास्य करण्याचा तिनें संकल्प केला. मग हेंही जोडपें लागलीच बद्रिकाश्रमास गेलें. तेथें सर्व गोष्टींचा उलगडा होऊन कमलेनें राधाबाईस स्नेहाची जोड दिली आणि दोन्ही जोडपीं पुनः निर्मल आनंदानें संसार-यात्रा क्रमूं लागलीं.

हें या नाटकाचें संविधानक आहे. यांत समाजानें भिण्यासारखें कांहीं आहे असें मला वाटत नाहीं, संसाराचें कोणतेंही चित्र रेखाटावयाचें असल्यास त्यामध्यें सुष्ट आणि दुष्ट अशीं माणसें यावयाचींच. ह्या जगांत जितके पुरुषोत्तम पुरुष आढळतात तितके किंवा त्यांपेक्षां जास्ती पुरुषाधम लोक दृष्टीस पडतात. कादंबरीकाराचें किंवा नाटककर्त्याचें हें कर्तव्य आहे कीं, आपलें चित्र सजवितांना त्यानें सद्गुणांची अनुकरणीय प्रशंसा होईल, आणि दुर्गुणांविषयीं वाचकांच्या अथवा प्रेक्षकांच्या अंतःकरणांत तीव्र तिरस्कार उत्पन्न होईल अशी योजना केली पाहिजे. हें जसें बरेंवाईट झालें असेल त्याप्रमाणें कादंबरी, काव्य अथवा नाटक बरेंवाईट ठरेल. तसेंच, नाटकामध्यें जीं पात्रें आपण रंगभूमीवर आणितों त्या पात्रांचा संबंध ' ठाकसे ठीक ' जुळलेला असावा, त्यांच्या शीलाची आणि स्वभावाची उत्क्रांति ( वाढ ) ठीक रीतीनें झालेली असावी, निरनिराळ्या मनोवृत्तींचा विकास करणारे प्रसंग असावे व त्यांचा परिपोष व्हावा, रसपरिपाक चांगला असावा, पात्रांच्या योग्यतेप्रमाणें त्यांची भाषा असावी इत्यादि नाटकाला अवश्य असणारें गुण टीकाविषयक नाटकांत आहेत कीं नाहीं हें पाहाणें टीकाकाराचें कर्तव्य आहे. नाटकाचा काल, त्याचें स्थळ आणि त्याची परिस्थिति यांचाही योग्य विचार टीकाकारानें केला पाहिजे.

वर दिलेल्या संविधानकावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, या नाट-

कांत राधाबाई आणि कमळा हीं दोन मुख्य स्त्रीपात्रें, आणि आनंदराव व नानासाहेब हीं दोन मुख्य पुरुषपात्रें आहेत. रा. रा. टिपनीस यांनीं राधाबाईकरवीं कमलेच्या सौख्याचा विघाड करून आपली अन्याय्य विषय-वासना तृप्त करावयाची, असा दुष्ट संकल्प प्रथम प्रवेशांत करविला आहे. सर्व नाटकाचें बीज हेंच आहे. असो; आनंदरावासारखा स्त्री-लोलुप कामी पुरुष व ताराजीसारखी द्रव्य-लोभी स्त्री या दोघांस राधाबाईनें हाताशीं धरून त्यांच्या साहाय्यानें नानासाहेबांवर आग पाखडणारें पत्र मिळवून तें सजवून तयार केलें व भोळ्या शुद्ध कमलेच्या हातांत तें दिलें, आणि तिला माहेरीं जावयास लाविलें. हा त्या संकल्पाचा ओघसिद्ध परिपाक आहे. राधाबाईच्या संकल्प-बीजाचा विषवृक्ष कसा वाढत गेला याचें चटकदार चित्र ग्रंथकर्त्यानें खासें रेखाटलें आहे. या नाटकांत पाताळयंत्री राधाबाई आपल्या विषयवासनेच्या तृप्त्यर्थ प्रत्येक प्रसंगाचा व प्रत्येक पात्राचा कसा उपयोग करून घेते, हें स्वच्छ आणि स्पष्ट दिसतें. तिचा स्वभाव निसर्ग-सौंदर्याचें मर्म जाणणारा होता; पण त्याला घरीं उत्तमसें ' खाजें ' न मिळाल्यामुळें त्याची प्रवृत्ति दुर्मार्गाकडे वळली. सामान्यतः प्रेमळ माणसें विषयासक्तीनें कशीं दुर्वृत्त होतात, हें या नाटकांत स्पष्ट दिसतें. असो; राधाबाई जशी प्रेमळ तशी बुद्धिवान् आणि कल्पकही होती. जें प्रेम तिला घरीं मिळत नव्हतेंसें वाटलें होतें तेंच प्रेम शुद्ध स्वरूपानें आपल्या घरीं उत्तम प्रकारें मिळेल असा तिचा निश्चय होतांक्षणीं ती बहकण्याच्या पंथास लागलेली राधाबाई अनुतापजलानें शुद्ध झाली आणि पुनः प्रेमशुद्ध संसाराच्या सुख-सौभाग्याचा अनुभव घेत राहिली. वासना दुष्ट असेल तर दुष्टसंगति चालत येऊन मनुष्यदेहाचा नाश होतो; पण दुष्ट पुरुषाच्या वासनेचें बीज नष्ट होऊन ती सन्मार्गाला लागली असतां सत्संगति मिळून जन्माचें सार्थक होतें हें राधाबाईपासून आपल्यास शिकावयाचें आहे. दुष्ट स्त्रीपुरुषें या जगांतून केव्हां नाहींशीं होतील तीं होवोत; पण सध्यां तरी दुष्टांना सुष्ट करण्याचे उपाय शोधून काढणें अत्यावश्य आहे. असल्या माणसालाही शुद्ध प्रेमानेंच वळविलें पाहिजे, असें दाखविण्याचा ग्रंथ-कर्त्याचा हेतु आहे व तो बऱ्याच अंशानें सिद्धीस गेला आहे. दुष्ट कृति स्पष्ट पाहिल्याशिवाय मनुष्याचे दुष्टत्वाची, नीचतेची व हलकटपणाची जिवंत कल्पना सामान्य लोकांस होत नाहीं, ती कांहींशी यावी आणि यासुद्धां जगांत अनीतीचीं

कडू व घातकीं फळें आलेलीं दिसतात, हें बालगोपालांस सहज दिसावें एतदर्थ राधाबाईच्या पात्राची योजना आहे.

कमला हें भोळें पात्र सहज-मनोरम, अभिनव-सुंदर आणि सर्व-सद्गुण-परिपूर्ण असें आहे. हें शुद्ध व निष्कलंक पात्र रंगभूमीवर आलें म्हणजे प्रत्यक्ष सीता-देवीच अवतीर्ण झाली आहे कीं काय ? असा भास होतो. या अबलेचा होऊं नये तसा व तितका छल दुष्ट राधाबाईनें आणि विषयी आनंदरावानें केला; पण ही साध्वी आपल्या सत्त्वापासून यत्किंचितही ढळली नाहीं. प्रसिद्ध कविकुल-मुकुटमणि भवभूतीनें सीता माऊलीचें चित्र रेखाटलें आहे, याच धर्तीवर शुद्ध व पतिनिष्ठ कमलेचें चित्र तयार करण्याचा रा. रा. टिपनीस यांचा प्रयत्न आहे व तो बऱ्याच अंशानें सिद्धीस गेला आहे, इतकें सांगितलें म्हणजे कमलेविषयीं जास्त लिहिण्याचें कांहीं एक कारण नाहीं. शुद्ध हिरकणीच ती ! घणाचे घावांनीं का तिचा चुराडा होणार आहे ? कोणीकडे राधा आणि कोणीकडे कमला !

विषयाचें अतिरिक्त चिंतन करणाऱ्या पुरुषाचें गलिच्छ चित्र पाहावयाचें असल्यास, आनंदरावाचें चरित्र पाहावें. येथें वाचकांची इच्छा बरीच पूर्ण होईल व त्यांस विषयाच्या घाणेरड्या सेवनाचा तिटकारा उत्पन्न होईल. हा पुरुष आपली राक्षसी इच्छा तृप्त करण्यासाठीं कोणतेंही कृत्य किंवा अपकृत्य करण्यास तयार असणारा रावणच होय. असले आनंदराव प्रत्येक समाजांत वावरत असतात. या असल्या कुजट व्यक्तींपासून सर्व स्त्रीपुरुषांनीं दूर–दूर–राहावें, हें शिकविण्या-साठीं या थोर कुलांतील हलकट पात्राची योजना केली आहे. अंधेरांतून उजे-डांत आल्यावर जसा दिव्याचा प्रकाश जास्त खुलून दिसतो, दुःखांतून होरपळून निघाल्यावर सामान्य सात्त्विक सुखही जास्त सुखकर व जास्त योग्यतेचें भासूं लागतें, त्याप्रमाणें आनंदरावाच्या विषयासक्त चारित्र्याच्या अवलोकनानें नाना-साहेबांचें शुद्ध, निर्मळ, कार्यकारी व परहितव्यसनी अंतःकरण हें मनावर उत्तम परिणाम करितें. तसेंच, कमलेचें शुद्ध व नाजुक प्रेम व अभंग पतिनिष्ठा, बाबासाहेबांची शांत, गंभीर, व प्रेमळ वर्तणूक, चाकरमाणसांची स्वामिनिष्ठा या सात्त्विक, प्रेमळ आणि एक-निष्ठ वर्तनाची जास्त योग्यता भासून हे व इतर सद्गुण अनुकरणीय आहेत, असा शुद्ध वाचकांचा व प्रेक्षकांचा निश्चय होतो.

ताराजी ही तर बोलूनचालून पैशाला हपापलेली उनाड बायको आहे. आनंदरावांचा दुष्टपणा व हिचा उनाडपणा नाटकाच्या प्रगतीबरोबर वाढतांना दिसतो. व या दोन गलिच्छ पात्रांसंबंधानें पूर्ण तिरस्कार उत्पन्न होतो व दुर्गुण सर्वथा त्याज्य आहेत, असा पक्का ग्रह होतो, हें निर्विवाद आहे. मुख्य पात्रांसंबंधानें इतकें विवेचन पुरें आहे. इतर किरकोळ पात्रेंही आपापले कार्यभाग कमीअधिक प्रमाणानें उरकून घेतात, आणि कोठें थट्टामस्करीनें, तर कोठें खोड्या करून, कोठें खोट्या कंड्या पिकविणाऱ्या माणसास शिक्षा देऊन तर कोठें भाबड्या माणसाच्या द्वारें खरी हकीकत बाहेर काढून आपल्या भोळ्या व शुद्ध स्वभावाचें आविष्करण करितात. असो; सद्‌गुण पैशांत नसतो, कुलांत नसतो, मोठ्या योग्यतेंत नसतो किंवा डामडौलांत नसतो, तर तो केवळ पुरुषाचा स्वभाव व संस्कृति, यांमध्यें मात्र उत्पन्न होतो आणि वाढतो हें दाखविण्याला हीं किरकोळ पात्रेंसुद्धां उत्तम साधनें आहेत.

आतां या नाटकावर असा एक आक्षेप घेतां येईल कीं, हिंदुसमाजाचें प्रस्तुतचें स्वरूप या नाटकांत दिसत नाहीं. हा आक्षेप खरा आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या पादांतील महाराष्ट्र समाजाचें हें चित्र नाहीं. तथापि हल्लीं जो शिक्षणाचा क्रम सुरू आहे व या आधुनिक शिक्षणाच्या अनुषंगानें व्यक्तिविषयक व सामाजिक स्वातंत्र्याचें जें बीज रोविलें जात आहे, त्याचा ओघ असाच राहून वाढत गेला तर या शतकाच्या अर्धानंतर म्हणजे चाळीस पन्नास वर्षांनंतर महाराष्ट्र समाजाची स्थिति नाटकांतील व्यक्तींच्या व समाजाच्या स्थितीप्रमाणें होईल असें रा. टिपनीस यांस वाटतें व तें कांहीं अंशीं खरें आहेही. नानासाहेब आणि कमला हीं या स्वातंत्र्याच्या अमदानींतील शुद्ध व विमल चित्रें आहेत. तसेंच राधाबाई व आनंदराव आणि ताराजी हीं त्या समाजांतील बिघडूं पाहणारीं व बिघडलेलीं चित्रें आहेत. घरामध्यें सामानसुमानाची गर्दी, सायकलें, मोटार्स, आगगाड्या, बूट, पाटलोण, नेकटाय्‌कालर, चहा, इत्यादिकांची रेलचेल, स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज, स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य, नीतीचें व सामाजिक नियमांच्या प्राबल्याबरोबरच अनीतीचें अस्तित्व, कोर्टांत न जातां अपराध करणाऱ्यास हंटरचा मार, इत्यादि गोष्टी त्या काळांत सर्वत्र दिसतील, असें ग्रंथकर्त्यास वाटतें. तसेंच बायकांचें हळदकुंकूं, भारत, भागवत, भगवद्गीता, रामा-

यण, इत्यादि अभियुक्त व प्रासादिक ग्रंथांचे ठिकाणीं परमनिष्ठा, परोपकारी कर्तव्य-कर्म करण्याविषयींची तक्षकी दक्षता, बद्रिकाश्रमासारखे योगीजनांचे आश्रम याच भावीकाळांत दिसून हिंदुसमाज आपलें सनातनत्व सोडणार नाहीं असेंही ग्रंथ-कारांस वाटतें. म्हणून वरील आक्षेप, आज थोडा खरा असला तरी तो भावी कालाच्या दृष्टीनें खरा नाहीं, असें मला वाटतें.

आक्षेप खरा असो वा खोटा असो, अमक्याच तऱ्हेनें अमक्याच कालाविषयीं अमुकच पात्रें रंगभूमीवर आणून दाखविलीं पाहिजेत असा निर्बंध कोणत्याही स्वतंत्र–कालीं असणें शक्य नाहीं. दुर्वासानें शकुंतलेला निरर्थक शाप देणें, हॅम्लेटनें आपल्या आईच्या तोंडावर अभद्र शब्दांनीं तिची निंदा करणें, आयागोनें धनलोभाप्रीत्यर्थ एका प्रेमळ दंपत्याचा सुखघात व प्राणघात करणें, चारुदत्तानें वसंतसेनेशीं पत्नीप्रमाणें व्यवहार करणें, इत्यादि गोष्टी कितीही गर्ह्य असल्या, देशकालास अनुरूप नसल्या, तरी त्यांच्यासंबंधानें नाटककर्त्यानें आपलें निरंकु-शत्व गाजविलेलें चालतें. मात्र ह्या गोष्टींनीं मानवी स्वभावाचें यथारूप प्रदर्शन सामान्यतः होत असलें म्हणजे झालें. येथें नीति–अनीतीचा, धर्माधर्माचा प्रश्न येतो तो इतकाच कीं, अनीति आणि अधर्म यांच्यासंबंधानें वाचकांच्या व प्रेक्ष-कांच्या मनांत तीव्र तिरस्कार उत्पन्न होतो किंवा नाहीं, आणि नीति व धर्म-संबंधानें त्यांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होतो किंवा कसे ? योग्य तिरस्कार आणि योग्य पूज्यभाव यथा–प्रसंगीं उत्पन्न झाले म्हणजे ग्रंथकर्त्याचें काम संपलें.

या नाटकांत सात्त्विक शृंगाराचा, बीभत्सरसाचा व शुद्ध व पोक्त करुणरसाचा परिपोष बरा झाला आहे. हलक्या पात्रांनीं ग्राम्य हास्यरसाचा उद्भव केल्यामुळें शुद्ध गंभीरपणा विशेष खुलून दिसतो. या नाटकांत स्वभाववैचित्र्य व प्रसंग-वैचित्र्य पुष्कळच आहे. सारांश, नाटक बघत असतां बरेंच ठिकाणीं मन रंगून जातें, असा माझा अनुभव आहे. असो; रा. टिपनीस यांचा हा पहिला 'ओनामा' आहे या दृष्टीनें हें नाटक बरेंच चांगलें साधलें आहे, असें पूर्वग्रह न झालेला मर्दानी स्पष्टवक्तासुद्धां प्रामाणिकपणें म्हणूं शकेल, यांत मला संशय वाटत नाहीं.

रा. रा. टिपनीस यांचा हा पहिला प्रयत्न आहे, या प्रयत्नांत त्यांस बरेंच यश आलें आहे. हा आपला उद्योग त्यांनीं अखंड सुरू ठेवला, संस्कृत व इंग्लिश

वाङ्मयाशीं दृढ परिचय केला तर मला असें वाटतें कीं, रा. टिपनीस हे बऱ्याच उच्च प्रतीचे नाटककर्ते होतील. यांची भाषा साधी, गोड आणि सुबोध आहे. यांना विनोद करितां येतो व वठवितां येतो. पात्राची योजना करण्याचें काम व त्यांचीं स्वरूपें चितारण्याचें काम यांना बरेंच साध्य झालें आहे. आणि ज्याला स्वयंभू प्रेरणा म्हणतात, तिचाही अंश यांस मिळाला आहे. असो, परमेश्वर करो आणि रा. टिपनीस व त्यांचा कार्यभागी नटवर्ग यांच्या हातून महाराष्ट्र सारस्वताची एकनिष्ठ सेवा होवो.

**चिंतामण गंगाधर भानू.**

---

*** गुरुवर्य प्रो. भानू यांनीं माझ्यासारख्या त्यांच्या एका अल्पमति भक्ताची प्रार्थना श्रवण करून आपल्या प्रस्तावनेच्या प्रकाशानें जगाच्या व्यवहारांत खरो-खरीच अजाण अशा कमलेस, राक्षसी टीकाकारांनीं उत्पन्न केलेल्या मायावी अंधःकारांतून सुरक्षितपणानें जगाच्या रंगभूमीवर आणून, तिचें शुद्ध स्वरूप जगाच्या नजरेस पाडिलें, याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. प्रयोगापूर्वी, महाराष्ट्रांतील सन्मान्य नाटककार श्री. खाडीलकर यांनीं प्रेमळ अंतःकरणानें ज्या मार्गदर्शक सूचना दिल्या त्या न मिळत्या तर या नाटकाला रंगभूमीपर्यंतची मजलही जड गेली असती. या परमपूज्य नाटककारांच्या नाट्य-कृतीच्या अभ्यासाचें व त्यांच्याशीं झालेल्या नाट्यविषयक चर्चेचेंच ' कमला ' हें फल आहे, इतकें म्हटलें म्हणजे त्यांचा मी किती ऋणी आहे, हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. हें नाटक प्रयोगरूपानें पुढें आल्यावर, बऱ्याच टीकाकारांनीं त्यांच्या समजुतीप्रमाणें अनुकूल प्रतिकूल टीका करून माझ्यावर उपकारच केले आहेत. तसेंच, महाराष्ट्र नाटक मंडळीचे सन्मान्य व्यवस्थापक माझे मित्र श्री. कारखानीस यांनीं व आमच्यापैकीं सर्व लहानथोर मंडळींनीं अत्यंत श्रम सोसून हें नाटक रंगभूमीवर आणण्यांत जो अभिमान व जी उत्सुकता दाखविली तीबद्दल त्यांचे प्रसिद्धपणें आभार मानल्यावांचून मला राहवत नाहीं.

पुणें, महाराष्ट्र नाटकमंडळी. **नाटककर्ता.**

---

# कमला.

## अंक १ ला.

—०*ऽ*०—

## प्रवेश १ ला.

—*०*—

**स्थळ**—राधाबाईचा दिवाणखाना.

( राधाबाई व साळू येतात. )

**राधा०**—समजलंना? साळू, मला आजचं नाटक पहिल्यापासून पाह्यचं आहे, तेव्हां सुरुवातीलाच गेलं पाहिजे. गाडी लवकर तयार ठेवायला सांग.

**साळू**—पण बाईसाहेब, यमुनाताईच्या लग्नाचं वऱ्हाड, उद्यां आपल्या-इथला गडगनेर झाला म्हणजे जाणार आहे, तेव्हां रमाबाई आमंत्रणाला निघाल्या आहेत. आत्तांच त्या इकडे येतील.

**राधा०**—हें एक विघ्नच आलं! आतां रमाबाई येऊन गेल्याशिवाय कांहीं सुटका होत नाहीं. तिकडं नाटकं म्हणजे काय! लग्नघटकेला लग्न लागायचं चुकेल, पण ठरलेल्या वेळेवर नाटकाचा पडदा उघडायचाच!—बरं तूं जा आणि गाडी तयार ठेवायला सांग. ( साळू जाते. )—लग्न आणि लग्नसंबंध! आमच्यां-तले कितीसे लग्नसंबंध सुखदायक होत असतील? पतिपत्नींचा संबंध म्हणजे प्रेमसंबंध का आहे? नुसतीं बाहुलाबाहुलींचीं लग्नं! दूर कशाला, माझंच उदाह-रण! अगदीं मुलगा झाला आहे तरी पतीवर एवढं तरी प्रेम आहे का? परस्पर-विरुद्ध स्वभावाच्या माणसांत प्रेमाचे सूक्ष्म तंतु कसे टिकणार! अशा स्थितींत नानासाहेबांवर माझं मन बसलं याचा दोष कुणाकडे? पण नानासाहेबांनीं तरी माझ्या प्रेमाकडे कुठं लक्ष्य दिलं? मी आपण होऊन त्यांच्या पायांकडं धांव घेतली म्हणून का हा धिक्कार? मला हा अपमान कसा सहन व्हावा! नाना-

साहेब बद्रिकाश्रमच्या यात्रेला गेल्यावर रागाच्या भरांत, माझ्यासाठीं तळमळ-णाऱ्या त्या आनंदरावाला मीं उगीच नादीं लावलं खरं; पण परवां नानासाहेब लग्न करून पुन्हा इथं रहायला आल्यापासून मन पुन्हा त्यांच्याकडेच ओढ घेऊं लागलं आहे. वेड्या मना! कसली तुला आतां आशा! त्यांचं मन हरण करीन अशी तुझी अद्याप समजूत आहे? तुझी मानखंडना झाली ती तुला पुरी वाटत नाहीं का? नाहीं, पण मला अजून आशेला जागा आहे खरी. त्यांनीं जिच्याशीं लग्न लावलं आहे, ती कमला म्हणे कुठली एका भिकाऱ्याची, वैराग्याचीच मुलगी आहे. ती अडाणी, अशिक्षित, आणि बहुतकरून कुरूपही असेल. नाना-साहेबांना तिच्या नीरस सहवासापासून थोडंच सुख मिळणार आहे. त्यांना तिचा कंटाळा येणारच. मग माझ्यावर त्यांचं मन बसणार नाहीं तर दुसऱ्या कुणावर बसेल? प्रयत्न मात्र केला पाहिजे.

( साळू येते. )

**साळू**—बाईसाहेब, रमाबाई आल्या आहेत.

**राधा०**—जा, त्यांना घेऊन ये आंत—( रमाबाई येते. ) कोण? रमाबाई! ये, तूं येणार आहेस म्हणून साळूनं आत्तांच सांगितलं. बरीच रात्र केलीस. उद्यां गडगनेराला यायला आतांच्यासारखा उशीर करूं नकोस हो. नानासाहेबही सहकुटुंब येणार आहेत.

**रमा०**—( थट्टेनें ) पण राधाबाई! अग, उद्यां रात्रीं तुझ्याकडे माझ्या यमूला गडगनेर आहे, का नानासाहेब जहागिरदारांना मेजवानी आहे? एका दगडानं दोन पाखरं मारणाऱ्या पारध्याप्रमाणं तूं कौशल्य दाखवलंस खरं!

**राधा०**—अशी कां माझी थट्टा करतेस! अग, मी खर्चाला मागं घेणारी का आहे? पण तिकडून आग्रह पडला.

**रमा०**—तिकडून कोणाकडून? बाबासाहेबांकडून? काय आग्रह पडला?

**राधा०**—कीं नानासाहेबांना बोलावलंच पाहिजे. आणि तूंच सांग, नाना-साहेब जहागिरदार आपल्या नववधूला घेऊन त्यांच्या शांतिभुवनांत विश्रांति भोगायला आले, तेव्हां त्यांना त्रास द्यायला सुरुवात आम्हीं करायची नाहीं तर कुणीं करायची?

**रमा०**—मेजवानीला येऊन पक्वान्नावर यथेच्छ हात मारणं हा त्रास का ? पण काय ग, उद्यां मेजवानीच्या वेळीं त्यांच्या बायकोची कांहीं तरी फजिती उडवून तिला घाबरवून सोडण्याचा तुझा बेत आहे. माझ्यापासून चोरून ठेऊं नकोस.

**राधा०**—चोराच्या मनांत चांदणं !

**रमा०**—नव्हे. चोराचीं पाउलं चोरच ओळखतो असं म्हण पाहिजे तर!

**राधा०**—बरं तसं कां होईना. तुझ्यापुढं शिकस्त झाली बाई! अग, नानासाहेबांची फजिती व्हावी असं कुणाला वाटणार नाहीं ? चांगल्या चांगल्या लोकांत त्यांच्या बायकोची एकदां पुरी झाली म्हणजे नानासाहेबांना योग्य शिक्षा मिळाली! त्यांना लग्नच करायचं होतं तर इथं चांगल्या कुलशीलवान् मुली थोड्या का होत्या ? तुझ्या यमूसारखी थोरामोठ्याची शिकलीसंवरलेली मुलगी त्यांनीं नाकारावी का ? अहाहा ! तें ध्यान काय पण असेल! कल्पना करतां येते ! आणि विद्वत्ता तर काय असेल, एकाद्या कैकाडणीला साजेशी! अग, ही बद्रिकाश्रमीं राहिलेली, तिथं शाळा, हायस्कुलं थोडींच आहेत ? वळणसुद्धां हलकटच असणार--

**रमा०**—पण आतां जहागिरदारीण झाली आहे ना ?

**राधा०**—तेव्हां डौल घालील मोठेपणाचा. पण गाढवानं सिंहाचं कातडं पांघरलं असलं, तरी खरं रूप बाहेर पडायचंच !

**रमा०**—अग पडलंच पाहिजे. माझी यमू चांगली का ती चांगली तें दिसेलच. हातच्या कांकणाला आरसा कशाला ? अग, तिकडं हिंदुस्थानी भाषा; हिला धड मराठी बोलतां तरी येत असेल का नाहीं कुणाला ठाऊक!

**राधा०**—आपण साऱ्याजणी मोठमोठ्या विषयांवर गप्पा मारूं आणि मधूनमधून तिच्या तोंडाकडे पाहूं म्हणजे बयेला तोंड खालींच घालावं लागेल. नानासाहेबांना तर मग खेटरं मारल्यासारखं होईल, आणि असल्या बावळ्या बायकोला घेऊन इथं आलों त्यापेक्षां अंगाला भस्म चोपडून बैरागी झालों असतों तर बरं, असं त्यांना वाटेल !

( चंद्या एक जरीची झोळी, भस्माचा गोळा व वर्ख लावलेली करवंटी असें सामान घेऊन येतो. )

**चंद्या**—हें सामान आनलया.

**राधा०**—चंद्या, किती वेळ लावलास बरं? तुमच्यासारख्या माणसांशीं गांठी पडल्या म्हणजे डोकं पिकून जातं. तिकडच्या सवलतीमुळं चाकरमाणसं फाजिल होतात. किती का जरूरीचं काम असेना, गडी निजला असला तरी त्याला उठवायचं नाहीं, काम स्वतः करायचं! कां, तर त्याची झोंपमोड होते! बरं, ठेव तें आणि जा आतां. [ चंद्या जातो. ]

**रमा०**—काय ग, काय आहे तें? मला तरी दाखीव. कांहीं आहेर आहे वाटतं?

**राधा०**—हो, आहेरच आहे. पण तो तुझ्या यमूकरितां नाहीं हो. या जिनसांचा श्रीमंत नानासाहेबांच्या श्रीमती कमलाबाईसाहेबांना नजराणा द्यायचा आहे. ( झोळी दाखवून ) भिकाऱ्याच्या पोरीनं भिक्षाच मागावी. जहागिरदारीण व्हायची इच्छा धरली, तरी पुन्हां चौपदरीवर वासना जायचीच! तेव्हां पुढं त्यांना या झोळीचा चांगला उपयोग होईल.

**रमा०**—वा! फारच उपयुक्त वस्तु! उपजीविकेकरतां चार गांव इनाम देणाऱ्या राजाइतकं तुझं औदार्य आहे! चाऱ्ही दिशा मोकळ्या करून निरंतर चरितार्थ चालवायचं सामर्थ्य एक या चौपदरींत आहे खरं. आणि हें काय ग? अग, हा भस्माचा गोळा कशाला?

**राधा०**—असं काय भलतं बोलतेस? अग, ही चेरीब्लॉसमची स्वदेशी पॉवडर आहे बरं! मोठे मोठे गोसावीसुद्धां ही अंगाला लावतात! ह्या जहागिरदारीणबाई माहेरीं असतांना ही अंगाला लावल्यावांचून त्यांचं पोटच भरत नसे.

**रमा०**—एकूण भस्म फांसून झोळी खांकेंत घालून भिक्षा मागण्याचं काम या बाईसाहेबांना तिथं करावं लागे तर?

**राधा०**— आणि ही नारळाची आई विसरलीस वाटतं? हिचा उपयोग तर फारच मोठा! एक तर ही आई; तेव्हां जेऊं घालील; पाणी पिण्याच्याही उपयोगीं पडेल आणि ही भस्मी पावडर यांत घेऊन त्या कुंचल्यानं तोंडाला फांसायलाही ठीक आहे.

**रमा०**—शाबास! पण ही झोळी जरीची कां आणि करवंटी रुपेरी कां?

**राधा०**—एवढं तुला कळत नाहीं! अग, भिकारी संन्यासी असला तर खादीची कफनी घालतो, तोच शंकराचार्य जरीची कफनी चढवतो. भिक्षेकऱ्याच्या योग्यतेप्रमाणं त्याचा पोषाख नको?

**रमा०**—बरोबर आहे.

**राधा०**—आणि त्या बाईसाहेब आल्याबरोबर सर्व बायकांनीं 'जय सित्ताराम' करून खडी ताजीम द्यायची हं!

**रमा०**—तुझं डोकं कोणीकडं धांवेल तें कांहीं समजत नाहीं. पण पहा हो, ती जर खरोखरच चांगली असली तर तुझ्या मात्र फजितीला पारावार नाहीं.

**राधा०**—अग हो, माझी फजिती होते आहे! पण मी अगोदर थोडीच हा नजराणा करणार आहे! ती कशी आहे, त्याला योग्य आहे कीं नाहीं, हें तर पाहणारच.

**रमा०**—बरं, तें राहूं दे आतां. मला रात्र होते. मी यमूच्या लग्नाच्या आमंत्रणाला आलें आहे. तुला आलं पाहिजे हं. उद्यां तुमच्या इथला गडगनेर झाला कीं निघायचं ठरलं आहे. तूं जर आली नाहींस तर पुढं चार महिने आपली भेट होणार नाहीं. कारण रजा संपेपर्यंत आम्ही पंढरपुरलाच राहणार आहों.

**राधा०**—बरं आहे. येईनच.

**रमा०**—मग मी येतें आतां. चार वाजतां घरांतून बाहेर पडलें पण आतां नऊ झाले असतील. येऊं आतां?

**राधा०**—ये बरं. 'जय सित्ताराम' आठवण असूं दे हं!

( साळू नारळ व करंडा आणते. राधाबाई रमाबाईस कुंकूं लावते व नारळ देते. रमा जाते. )

**राधा०**—हरयुक्ति करून नानासाहेबांच्या बायकोला सळो का पळो केलं पाहिजे. तिचं माझ्यापुढं थोडंच तेज पडणार आहे म्हणा! माझ्या स्वरूपावर आणि अक्कलेवर भिस्त ठेऊन मी स्वस्थ बसणार. चला, नाटकाला निघालंच पाहिजे. ( आनंदराव येतो. ) कोण? आनंदराव! आपण आलांत! पण—

**आनं०**—आपले पतिराज बाबासाहेब कुठं आहेत? चिरंजिवांना शिकवीत बसले असतील?

**राधा०**—हो ! ते वरच्या माडींत बाळाला शिकवीत बसले आहेत.

**आनं०**—पण तुम्ही कुठं निघालां ?

**राधा०**--मी नाटकाला जातें आहे. ही निघालेंच होतें.

**आनं०**—मलाही तिकडंच जायचं आहे. बरोबरच जाऊं झालं.

**राधा०**—मी तुमच्या बरोबर साफ येणार नाहीं. आणि हो, तुम्हांला सांगून ठेवतें, अशा भलत्याच वेळीं माझ्याकडे येत जाऊं नका. माझ्या मनांत कांहीं असलं तरी कुळाचा लौकिक कायम राहील असंच मला वागलं पाहिजे. शिवाय बाळ आतां मोठा होत चालला आहे त्याच्या किंवा चाकरनोकरांच्या नजरेस तरी हें येतां कामा नये.

**आनं०**—मला आशा दाखवून दूरदूर ठेवण्यांत तुम्ही काय मिळवणार ?

**राधा०**—तुम्ही इथून एकदम जा कसे. माझ्या मनाची स्थिति तुम्हांला कशी कळणार-जा-जा-जा.

**आनं०**—जातो बुवा ! काय करायचं !

( गोविंदा येतो. )

**गोविं०**—( स्वगत ) तो कोण ? आनंदराव ? आनंदरावच गेला.

**राधा०**—तें कोण ? गोविंदबुवा ! गाडी तयार आहे ना ?

**गोविं०**—बाईसाहेब, गाडी केव्हांची तयार आहे.

**राधा०**—ठीक ! तिकडं सांगा, मी नाटकाला गेलें म्हणून.

[ राधाबाई जाते. ]

**गोविं०**—हे आनंदराव म्हणजे गांवांतल्या अट्टल रंडीबाजांचे प्रमुख, भोळ्याभाबड्या पोरींच्या पातिव्रत्यावर घाला घालणारे लुटारू आणि अब्रूचे सौदागर. ऐशी स्वारी आहे ! बाईसाहेबांची स्थिति अलीकडे कांहीं नीटशी नाहीं –अरे, पण आमचे धनी बाबासाहेब आणि बाळ इकडेच येत आहेत.

( बाबासाहेब व बाळ येतात. )

**बाळ**—बाबा ! तुम्हांला डोक्यावर उभं राहून पायानं सलाम करितां येतो का ?

**बाबा०**—( हंसून ) नाहीं बाळ ! मला नाहीं तसं करतां येत. अरे, अजून पुरे नाहींत का होत तुझ्या सरकसच्या गोष्टी ? जा, बाळ, जाऊन नजि आतां.



बाळ—अन् मग ते पळून गेले ! [ अं. १ ला प्र. १ ला पृ. ७ ]

**बाळ**—पण बाबा, त्या दिवशीं आपण सिनियोग्राफ पाहिला, त्यामधला तो फार्स तुम्हांला आठवतो का ? एक नवरा होता आणि एक बायको होती; आणि ती बायको दुसऱ्याच एकाजवळ बोलत होती; अन् तिचा मुलगा तिथं आला तेव्हां त्या दोघांनीं त्याला ठार मारलं; अन् मग ते पळून गेले. पण त्या नवऱ्यानं तिला शोधून काढली अन् मग फांशीं दिली.

**बाबा०**—बाळ ! जाऊं दे तें. तूं निजणार केव्हां ? जा, फार जागूं नकोस. आतां माझें ऐकलें नाहींस तर मी तुला पुन्हा कधींही सरकसला, नाटकाला, कशाला नेणार नाहीं.

**बाळ०**—नाहीं जा, तें नाहीं चालायचं. मी मुकाट्यानं निजायला जातों. पण मला नेलं पाहिजे. मी नाहीं ऐकायचा जा.

**बाबा०**—गोविंदा, त्याला निजायला ने. जा हं, बाळ.

[ गोविंदा व बाळ जातात. ]

**बाबा०**—( स्वगत ) अरेरे ! आपल्या बोलण्यानं आपल्या बापाच्या अंतःकरणाची काय स्थिति होत असेल याची या मुलाला कल्पनाही नसेल. जारिणी स्त्रीला ठार केली तर कोणीसुद्धां दूषण देणार नाहीं; उलट तिला योग्य शिक्षा केली म्हणून लोक शाबासकीच देतील;—पण तसं जर मीं केलं तर माझ्या या लाडक्या बाळाच्या मनाची काय अवस्था होईल ! आपली आई व्यभिचारिणी, ही गोष्ट त्याच्या मनाला टोंचण्या देईल. त्याचं सगळं आयुष्य दुःखांत जाऊन तो वेडा होईल. बरं, त्यापासून माझ्या मनाचं तरी समाधान थोडंच होणार आहे ? तेव्हां मी करितों आहें हेंच बरोबर आहे. लोकांत मी आणि ती नवराबायको आहोंत. पण तिच्या वर्तनाबद्दल संशय आल्यापासून तिच्याशीं संबंधच ठेवला नाहीं. मग ती या घरांत असली म्हणून काय हरकत आहे ? तिचा त्याग केला, किंवा तिचा जीव घेतला तर बाळाच्या मनाला केवढा धक्का बसेल ! माझ्या बाळाला दुःख होऊं नये म्हणून मला निरंतर जपलं पाहिजे. आतां थोडं फिरून यावं म्हणजे मनाला जरा स्वस्थता येईल. गोविंदा ! माझे कपडे आण पाहूं ( गोविंदा येतो. ) तुझ्या बाईसाहेब घरांत नसतीलच ?

**गोविं०**—त्या आनंदरावाच्या बरोबर नाटकाला गेल्या आहेत.

**बाबा०**—( एकदम वळून ) ती कुठं गेली, आणि कोणाबरोबर गेली हें मीं विचारलं नाहीं. मी विचारीन तेवढ्याचंच उत्तर देत जा; उगीच पाल्हाळ मला नको आहे. समजलास ?

**गोविं०**—चुकलों, महाराज.

**बाबा०**—विठोबाला माझ्याकरतां दूध ठेवायला सांग आणि हें बघ, बाईसाहेब आल्यावर त्यांनीं माझी चौकशी केली तर मी क्लबांत गेलों म्हणून सांग. समजलास ? [ बाबासाहेब व गोविंदा जातात. ]

---

# प्रवेश २ रा.

—S*o*S—

**स्थळः**--नानासाहेबांचा दिवाणखाना.

( गणपतराव नानासाहेबांपुढें उभा असून कागदावर सह्या घेत आहे, काम आटोपल्यावर गणपतराव जातो, कमला येते. )

**कम०**--आटोपलं का सगळं काम ?-बद्रिकाश्रम सुटल्यापासून आतांपर्यंतचा आपला काळ किती जलद गेला. जहागिरीवर असतांना आपण सर्व काळ एकांतवासांतच घालविल्यामुळें आपल्या निवासस्थानावांचून इतर सृष्टि झोंपीं गेलेली आहे कीं जागी आहे हेंसुद्धां आपल्याला कळलं नाहीं.

**नाना०**--एकाच ठिकाणीं वास करून रोज त्याच त्याच गोष्टी करीत गेल्यानं आयुष्य कंटाळवाणं होतं. आपण सुखाचा उपभोग घेत आहों, अशी स्मृति असतांनाच तें चिरस्थायी करण्याकरतां नवीन मार्ग शोधून काढले म्हणजे आयुष्य आनंदभरीत होतं.

**कम०**—आणि म्हणूनच या सुखाचा उपभोग घ्यायला इथं येण्याची जलदी केलीत ! आपण कुठंही असलों, तरी त्यांत मला कमजास्त कांहींच वाटत नाहीं. कारण या बाहेरच्या गोष्टींपासून मला आनंद किंवा दुःख कांहींच होत नाहीं.-पण महाराज ! इथं आल्यापासून एक गोष्ट माझ्या मनांत सारखी घोळते आहे, ती आपल्याला विचारूं का ? कारण ती गोष्ट मनांत आल्यापासून माझ्या मनाला बरं वाटेनासं झालं आहे.

**नाना०**—लाडके! एकाद्या गोष्टीमुळं तुला जर बरं वाटेनासं झालं आहे तर ती गोष्ट मला तूं अद्याप कां कळविली नाहींस? इतका संकोच तुला कां वाटला?

**कम०**—( हंसून ) मला वाटतं, हा इकडच्या हवेचा गुण आहे. नाहीं तर माझ्या मनाला संकोच वाटला नसता!

**नाना०**—बरोबर आहे. तूं हिमाचलासारख्या उच्च ठिकाणीं वास करणारी स्वर्गीय देवताच! तेव्हां या भूलोकीं असल्यामुळं आपण खालीं आलों असं वाटून तुला वाईट वाटत असेल.

**कम०**—मला वाईट कां वाटेल महाराज ! मी नारायणाची मनोभावानं भक्ति केली तेव्हां साक्षात् नारायण मला प्रसन्न होऊन माझा उद्धार करून मला आपल्या लोकीं घेऊन आला. माझं भाग्य उदयाला आलं, तेव्हां मला वाईट कां वाटेल?

**नाना०**—पुरे आतां ही आमची स्तुति ! पण तुझ्या मनांत काय घोळत आहे तें अद्याप सांगत नाहींस ना ?

**कम०**—महाराज! आमच्या हिमाचलावरील सृष्टिसौंदर्य पाहून ईश्वराच्या अगाध कर्तृत्वाचं नवल वाटतं! त्याच्याबद्दल पूज्य बुद्धि उत्पन्न होते. अरण्यांत जा, सरोवरासन्निध बसा, गंगातीरीं वास करा, किंवा आकाश फोडून वर पाहणाऱ्या एकाद्या पहाडावर आरोहण करा, सर्व गोष्टींपासून डोळ्यांच्या समाधानाबरोबर चित्तवृत्तिही समाधान पावते. जिकडेतिकडे पशुपक्षी, प्राणिमात्र, सर्व चराचर स्वातंत्र्याच्या स्वर्गीय सुखावर ईश्वरदत्त अधिकार गाजवून आनंदांत निमग्न होऊन सर्वांशीं प्रेमानं वागतात. एकंदरींत सर्वांभूतीं सत्य दृष्टिगोचर होऊन पाहणाराही त्यांमध्यें गढून जातो. पण या तुमच्या शहरांत आल्यापासून पाहतें, सर्व गोष्टींत कृत्रिमपणा भरलेला दिसतो. हा कृत्रिमपणा मनुष्याच्या पोषाखापर्यंत येऊन तो मनुष्याचा दर्जा आणि रूप हींसुद्धां झांकून टाकतो. महाराज! म्हणूनच विचारतें, या बाहेरच्या कृत्रिमपणाबरोबर या मनुष्यसृष्टीचं अंतरंगही कृत्रिम झालं नाहीं ना ?

**नाना०**—मी सांगण्यापेक्षां प्रत्यक्ष अनुभवानंच तुला या गोष्टीची अटकळ करतां येईल. कमले! समाजसमुद्रामध्यें तूं उतरलीस कीं पाणी कसं आहे तें तुला कळेलच.

( गंगू तबकांत अलंकार घेऊन येते. )

**गंगू०**—बाईसाहेबांना अंगावर घालण्याकरतां हे दागिने काढून आणले आहेत. [ गंगू तबक ठेवून जाते. ]

**नाना०**—आतां हे अलंकार अंगावर घालून नंतर बाबासाहेबांच्या इथं जायचं. दिखाऊपणाचा तुला तिटकारा आहे हें मला केव्हांच कळून चुकलं आहे. पण पुष्कळ कारणांकरितां हें अलंकार तुला अंगावर घातलेच पाहिजेत. लाडके, हंसतेसशी ?

**कम०**—मीं कृत्रिमपणाची निंदा केली म्हणून त्या पिशाचाला संताप येऊन तें मलाही पछाडूं पहात आहे. महाराज ! माझ्या तर अंगांत हें पिशाच संचार करणार नाहीं ना ?

**नाना०**—अग, देवता तूं! देवतांवर पिशाचांचा अंमल कधीं चालला आहे का ? उलट:तीं पिशाचं त्यांचे दास बनतात. म्हणून म्हणतों हे अलंकार अंगावर घालच.

**कम०**—पण मला या अलंकारांची काय गरज आहे ? कण्वांच्या आश्रमांत जशी शकुंतला वाढली त्याप्रमाणं माझ्या बाबांच्या झोपडींत मी वाढलेली ! असले अलंकार आणि असले उंची कपडेलत्ते मीं कधीं पाहिलेले देखील नव्हते. आतां आपली आज्ञाच होते तेव्हां हे अंगावर घालणं मला भाग आहे. पण मला किनई हे अंगावर घातल्यावर कसंसंच होईल.

**नाना०**—कमले ! शकुंतला जरी तपस्वी कण्वांच्या आश्रमांत वाढली होती आणि वल्कलांशिवाय वस्त्र आणि पुष्पमालांशिवाय अलंकार जरी तिला माहीत नव्हते तरी दुष्यंतराजाकडे जेव्हां तिला पाठविली त्या वेळीं तिची योग्यता कमी दिसूं नये म्हणून कण्वांला तिच्याकरतां हिऱ्यामोत्यांचे दागिने आणि जरतारी वस्त्रं आणवावींच लागलीं. मेजवानीला जाण्याकरतां तूं हे अलंकार घालूं नकोस. पण माझ्या डोळ्यांच्या समाधानाकरतां—माझी इच्छा म्हणून—हे अंगावर घालच.

**कम०**—मग मी का आपल्या आज्ञेबाहेर आहे ! द्या ते दागिने ! मी आपल्या अंगावर घालतें.—पण कोणता दागिना कुठं घालायचा हें मला कसं समजेल ? मी गंगूला हांक मारतें.

**नाना०**—नको, नको. मी स्वतःच तें काम करणार आहे.

**कम०**—पण आपल्याकडून मी ही चाकरी—

**नाना०**—पति हा पत्नीचा धनी आहे तितकाच तो चाकरही आहे. शिवाय हे अलंकारही फार नाहींत; मी तुझ्या अंगावर कृत्रिमपणाचं फारसं ओझं घालीत नाहीं. हीं जडावाचीं कंकणं, हा कंठा आणि या बुगड्या हेच काय ते अलंकार मी घालणार आहे. ( कांकणें घालून ) ही कंकणाची बेडी तुझ्या हातांत घालून मीं तुला बंदिवान् केलं आहे! माझ्या या अंतःकरणाच्या बंदिखान्यांतून तुला आतां बाहेर जातां यायचंच नाहीं!

**कम०**—माझ्याजवळ आपल्या हातांत घालायला दागिना नसला तरीसुद्धां माझ्या हातांतून आपल्याला निसटून जातां यायचं नाहीं.

[ त्याच्या गळ्यांत दोन्ही हात घालते. ]

**नाना०**—पुरुषांपेक्षां बायका जास्त शहाण्या यांत शंकाच नाहीं! मीं आपले हात बांधले आणि म्हटलं कीं हा कंठा गळ्यांत अडकवून ( कंठा घालून ) आपल्याला फांस लावावा पण त्यापूर्वींच आपण आम्हांला हा हस्तपाश लावून हा प्राण काढून घेतलांत. या एका दागिन्यापुढं आमचे सर्व अलंकार फिक्के पडले म्हणायचे! शेवटीं आमचीच फजिती झाली!—पण नाहीं, असला अपमान आपण कधींही सहन करणार नाहीं. या कर्णभूषणांनीं आपले कान चांगले उपटले पाहिजेत! [ बुगड्या घालूं लागतो. ]

**कम०**—पण महाराज! आपली ही इच्छा तृप्त होणार नाहीं! कारण बुगड्यांचीं भोकं माझ्या कानांला मुळींच नाहींत.

**नाना०**—काय पहा, पुन्हां फजिती! स्वारी करून आलेल्या शत्रूचा निकराचा मारा चालूं नये म्हणून हा अगोदरच बंदोवस्त करून टाकला वाटतं. वः! तुम्ही हा डाव लढवून आम्हांला अगदीं चीत केलंत! तेव्हां आतां आमचं एक मागणं आहे. आंत जाऊन तेवढा चांदणी शेला अंगावर घ्या आणि आम्हांला फार वेळ तिष्ठत न ठेवतां जलद परत या. ( कमला जाते. ) हें मनोहर कमल मीं धारण केलं यामुळं मला किती शोभा आली आहे! देवानं तें माझ्याकरतांच निर्माण केलं होतं यांत शंका नाहीं. नाहीं तर मी कुठं आणि बद्रिकाश्रम कुठं! पण यात्रेच्या निमित्तानं माझं जाणं त्या ठिकाणीं व्हावं, तिचं माझं प्रेम

जमावं आणि आमच्या जन्माच्या गांठी पडाव्या हा योगायोगच खरा. या कमलेच्या वडिलांनीं पत्नी व सर्व आप्त मृत्यूला बळी पडलेले पाहून वैराग्य घेऊन बद्रिकाश्रमीं वास करावा आणि या मुलीला विद्यासंपन्न करावी हें खरोखर आश्चर्यच आहे. आज बाबासाहेबांकडे आम्हांला मेजवानी असून माझ्या कमलेला आमंत्रण द्यायला राधाबाई ! आश्चर्य आहे ! कारण एकदां हीच राधाबाई माझ्या समागमाची इच्छा धरून वेडेपणानं माझ्यावर व्यभिचारी प्रीति करीत होती. एकदां तर तिची विषयवासना इतकी अनावर झाली कीं तिला उपदेश करून तिच्या मनांत मला पतिनिष्ठा जागृत करावी लागली. त्या वेळचा तिचा तो दुःखावेश, ती निराशा, ते अश्रु, आणि सरतेशेवटचे ते अपशब्द यांची आठवण झाली कीं अजून माझं मन व्यग्र होतं!——तथापि त्याच स्त्रीनं आज माझ्या लाडकीचं अभिनंदन करायला पुढें यावें, खरोखरच आश्चर्य आहे ! ( कमला येत असतां ) ही पहा गृहलक्ष्मी येते आहे. अहाहा ! या सुंदर वस्त्रांमध्यें आणि अंगावर हे अलंकार घातल्यानं ही कितीतरी मोहक दिसते आहे. पण हिचं स्वाभाविक सौंदर्य, मनाचा मोठेपणा, उदारपणा हींच त्या अलंकारांना शोभा देत आहेत. [ कमला येते. ]

**कम०**—आपल्या आज्ञेप्रमाणं मीं सगळं कांहीं केलं, आतां आपल्या मनाजोगं झालं ना ?

**नाना०**—( तिच्याकडे लक्ष न देतां स्वगत ) अरेरे ! अशा शुद्ध प्राण्याला शिष्टाचाराकरतां म्हणून थोडा वेळ कां होईना, पण दुर्गुणाच्या हवेंत मी आपण होऊन नेत आहे. एकदां वाटतं, जाऊंच नये. पण कमला जिकडे जाईल तिकडे शुद्धत्वाचे वारे आणि सद्गुणाचीं किरणंच ती नेणार !

**कम०**—आपण बोलत कां नाहीं ? आपल्या मनाजोगं झालं नसावं. मी कांहीं चुकलें तर नाहीं ना ?

**नाना०**—( कंठ दाटून ) कमले, लाडके ! माझ्या मनाजोगं काय झालं नाहीं हेंच मला समजत नाहीं. माझ्यानं शब्दच उच्चारवत नाहीं. तूं खरोखर देवता आहेस ! तूं शुद्ध सत्य आहेस आणि हें जग—पण नको, तुझा उल्हास मी कां नष्ट करूं ? लाडके, आतांपर्यंत आपण दोघंच दोघं होतों, सर्व कांहीं आपण होतों. पण आतां समाजांत आल्यानं परिस्थिति बदलली आहे. आतां

आपल्याला पुष्कळ वेळां एकमेकांपासून दूर राहावं लागेल–तुला खोटं वाटतं ?–पण खरोखर देवाजवळ माझं एवढंच मागणं आहे, तुझी माझी ताटातूट कधींही होऊं नये.

**कम०**—पण आपल्या मघांच्या आणि आतांच्या वृत्तींत असा फरक कां बरं पडला ? मघांशीं आपण मला अमका शालू नेस, तमका अलंकार घाल म्हणून हौसेनं सांगत होतां, पण आतां आपला तो उत्साह दिसत नाहीं. आपण कदाचित् आज मेजवानीलाही जाणार नाहीं इतकी आपली वृत्ति उदासीन झाली आहे. आपले डोळेही कसेसेच दिसत आहेत. आपण आज किनई घरींच राहूं. मेजवान्यांपेक्षां, या दागिन्यांपेक्षां आपल्या त्रासलेल्या जिवाला घटकान् घटका वारा घालून आपली सेवा करण्यानंच मला हजारोंपट सुख होऊन माझ्या जन्माचं सार्थक झालं असं मी समजेन. मी हे सगळे दागिने काढतें, हा शालू बदलून लुगडं नेसतें आणि येतें. आपली करमणूक करण्याकरतां मी हें सोल ऑफ् लिलिथ् वाचतें आणि आपण ऐकावं. ही मी अशीच येतें. [ जाऊं लागते.]

**नाना०**—( तिचा हात धरून ) मीं सांगायची खोटी तों तूं हें करशील, हें मला ठाऊकच आहे.

**कम०**—हो करीनच ! पण मला आपल्या सहवासांत खरोखरच किती तरी आनंद वाटतो ! आपण जर येणार नसाल तर मला जाऊन काय करायचं आहे ?

**नाना०**—लाडके ! इतक्या नम्रपणानं वागून तूं मला लहरी बनवशील मात्र ! आणि मग माझी लहर आणि माझा नवरेपणा मी इतका गाजवीन कीं तुला माझ्या जुलमी राज्यांत वागतां येणं अशक्यच होईल. नाहीं, लाडके, आपल्या दोघांनाही आज मेजवानीला गेलंच पाहिजे. आपण आमंत्रण घेतलं आहे आणि शिवाय—हें कमलाचं फूल या लोकांना दाखवून त्यांना चकित करायचं आहे मला. चल, मोटार तयार असेल. [ जातात. ]

---

# प्रवेश ३ रा.

**स्थळ**--बाबासाहेबांचा बंगला.

( गोविंदा, विठोबा, पहिल्यानें पानतंबाकू खातात. )

**गोविं०**—विठोबा, काम आटपून सर्व तयारी जय्यत आहे. आतां मंडळी येईपर्यंत अर्ध घटका गप्पा मारायला हरकत नाहीं. बाईसाहेबांची इशारत झाली कीं पंगत उडवून दे म्हणजे झालं.

**चंद्र्या**—पन काय व गोइंदबुवा ! तुमी काल रात्री व्हता कुठं ? भेटला बी न्हाईत.

**गोविं०**—मी कांहीं बाईसाहेबांच्या कामांत गुंतलों नव्हतों ! बाबासाहेब गेले बाहेर उठून—

**चंद्र्या**—अन् बाईसाब ?

**गोविं०**—त्या तर केव्हांच गेल्या उठून.

**साळू**—नाटकाला !—बाईसाहेबांबरोबर ती स्वारी होती कीं नाहीं ?

**गोविं०**—हो तर ! ती स्वारी नेहमीं बरोबर असायचीच. बरं, स्वारी तरी काय आहे पण ! जसा हुप्या माकड ! बायकोला सोडून दिली आहेन्. ती बिचारी लोकांचीं दळणं, कांडणं करून पोट भरीत होती. लोकांनीं तोंडांत शेण घातलं तेव्हां आतां कुठं स्वारी पांच रुपये पाठवूं लागली आहे. तेच बाबासाहेब ! स्वभाव तरी किती नामी आहे ! अशा हिऱ्याला टाकून त्या गारगोटीवर आमच्या बाईसाहेब कशा भाळल्या आहेत कुणाला ठाऊक ?

**विठो०**—पण काय रे गोविंद, या बाबासाहेबांस आपली बायको जर सांभाळतां येत नाहीं, तर यानें जगावें तरी कशास ? एकादसारखा असता तर जिवास देऊन बसला असता.

**चंद्र्या**—म्हंजे, इठोवा असंच की न्हाई; कीं तुमची कारभारीण तुमास्नी आवरनाशी झाली तर तुमी जीव देनार ? असंच की न्हाई ?

**विठो०**—चंद्र्या ! तूंस कितीदां सांगितलें कीं लहान्या तोंडीं मोठ्या घासास घेऊं नये. एकादसारखा असता तर तूंस सांगितलेंन् असतें काय तें.

**साळू**—पण विठोबा यांत एवढं चिडण्यासारखं काय आहे ? अहो, लोकांना तरी डोळे आहेत कीं नाहींत? तुमची बायकोही कुणी उठवून नेत नाहीं आणि तुम्हांला कोणी मरूंही देत नाहीं. मग कशाला हवा हा वाद? तो बोलूनचालून पोर आहे. तुम्ही काय लागतां त्याच्या बरोबर? आपल्या धनीसाहेबांचंच पहा ना, बाईल येव्हढी खट्याळ, पण कधीं रागावलेले तुम्हीं पाहिले आहेत का ?

**गोविं०**—जाऊं दे विठोबा. अरे, तूं म्हणतोस जीव द्यावा पण जीव देणं म्हणजे निव्वळ भागूबाईपणा आहे. आपले बाबासाहेब जर तापट स्वभावाचे असते तर मात्र एकाद्या वेळीं खुनाच्या खटल्यांत तुम्हांआम्हांला साक्षीदार जावं लागलं असतं.

**विठो०**—पण आमचे बाबासाहेब म्हणजे निव्वळ शंकरापुढचे आहेत झालें! मस वाटतें हा अंधळा, बहिरा अन् वेडाही आहे.

**गोविं०**—हें मात्र मी कबूल करणार नाहीं. मी इतके दिवस पहातों आहे —आणि बाबासाहेबांत पुष्कळ दोष आहेत हेंही मला कबूल आहे—पण या बाबतींत मी खास सांगतों कीं ते आंधळेबहिरे तर नाहींतच पण वेडेही नाहींत.

**साळू**—होय गोविंदबुवा. मलाही तसंच वाटतं.

**चंद्या**—पन् आपल्या बाईसाहेब नाटकाला तरी कंच्या जातात?

**गोविं०**—अरे, बाईसाहेब कोणत्या नाटकाला जातात हें जर ऐकशील तर तुलासुद्धां चमत्कारिक वाटेल. परवां त्या "कालकूट" वर्तमानपत्रांत त्या नाटकावर एक लेखही आला होता. ती एक भिकार राधाकृष्णप्रासादिक मंडळी आहे त्या मंडळीच्या नाटकाला आपल्या बाईसाहेब सदा ठेवलेल्या ! त्या मंडळीचीं नाटकं म्हणजे निव्वळ तमाशे ! आणि त्यांत कांहीं बायका आहेत. मग लोकांच्या झुंडीच्या झुंडी तिकडं लोटतात यांत आश्चर्य काय ? अरं, खुर्चीवर किंवा कुठंही बसून वांकडी मान करून उजव्या किंवा डाव्या ग्यालरीकडे दृष्टि फेंकण्याइतकं धैर्य ज्यांच्या अंगांत नाहीं त्यांना समोर स्टेजवर दृष्टिसुख घेतां येतं.

**विठो०**—अरे गोविंद ! मस वाटतें कीं तूं एकाद्या वर्तमानपत्रास काढलेंस तर चांगलें चालवशील. या आतांच्या तुझ्या बोलण्यावरून मस तर खास वाटतें !

**चंद्या**—व्हय गोइंदबावा. अन् त्ये वाटन्याचं काम इटोबा ब्येस करत्याल. त्यासनी वाटन्याची चांगली सवय हाय.

**विठो०**—अरे गोविंद, त्या चंद्यास म्हणावें तोंड आवर नाहीं तर मुसकटंच लाल करीन!

**चंद्या**—चंची द्या की हकडं म्हणजे माझं मीच लाल करतों.

**विठो०**—या कार्ट्यानें मस अगदीं वैतागून सोडलेंन! जेवायास बैस म्हणजे सांगतों तूंस काय तें.

**चंद्या**—( वेडावून ) जेंवायास बैस म्हणजे सांगतों तूंस काय तें—

**गोविं०**—चंद्या, गप्प बैस. कां उगीच त्याला चिडवतोस?–विठोबा, वर्तमान पत्र काढायचं काम म्हणजे जेवण का करायचं आहे? बाकी तुझा तसा समज होणं बरोबर आहे. मी इथं आचारी राहण्यापूर्वी सात रुपयांवर शाळामास्तर होतों. पण त्यांत पोट नीट भरेना तेव्हां बल्लवाचार्यांची दीक्षा घेतली. मला तेव्हां महिना तीसचाळीस रुपये मिळूं लागले. पुढं लग्नकार्यांचा हंगाम संपला तेव्हां जमलेल्या भांडवलावर मी एक फराळाचं दुकान काढलं. माझ्या दुकानाची शेवभज्यांविषयीं फारच ख्याति होती. पैसेही खूप मिळाले. हातांतल्या झाऱ्यानं कढईतलीं चुरचुरीत शेवभजीं काढण्याचा आपल्याला सराव आहेच तेव्हां कुरकुरणाऱ्या कलमानं स्वच्छ कागदावर अक्षरांची पंगत मांडून कीर्ति मिळवावी म्हणून एक भागीदार पाहून मीं एक छापखाना विकत घेतला.

**विठो०**—अन् मग तूं वर्तमानपत्र काढलेंस होय ना? बघ, मीं कसें सांगितलें तें.

**गोविं०**—तेव्हां वर्तमानपत्रांत इकडच्यातिकडच्या शिळ्याताज्या बातम्या देऊन दुकानाप्रमाणेंच तें चालवूं लागलों. त्यांत फायदा एवढाच कीं माझ्या दुकानाची जाहिरात फुकट देत असे. माझं दुकान चाललं होतंच यामुळें मला पुडे बांधण्याची रद्दी घेण्याकरितां पूर्वी जो खर्च करावा लागे तो खर्च आतां वांचला.

**साळू**—म्हणजे बहुतेक प्रति पुडे बांधायलाच संपत वाटतं?

**चंद्या०**—न्हाई, न्हाई! थोडीं जाळण्याच्या उपयोगीं पडत, अन् काई भांडीं उतरायलाबी लागत! व्हय ना गोईंदबुवा?

**गोविं०**—होय! होय!

**चंद्या०**—( नाकांत विठोबास ) बघ, मीं कसें सांगितलें तें?

( विठोबा रागावतो. गोविंदा त्यास थांबवितो. )

**गोविं०**—चंद्या, गप्प बैस. मला प्रथम आनंद वाटला, पण पुढं वर्तमानपत्राचा खर्च भागेना. इकडं दुकानावर ठेवलेलीं माणसंही चांगलीं लठ्ठ बनलीं! तेव्हां दुकानाचं दिवाळं काढून कर्ज पुरं केलं आणि वर्तमानपत्राची भागी सोडून दिली. नंतर ही जेऊनखाऊन वीस रुपयांची नोकरी धरली आणि कान पिळून घेतला कीं असल्या भलत्याच धंद्यांत म्हणून पडायचं नाहीं.

**विठो०**—मस वाटतें तुझी दिशाच चुकली. तूं जर नाटक कंपनी काढतास किनई तर तूंस खात्रीनें यश मिळतें. कारण आपल्या मराठी नाटकांची उत्पत्ति आपल्या धंद्यांतल्या लोकांपासूनच आहे. पूर्वीचे सगळें नामांकित नट मूळ आचारीपाणकेच होते.

**चंद्या०**—मग इटोबा, आपुन काढावी की न्हाई एकादी कुंपनी? तुमचा धाक बी संमद्यास्नी चांगला ऱ्हाईल अन् इस्त्रि पार्टीसाठी लई दूर जाया नग. हाः हाः हाः! काय मुरका मारलाया पन्!

**विठो०**—थांब, आतां मात्र तुझ्या कणीकेसच तिंबवून टाकतों. ( विठोबा चंद्याला मारावयास जातो; चंद्या चुकवितो. विठोबा पडतो व चंद्या पळून जातो. विठोबा उठतो व "तूं अशानें ऐकायचा नाहींस" असें म्हणत चंद्याच्या मागें धांवतो. गोविंदा व साळू 'अरे अरे' करीत जातात. )

---

# प्रवेश ४ था.

—S✻S—

**स्थळ**—बाबासाहेबांच्या बंगल्यांतील एक दिवाणखाना.

( राधाबाई, लक्ष्मीबाई, जानकीबाई बसल्या आहेत; इतक्यांत रमाबाई व यमुना येतात. )

**रमा०**—काय राधाबाई! ती आली का?

**राधा०**—कोण ? कृष्ण आणि जांबुवंती ना ? नाहीं आले.

**जान०**—पण राधाबाई, तुम्हीं त्यांना हो आज बोलावलंत कशाला ?

**राधा०**—मीं केवळ त्यांना तिकडच्या आग्रहामुळं आमंत्रण दिलं. ते नाहीं आले तर बरंच झालं !

**लक्ष्मी०**—हें ग काय बाई ! असं कां म्हणतां ? त्यांनीं असं काय केलंय् ?

**राधा०**—काय केलंय् म्हणून काय विचारतां लक्ष्मीबाई ? मीं तें सांगायलाच का पाहिजे ? अहो, नानासाहेब म्हणजे घरंदाज सरदार आणि त्यांनीं, जिच्या कुलाशीलाचा पत्ता नाहीं अशा एखाद्या भिकाऱ्याच्या मुलीशीं लग्न लावावं ? इतकंही असून ती बाई अगदीं अडाणी आणि अशिक्षित ! तेव्हां तिला या बसा म्हणणं म्हणजे मला कमीपणा वाटतो बाई !

**लक्ष्मी०**—पण मी तुम्हांला आधीं विचारतें, तुम्हीं तिला अजून पाहिली तरी आहे का ?

**राधा०**—नाहीं. मी आमंत्रण करायला गेलें होतें तेव्हां तीं दोघंही कुठं बाहेर गेलीं होतीं. तेव्हां मी त्यांना चिठ्ठी लिहून ठेवली आणि परत आलें.

**लक्ष्मी०**—तुम्ही तिला भेटलां असतां तर किनई, आपला ग्रह चुकीचा आहे, असंच तुम्हांला वाटलं असतं. अजूनही तुमचा ग्रह बदलेल–मी खात्रीनं सांगतें.

**जान०**—म्हणजे ? ती चांगल्या कुळांतली आणि सुशिक्षित आहे असं का तुम्ही म्हणतां ?

**लक्ष्मी०**—हो ! असंच म्हणतें. अलीकडच्या दृष्टीनं तिचा सुशिक्षितपणा पाहूं नका. ती खरीखुरी सुशिक्षित बायको आहे. तिच्या कुळाबद्दल तर शंकाच नको. मला तिच्या घराण्याची सगळी माहिती आहे.—

**राधा०**—( गडबडीनें ) ते पहा, नीळकंठराव आले; चला, बाजूला व्हा इथून; नाहींतर टीका म्हणजे विचारूं नका. गेली, त्यांची दृष्टि जानकीबाई-वर गेली. मलाही पाहिलं त्यांनीं ! चला, आतां चुकवून उपयोग नाहीं.

( सर्व बायका व्यवस्थित होऊं लागतात. नीळकंठराव येतात. )

**नीळ०**—( जानकीबाईकडे पाहून ) अबबब ! दागिन्यांची कोण आग ही ! या बाईनं दागिन्यांनीं गळा मढवून काढला आहे जसा ! नाटकांत एखादा

स्त्रीपाशीं आला आणि त्याच्या हातीं जर बरेच दागिने सांपडले तर तो या-प्रमाणंच गळ्याभोंवतीं दागिन्यांचं लेपण चढवितो. मला वाटतं, या बाईनं आपली किंमत वाढावी म्हणून ही दागिन्यांची भर घातली आहे. कान आणि नाक टोंचतात त्याप्रमाणं दागिने घालण्याकरितां ओठांना, गालांना, व हनुवटीला भोकं पाडून त्यांत मोठे मोठे दागिने घालण्याची युक्ति या बाय-कांना कशी सुचत नाहीं ! ( यमुनेकडे पाहून ) हे पहा, विलायती चोचले ! या पोरीनं आपल्या चेहऱ्याला चेरीब्लॉसमचं पूटच्यापूट चढवलं आहे. बैरा-गीच सजला आहे जसा ! असल्या आचरटपणानं आम्हां सुधारकांना मात्र कमीपणा येतो. या रमाबाईकडे गंगावनाचा बराच खप दिसत आहे. असल्या मूर्खपणाचं प्रदर्शन करायला यांना काय वाटतं कुणाला ठाऊक !

( बाबासाहेब येऊन त्यांना घेऊन जातात. )

**जान०**—ते खात्रीनं माझ्यावर टीका करीत असावेत !

**रमा०**—मेल्याची नजर माझ्यावर आली होती !

**राधा०**—ही स्वारी आली आहे. नीट जपा बरं ? नाहीं तर आजच्या आज जरी चाबूक मिळाले नाहींत तरी एखादी नवीन कादंबरी किंवा नाटक लिहिलं कीं तुम्हांआम्हांला ओढलंच त्यांनीं त्यांत !

**रमा०**—पण तो किनई मोठा विद्वान् आहे हो आणि त्याची टीकाही बरोबर असते.

**राधा०**—स्वारी मोठी खोल आहे हो ! मनांत काय आहे हें चेहऱ्या-वरून कुणी ओळखीन म्हणेल तर त्याची फजीतीच व्हायची ! हंसतमुख दिसलं कीं समजावंच पोटांत काळकूट भरलं आहे. डोळ्यांनीं रडेल आणि गालांनीं हंसेल अशी पाताळयंत्री स्वारी आहे.

**रमा०**—पण त्याची लेखणी किती जोरदार आहे. सगळ्या जगभर तिचा लौकीक गाजतो आहे तो उगीच का !

**राधा०**—आतां नानासाहेब आणि कमलाबाई आल्या कीं आपल्याला बघायलाच नको. हे नीळकंठरावच त्यांची फट्फजीती करून टाकतील. कान मात्र तयार ठेवा—

**लक्ष्मी०**—( स्वगत ) उपटून घ्यायला ! कुणाची फट्फजीती होईल तें समजेल आतां.

**जान०**—ही यमू आज गप्प कां ?

**लक्ष्मी०**—बाबुराव आले आहेत ना ? मग तिला बोलतां कसं येईल ?

**यमु०**—थट्टा नका करूं काकू. आज माझी दाढ ठणकते म्हणून माझ्याच्यानं बोलवत नाहीं.

**रमा०**—खरंच हो. ( कानोसा घेऊन ) मोटारचा आवाज आहे. नानासाहेबच आले !

**राधा०**—( गडबडीनें ) चला, चला, चला ! करा आतां ठरल्याप्रमाणं. ध्यानांत ठेवा ' जय सित्ताराम ' हं ? आपण तिला अगदीं घाबरवून सोडूं. मग पहा कशी बावरल्यासारखी होते ती ! आतां मासलाच होणार आहे !

( नानासाहेब व कमला येतात. सर्व बायका कमलेचें स्वरूप पाहून चकित होतात. )

**राधा०**—( स्वगत ) काय करावं मला कांहीं सुचत नाहीं.

**रमा०**—( स्वगत ) माझ्या उरांत तर धडकीच भरली.

**यमु०**—( स्वगत ) अग बाई ! काय तरी रूप हें ?

**लक्ष्मी०**—राधाबाई, त्यांना सामोऱ्या जा ना !

**नाना०**—राधाबाईसाहेब ! हें आमचं कुटुंब. ( कमलेस ) जा यांच्या बरोबर. ( बाबासाहेब येतात. ) हे बाबासाहेब.

[ नानासाहेब व बाबासाहेब आंत जातात. ]

**राधा०**—( स्वगत ) आतां करूं तरी काय ? मला चक्कर करायला लागलं आहे. किंकाळावंसं वाटतंय् !

**लक्ष्मी०**—राधाबाई ! त्यांना बसायला सांगा !

**राधा०**—( हंसतमुख करून ) या. तुम्हांला केव्हां पाहीन असं मला झालं होतं. नानासाहेबांच्या व आमच्या घराण्याचा पूर्वापार ऋणानुबंध ! शिवाय नानासाहेबांचा तर आमच्यावर फारच लोभ आहे.

**कम०**—मला हें अगोदरच सांगितलं होतं, आणि म्हणूनच मी आलें. तिकडच्या इष्टमित्रांना भेटायचं नाहीं तर कुणाला भेटायचं !

**लक्ष्मी०**—कमलाबाईसाहेब—( कमलेजवळ बोलते )

**राधा०**—( स्वगत ) आतां काय करावं ? भाषण तरी किती गोड ! मी अगदीं गोंधळून गेलें आहे. आग लागो माझ्या अक्कलेला ! आज माझी पुरी फजीती होणार.

**रमा०**—( जानकीस ) उगीच आपण न पाहतां तिची निंदा केली. राधाबाईचा चेहरा पहा कसा उतरून गेला आहे तो ! तिला धड उभंसुद्धां राहवत नाहीं. तिची फजीती होऊं देतां उपयोगी नाहीं. राधाबाई ! आम्ही आहोंत यांच्या जवळ बोलायला. तुम्हांला काम असेल ! तुम्ही जा.

**कम०**—खरंच जा. माझ्याकरितां नका तुम्ही अडून राहूं. मी यांच्या जवळ अगदीं मोकळया मनानं बोलेन. मला संकोच वाटायचा नाहीं.

**राधा०**—( हास्यमुख करून ) बरं तर, मी जातेंच मग तयारीला.

[ जाऊं लागते. ]

**लक्ष्मी०**—राधाबाई ! त्यांची सगळयाजणींशीं ओळख करून द्या ना !

**राधा०**—होय. बरं सुचवलंत. ( राधाबाईस दाखवून ) या मुन्सफीणबाई, यांचं नांव रमाबाई. यांची मुलगी ही यमुना. हिचं आतां लौकरच लग्न होणार आहे. या जानकीबाई नवरत्ने. या लक्ष्मीबाई—

**लक्ष्मी०**—माझी तुम्ही नको ओळख करून द्यायला ! बरं–तुम्ही जा आतां.

[ राधाबाई जाते. ]

( नानासा०, नीळकंठ०, बाबा० येतात. )

**नाना०**—कमले ! हेच नीळकंठराव. माझे जिवलग स्नेही आहेत म्हणून तुला सांगितलंच होतं. यांची नवीन कादंबरी तूं वाचलीच आहेस.

**नीळ०**—खरंच तुम्ही वाचलीत ?

**कम०**—तुमची कादंबरी मला किती आवडली म्हणून सांगूं ! मी कितीदां हंसलें आणि कितीदां रडलेंही पण ! तुम्ही एकदमच हंसायला आणि रडायला लावतां. एखादं उदात्त चित्र रेखाटतां, पण त्याचं अनुकरण होणें शक्य नाहीं असं कां म्हणतां ? चांगली गोष्ट करायला आम्हांला प्रोत्साहन देतां, पण ती करणं शक्य नाहीं असं सांगतां ! हें चांगलं नाहीं, खरं ना ?

**नीळ०**—माझ्या कादंबरींतलं हें मर्म एकाही वाचकाला तुमच्या इतकं कळलं नसेल. यावरूनच तुमच्या मार्मिकपणाची आणि सुसंस्कृततेची साक्ष मला पटली. पण कमलाबाईसाहेब! हें जग तुमच्याप्रमाणंच हिमालयाच्या शुद्ध हवेंत वाढलेलं असतं तर माझीं चित्रं अनुकरणीय नाहींत असं मीं केव्हांच म्हटलं नसतं. परंतु हिमालयापासून ही आमची भूमि जितकी खालीं तितकींच या भूमींतल्या लोकांचीं मनंही पण खालीं. त्यांना वर नेण्याकरितां त्यांच्या पुढं उच्च ध्येयं हीं ठेवलींच पाहिजेत. पण आपल्या नीचपणाची जाणीव झाल्या-वांचून कुणालाही वर चढतां येत नाहीं. तेव्हां ती जाणीव करून देण्याकरितां असला उपहासही आम्हांला करावाच लागतो, आणि आमच्या काकदृष्टीनं सगळ्या घाणी चव्हाट्यावर आणाव्या लागतात.

**कम०**—तुम्ही म्हणतां तें खरंच असलं पाहिजे. पण इकडच्यासारखीं आणि आपल्यासारखीं रत्नं मला इथं अनायासानं ज्या अर्थीं लाभलीं आहेत, त्या अर्थीं केवळ काकदृष्टीनंच पहावंसं वाटत नाहीं. रामायण, महाभारत वगैरे संस्कृत ग्रंथ मीं बावांच्या बरोबर वाचले. त्यांत—

**जान०**—( राधाबाईस ) अग बाई ग! हिला संस्कृतही येतंय्.

**रमा०**—मला वाटलं होतं, हिला कांहींच येत नसेल; पण हिनं कित्ती तरी वाचलं आहे! अग, रामायणमहाभारतांचीं आम्हीं नुसतीं नांवं ऐकलीं आहेत. आणि बाई ही धीट तरी किती आहे! या नीळकंठरावांपुढं चार शब्द बोला-यचे म्हणजे चांगल्या चांगल्या पुरुषांची बोबडी वळते, पण बाई ही त्यांच्यापुढं बेधडक बोलते. नीळकंठरावही तिला काय मान देतात पण!

**लक्ष्मी०**—( स्वगत ) या सगळ्या बायका पहा कशा बावरल्या आहेत. राधाबाईनं तर इथून पळच काढला. नखरा आज साफ उतरून गेला. फार नाकानं कांदे सोलीत होती.—कांहींही पाहायच्या अगोदर तर्क लढवीत बसलं म्हणजे असंच व्हायचं.

( चंद्या येऊन बाबासाहेबांस खुणावतो. )

**बाबा०**—( सर्वांस ) चला, सर्व तयारी झाली आहे.

[ सर्व जातात. पडदा. ]

# प्रवेश ५ वा.

——:※:——

**स्थळ**--राधाबाईचा दिवाणखाना.

( राधाबाई येते. )

**राधा०**—( स्वगत ) झाला, आमच्या राज्याचा शेवट झाला. आतां नानासाहेब हिला सोडून माझ्यावर प्रेम करतील अशी आशाच नको. आजपर्यंत माझ्या स्वरूपाच्या अभिमानानं सगळ्या बायकांना मी कस्पटासमान मानीत होतें, पण जी एक कुरूप, गांवढळ, अशिक्षित बायको असेल असं मला वाटत होतं, त्या या कमलेनं मला पायाखालीं पहायला लावावं ना ?–" अहाहा ? काय तरी हें सौंदर्य ! काय तरी हें रूप !" असं म्हणून हे सारे स्त्रीपुरुष तिची स्तुति करीत आहेत हें मी या कानांनीं ऐकत आहे व डोळ्यांनीं पहात आहे. मला हें कसें सहन होईल ? ती कशीही असली तरी एका गोष्टींत ती कमीच आहे. जगाचा अनुभव तिला मुळींच नाहीं. जगाच्या गोष्टींत ती खरोखरच अजाण, भाबडी आहे. मी त्यांतली पक्की दर्दी आहे. या कमलेचें सौंदर्य देवते-प्रमाणं असून मन लहान मुलाप्रमाणं शुद्ध निर्मळ आहे–आणि तिच्या डोळ्यां-मध्यें मूर्तिमंत दिसणारं हें तिचं शुद्ध आचरण पाहूनच मला लाजेनं खालीं मान घालावी लागली–पण बाई, मला लाज कां वाटावी ? परपुरुषासंबंधानं फक्त माझं मन भ्रष्ट झालं आहे. या नानासाहेबावर–हो आहे–अद्याप त्यांच्यावरच माझं प्रेम आहे. त्यांनीं जर माझा अव्हेर केला नसता, माझ्या प्रेमाला जर तृप्त केलें असतें तर माझ्या मनांत हा क्रोध, हा द्वेष कां उद्भवला असता ?–तो पहा, आनंदराव, कमलेकडे पहात उभा आहे. बेअक्कल कुठला ! मी त्याच्या-वर फिदा आहे असं त्या मूर्खाला वाटत असेल ! जा, या जगांतल्या सगळ्या बायकांचीं लुगडीं का धुईनास, मला काय करायचं आहे ! नानासाहेबांपुढं हें नुसतं माकड दिसतंय्–पण मी अशी काय उभी आहे ? मंडळी आत्तां जाय-लाही निघाली. वरवर गोड बोलून या कमलेच्या शुद्ध मनांत विष कालवीन तरच नांवाची राधा !

( कमला वगैरे स्त्रिया येतात. )

कम०--बरं मी येतें आतां.

राधा०—कां ? एव्हांच नका जाऊं गडे. अद्याप रात्र तरी का फार झाली आहे ? थांबा ना जरा !

कम०—पण तिकडून आतां थांबायचं होणार नाहीं. मी कशी तिकडं खोळंबवून ठेवूं ?

राधा०--बरं तर. आपल्या एकमेकींच्या अशाच गांठी पडल्या पाहिजेत. आपण अगदीं मैत्रिणी झालं पाहिजे हं ? माझं तुमच्यावर अगदीं सख्ख्या बहिणी-सारखं प्रेम बसलंय् गडे.

कम०—तुमच्या मनांत असल्यावर माझीही तीच इच्छा कां असूं नये. बरं येतें मी. [ जाते. ]

( जानकीबाई, लक्ष्मीबाई, सर्व विचारून जातात. )

राधा०—आतां दोन गोष्टी केल्या पाहिजेत. एक, या कमलेला प्रेमाची मोहनी घालून तिचं मन आपलंसं करून घेतलं पाहिजे आणि दुसरं, नानासाहे-बांचा माझ्याविषयींचा वाईट ग्रह दूर करून त्यांच्या मनांत माझ्याविषयीं संशय येऊं नये अशी तजवीज केली पाहिजे. नानासाहेब तर इतके थोर मनाचे आहेत कीं, संधि साधून त्यांची एकट्याची गांठ घेतली आणि आपल्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप दाखवून त्यांची क्षमा मागितली म्हणजे माझ्याविषयीं त्यांचा ग्रह उलट जास्तच चांगला होईल.–कमलेला वाईट मार्गाला प्रवृत्त करायला हा आनंदराव मला चांगला उपयोगीं पडेल.–पण नानासाहेबांसारख्या मदनाला सोडून ती याच्यावर कशी फिदा होईल ?–नाहीं, हें जुळणार नाहीं. हें नच साधेल तर निदान नानासाहेबांच्याविषयीं तिच्या मनांत असा संशय भरवून द्यायचा कीं, त्यांचं तुझ्यावर खरं प्रेम नाहीं.–तरी पण–कमलेचं त्यांच्यावरचं प्रेम अढळच राहणार.—हर प्रयत्न करून माझा लोकांतला मान, माझा प्रेमाचा ठेवा हिरावून घेऊन मला लाज वाटायला लाव-णाऱ्या या कमलेला निदान वर तोंड करून बोलतां येऊं नये असं मला केलंच पाहिजे. [ जाते. पडदा पडतो. ]

---

अंक १ ला समाप्त.

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

—***—

**स्थळ**—नानासाहेबांच्या बंगल्यामागील बाग.

( कमला सचिंत बसली आहे. )

**कम०**—किती तरी विचित्र या लोकांची तऱ्हा ! नीळकंठरावांनीं सांगितलेल्या गोष्टीचा आज तीन महिने मला चांगला अनुभव येऊं लागला आहे. या सगळ्या दिखाऊपणाचा मला तर आतां वीट आला आहे.–मी बद्रिकाश्रमीं बाबांकडे असतांना या मोठमोठ्या म्हणवणाऱ्या लोकांसंबंधानं मला मोठा आदर वाटत असे. हे समाजाचे खरे पुढारी, लोकांविषयीं अत्यंत कळकळ बाळगणारे, थोर व उदार अंतःकरणाचे लोक असावेत अशी माझी कल्पना झाली होती. पण दुरून डोंगर साजरे या म्हणीचाच प्रत्यक्ष अनुभव आला बाई ! कवि म्हणजे लोकांना सन्मार्ग दाखविणारे देवदूत ना ? पण त्यांपैकीं बहुतेक स्वार्थसाधु, कुचक्या मनाचे आणि कोत्या विचारांचेच असावेत ना ? यांच्यांत खरी काव्यस्फूर्ति तर नाहींच, उलट एकमेकांचा मत्सर आणि द्वेष करायला मात्र यांना स्फूर्ति येते. इतर लोकांचंही वर्तन किळस आणण्यासारखंच आहे. कांहीं माणसं तर इतकीं भयंकर आहेत कीं त्यांचा वाराही नसावा. या आनंदरावाचं तर मला फार भय वाटतं. याची दृष्टि कशीशीच दिसते. केव्हांही पहा, त्याची नजर माझ्यावर ! कितीही हिडीसफिडीस केलं तरी पुनः कुत्र्याप्रमाणं माझा शब्द झेलायला तयार ! यावरून याचा कांहीं तरी वाईट हेतु असावा असं नाहीं का होत ? मीं एकदां राधाबाईजवळ भीतभीत हें सांगितलं, पण त्या म्हणाल्या कीं, "त्याला असं कुत्र्यासारखं वागण्यांतच भूषण वाटतं. तूं त्याच्याकडे लक्षच देऊं नकोस, त्यांत एवढं भिण्यासारखं कांहीं नाहीं." तरी पण

मला बाई त्याची भीतिच वाटते.-बद्रिकाश्रम सुटल्यापासून इकडच्याही वृत्तींत फरक पडला आहे. तिथं असतांना प्रेमाशिवाय यांना कांहीं दिसत नव्हतं. पण इथं यांना या ऐहिक गोष्टींची किती तरी हांव दिसते. कौन्सिलर व्हायची इच्छा झाल्यापासून माझ्याशीं बोलायलाही यांना फुरसत नसते. यांना कौन्सिलर व्हायची काय जरूरी आहे? माझ्या प्रेमापेक्षां कौन्सिलरशिप् यांना जास्त प्रिय व्हावी ना? तिचा नुसता ध्यास लागला तर किती तरी वेळ हे माझ्यापासून दूर असतात; मग ती यांना मिळाली म्हणजे तर माझ्याकडे ढुंकूनही पाहणार नाहींत-माझ्या प्रेमांतील गोडी गेली का? नाहीं, माझ्याच्यानं हें सोसवत नाहीं. [ रडूं लागते. ]

( गंगू येते व तिला रडतांना पाहून स्तब्ध उभी रहाते. )

**गंगू**—( स्वगत ) अलीकडं पाहावं तर या नेहमीं दुःखांत चूर असतात! यांना काय बरं होत असावं?—आज यांना विचारावंच. ( उघड ) बाईसाहेब! अहो बाईसाहेब! आपण अशा दुःखी कां दिसतां? तुमच्या मनाला कसले कष्ट होत आहेत? मला सांगा ना. [ जवळ बसते. ]

**कम०**—( दचकून कांपऱ्या स्वरानें ) मला आणि दुःख? मला कष्ट?—छेः! गंगू, तसं कांहीं नाहीं.—तुला असं कां वाटलं?

**गंगू**—बाईसाहेब! आपण अलीकडे अगदीं म्लान दिसतां. इथं प्रथम आलांत तेव्हां कशा आनंदी दिसत होतां. पण अलीकडे पहातें तर आपली तशी वृत्ति राहिली नाहीं.

**कम०**—मला—मला—बरं नाहीं ग गंगू! [ ओक्साबोक्शी रडते. ]

**गंगू**—बाईसाहेब, असं काय करतां? आवरा ना हें दुःख. तुम्हांला एवढं कसलं ओझं झालं आहे? नका अशा रडूं!


[ कमला गंगूच्या गळ्याला मिठी मारते व रडते. ]

**नाना०**—( आंतून ) कमले! कमले!

( गंगू उठते, नानासाहेब हास्यमुख येतात पण कमलेकडे पाहून चपापतात. )

**नाना०**—काय? लाडके! तूं रडत कां होतीस? [ गंगू जाते. ]

**कम०**—( नानासाहेबांना मिठी मारून ) महाराज-कांहीं नाहीं.—मला जरा उदास वाटत होतं,—पण त्यांत कांहींच नाहीं.-पण मला अगोदर सांगा,



नाना०—काय? लाडके! तूं रडत का होतीस? [अं. २ रा प्र. १ ला पृ. २६]

माझ्यावर आपण मनापासून प्रेम करतां का ? आपल्याला माझा कंटाळा नाहीं ना आला ?

**नाना०**—( तिचा चेहरा वर करून ) लाडके ! तूं असे चमत्कारिक प्रश्न विचारावेस ?—तुझ्यावर प्रेम ? माझ्या या अंतःकरणांतला कोनान् कोपरा तुझ्यावरच्या प्रेमानं भरून राहिला आहे. माझा सगळा जीव, सगळा आनंद तूं ! तुझ्याशिवाय मला या जगांत कांहीं तरी प्रिय आहे काय ?

**कम०**—पण आपलं माझ्याइतकं कशावरही प्रेम नाहीं ?

**नाना०**—कशावरही नाहीं. असं कां विचारतेस ? ( कमला बोलत नाहीं असें पाहून ) आज तुला चमत्कारिकच लहर आली आहे. उगीच नसते विचार काढून मनाला वाईट वाटून घेतेस. अलीकडे तुला फार दगदग पडली; तुला विश्रांति हवी आहे. आपण उद्यांच शहराबाहेरच्या बंगल्यांत जाऊं.—आज आपण त्या नाटकाला जायचंच नाहीं. तें नाटकही चांगलं नाहीं, आणि तुला तें आवडणारही नाहीं. तिथं जो कांहीं गोंधळ असेल, विचारूं नकोस ! त्यापेक्षां आपण आजची रात्र गप्पागोष्टींत घालवूं झालं.

**कम०**—माझ्याही मनांत तेंच होतं—किती होतं म्हणून सांगूं !–पण आपण येऊं म्हणून राधाबाईला कबूल नाहीं का केलं ? आणि आतां लवकरच आपण जहागिरीवर जाणार, तेव्हां थोड्याकरतां कशाला मोडा त्यांचं मन !

**नाना०**—आपली आणि राधाबाईची अलीकडे बरीच गट्टी जमली आहे !

**कम०**—हो, जमलीच आहे गट्टी ! कां नाहीं जमणार ? ती किती तरी ममताळू आणि हुषार आहे ! माझ्याहून किती तरी पट ! आणि मला माहीत नाहींत अशा किती तरी गोष्टींचं तिला ज्ञान आहे. ती नेहमीं मला कांहीं ना कांहीं तरी माहिती देत असते. आपली तरी ती किती वाखाणणी करते !

**नाना०**—माझी? माझी वाखाणणी करते ! ( हंसून ) चांगुलपणा यालाच म्हणतात !–तुझा आज खरोखरीच नाटकाला जायचा बेत ठरला ?

**कम०**—ठरलाच म्हणा ना. राधाबाई म्हणत होती आजचं नाटक मोठं मजेदार आहे. मला शाकुंतल आणि हॅम्लेट किती आवडलीं पण !

**नाना०**—( स्मित करून ) पण तुला हें नाटक अगदींच निराळ्या तऱ्हेचं वाटेल. तुला या तमाशेवजा नाटकाची कल्पना नाहीं.

**कम०**—खरंच नाहीं. मला सांगा ना कसं असतं तें. मला किती तरी शिकायचं आहे. अजून मी अज्ञान आहे अगदीं!

**नाना०**—अज्ञान ?–नाहीं, लाडके, तूं पूर्ण ज्ञानी आहेस.–तुझं अज्ञान हेंच ज्ञान आहे. जगांतल्या सर्व तत्त्ववेत्त्यांनीं जरी आपलं ज्ञान एका जागीं केलं तरी तुझ्या ज्ञानाची बरोबरी होणार नाहीं.

**कम०**—आपण मनापासून बोलतां का हें ?

**नाना०**—मनापासून ?–जसं कांहीं माझ्या मनापासून नसतात अशा पुष्कळ गोष्टी मी तुला सांगतों ! छान तर्क काढतेस.–मला असं झालं आहे कीं केव्हां एकदां आपण जहागिरीवर जातों आणि पुन्हा एकदां पूर्ण सुखांत पडतों. मग तर तूं अगदीं माझी–माझी होशील !

**कम०**—आणि मग तर आपण अगदीं माझे–माझे व्हाल !–पण मग आपल्याला कौन्सिलर होऊन कसें चालेल ?–मी आपल्याला पुष्कळदां म्हटलं आहे आणि आज पुन्हा म्हणतें, कौन्सिलर होण्यांत आपल्यासारख्यांना धन्यता वाटूं नये. मला त्यांत कांहींच अर्थ वाटत नाहीं. मला तर बाई असं वाटतं कीं आपण हे सारे व्याप सोडावेत आणि सदासर्वदा असंच दोघंच रहावं!

[ चंद्राकडे पाहते. ]

**नाना०**—वा: ! तुझे डोळे चंद्राकडे लागले आहेत ! भूलोकचा चंद्र आकाशस्थ चंद्राकडेच पहात आहे, पण मी कोणच्या चंद्राकडे पाहातों आहे ?–मला वाटलंच माझ्या प्रश्नाचं उत्तर तूं चुकणार नाहींस. मला भूलोकींचाच चंद्र प्रिय आहे. ( तिच्या गळ्यांत हात घालून ) कमले ! लाडके ! तुला महत्त्वाकांक्षाच नाहीं. तूं स्वर्गीय वस्तूकडे पाहणारी ! तुला प्रेमावांचून कांहींच दिसत नाहीं. लाडके, असंच ना ?

**कम०**—यांत काय संशय ! जगांतल्या सर्व गोष्टींमध्यें प्रेमच श्रेष्ठ !

**नाना०**—अहाहा ! [ आलिंगन देतो. ]

**कम०**—आज नाटकाला जायचंच. मला आतां बरं वाटत आहे.

**नाना०**—ठीक आहे. आपल्या मर्जीप्रमाणंच होऊं द्या; आमचं कांहीं म्हणणं नाहीं. फक्त इतकंच, तें नाटक तुला आवडायचं नाहीं. तें पाहून तुला हसूंही यायचं नाहीं. आणि रडूंही यायचं नाहीं. तरी पण तुला स्वप्नही नाहीं

असा एक नवीन अनुभव आज येणार आहे. बरं, मी टपाल पहातों आणि मग फराळाला बसूं. हा मी आलोंच. [ नानासाहेब जातात. ]

**कम०**—अनोळखी प्रदेशांत एकट्या लहान मुलाची जी स्थिति होते तशीच या वेळीं माझ्या मनाची अवस्था झाली होती. परंतु ज्याच्या शक्तीवर माझ्या सर्व आयुष्याचा भार त्या उदार आत्म्याच्या दोन प्रेमाच्या अमृत-बिंदूंनींच माझं भांबावून गेलेलं अंतःकरण किती शांत झालं! त्यांना ऐहिक गोष्टींत जर आनंद वाटतो तर आपण तरी त्यांच्या आनंदाच्या कां आड या? आणि मी आड येऊन जर त्यांच्या इच्छित हेतूपासून त्यांना ढळवूं लागलें तर जगांत त्यांना कमीपणा नाहीं का येणार? आणि हें मला तरी शोभेल का? छेः! त्यांना बरं वाटेल तेंच करूं द्यावें. त्यांतच प्रेम आहे. गंगू, ( गंगू येते. ) कलकत्त्याहून नीळकंठरावांकडून ती बंगाली कादंबरी आली आहे ती काढून ठेव. नाटकाहून आल्यावर स्वारींना थोडा वेळ वाचून दाखवायची आहे आणि हें पाहा गणपतरावांना सांग कीं, नाटकाला जायचा बेत कायम आहे; थिएटरामध्यें जाऊन व्यवस्था करा. [ पडदा. ]

---

# प्रवेश २ रा.

—*—

**स्थळ**—नाटकगृहांतील रंगभूमीजवळील दालन.

( नानासाहेब व गणपतराव येतात )

**नाना०**—काय रे गणपतराव, काय–काय आहे? नाटकांतला तो अश्लीलपणा पाहून किळस आला म्हणून मी आणि कमला राधाबाईंना विचारून घरीं जाण्याच्या तयारींत होतों, इतक्यांत मला तुमच्या एकट्याशींच कांहीं बोलायचं आहे, जरा बांहेर या, जरूरींचं काम आहे. बाईसाहेबांना जरा बसूं द्या, असं म्हणून मला या रंगपटांत घेऊन आलास आणि आतां गप्प कां? कमला तिकडे कंटाळून माझी वाट पहात असेल.–अरे, तुला झालं आहे तरी काय? तुझा चेहरा असा फिक्कट कां झाला? तुझ्या हातून कांहीं चुकी घडली आहे

का ? तूं अशा फिकिरींत दिसत आहेस कीं जणूं काय तुझी अब्रूच जायचा संभव आहे.

**गण०**—( उसासा टाकून ) अब्रू आणि प्राण दोन्ही जाण्याचा संभव आहे; पण नानासाहेब, आपणच जर मनावर घ्याल तर मात्र दोन्ही वांचतील.

**नाना०**—सांग तर तुझ्याकरतां काय करूं तें ? तूं माझ्याशीं इतक्या नेकीनं वागतो आहेस कीं माझ्याहातून होण्यासारखं असेल तें मी तुझ्याकरतां करीन.

**गण०**—माझी बायको उठून—

**नाना०**—तें मला तूं सांगितलंच होतंस. आतां त्याबद्दल मनाला कां त्रास करून घेतोस ?

**गण०**—पण दोन वर्षांनीं आतां तिला मीं पाहिली.

**नाना०**—कुठं ?

**गण०**—थिएटरांत.

**नाना०**—थिएटरांत ? कुठं बायकांत बसली आहे ?

**गण०**—नाहीं. ती या नाटकांत पार्ट करते आहे. तिनं आपल्या तोंडाला सफेता फांसून आपलं तोंड उजळ केलं आहे खरं, पण त्याबरोबरच रांडेनें माझ्या तोंडाला काजळ फासून ते काळं कुट्ट केलं आहे. ती आतां मुख्य नायिका झालेली तीच माझी बायको तारा !

**नाना०**—ती तुझी बायको ? इतका निर्लज्जपणा पुरुषाच्यानंही स्त्रीवेषांत व्हायचा नाहीं. हाच का स्त्रीजातीचा विनय !

**गण०**—नानासाहेब ! आतां जास्त खल नको. ही माझी बायको आहे असं जर का कुणाला कळलं तर माझ्या अब्रूला केवढा बट्टा लागेल ! मला या भीतीमुळं भ्रमिष्टासारखं झालं आहे. मी काय करतों आहे तेंच मला समजत नाहीं. तिनं माझ्या नांवाची ही पताका दुनयेभर फिरवून माझी विडंबना करायचं बंद करावं. तेवढ्याकरतां माझं सर्वस्व ती मागत असली तरी तें द्यायला मी तयार आहे. तिनं हें सगळं घ्यावं आणि लांब कुठं तरी काळं तोंड करावं. तिनं असं केलं तरच माझी अब्रू वांचेल.

**नाना०**—अरे, तुझी अब्रू वांचण्याकरतां ती जर तुझं हें म्हणणं कबूल

मराठी १३६७ म. मा.

करील तर मी स्वतःचे आणखी पांच हजार रुपये तिला देईन. पण जिला स्वतःच्या अब्रूची चाड नाहीं तिला तुझ्या अब्रूची काय पर्वा! तेवढ्याकरतां हे नाटकांतले सुखसोहाळे! स्वतंत्रता ती सोडील? तिला कैक मोठ्या लोकांकडून गुप्त आश्रय मिळत असेल, कित्येक हरीचे लाल तिच्यापुढं लोळण घेऊन आज तिचे गुलाम झाले असतील, आणि कित्येक तर तिच्याकरतां प्राणही द्यायला तयार होतील!

**गण०**—नका,–नका पुढं बोलूं. ती जर इथून गेली नाहीं तर मी प्राण देईन. पण या असल्या विडंबनेंत राहणार नाहीं.

**नाना०**—तुला वेड तर नाहीं लागलं? अरे, असल्या बेशरम बायकोच्या दुराचरणाबद्दल स्वतःला काय म्हणून शिक्षा! तिचा तुझा संबंध तुटला; आतां काय? मी तुझं एखाद्या कुलशीलवान् मुलीबरोबर लग्न लावून देतों आणि पांच हजारांऐवजीं दहा हजार रुपये तुला देतों. हा भयंकर विचार मनांतसुद्धां आणूं नकोस.

**गण०**—मला तुम्ही एखादी अप्सरा दिलीत तरी नको! आतां पुनः लग्न नको! नको!–त्या सुखाचा अनुभव आला तितका बस्स झाला. नानासाहेब! कांहीं करा पण तिला इथून जायला लावा. मी या कामांत पडतों, असं तुम्ही कबूल करीपर्यंत मी तुमचे पाय सोडणार नाहीं. [ त्यांचे पाय धरतो. ]

**नाना०**—आतां काय करणार! बरं सोड पाय. काय करूं मी?

**गण०**—आपण तिला भेटून हें सांगा.—

**नाना०**—अरे, धडधडीत कसबीण ती! तिची भेट मी घेऊं?

**गण०**—या थिएटरमध्यें भेटायला कांहीं हरकत नाहीं. पुष्कळ लोक थिएटरांत नाटकवाल्यांना भेटतात. शिवाय तुम्हांला भेटायला नानासाहेब आले आहेत असा मीं तिला निरोपदेखील पाठवला आहे. तिचं या प्रवेशांतलं काम आटोपलं म्हणजे ती इथंच येईल.

**नाना०**—वाः! माझ्या नांवानं तूं निरोप देखील पाठविलास? चांगलं केलंस! आपली अब्रू वांचविण्याकरतां तूं माझी अब्रू मात्र घालवतो आहेस. हा मात्र तूं पुरा गाढवपणा केलास.

**गण०**—नानासाहेब ! मला खरोखरच भ्रम झाला, नाहीं तर माझ्याहातून ही गोष्ट होती का ? मला वेडच लागलं ! आतां प्राण देण्यावांचून—

**नाना०**—पण ही पहा ती आलीच. तूं जरा बाजूला तरी जा आतां.

[ गणपतराव जातो. तारा येते. ]

**तारा०**—( येतां येतां ) अरे छगन ! दोन खुर्च्या आण इथं. आपलंच नांव नानासाहेब ?

**नाना०**—होय. मी तुमच्याशीं—

**तारा०**—( हंसून ) जरा थांबा. मला थोडी सोडाव्हिस्की घ्यायची आहे; मी अगदीं गळून गेलें आहे. आम्ही स्टेजवर किती दमतों तुम्हांला कशी कल्पना असणार ? मला जरा दम तर घेऊं द्या. मग होईलच आपलं भाषण ! खरं ना ? अरे, छगन, एक पेग आण. [ सिगारेट पेटवते. ]

**नाना०**—( स्वगत ) काय हलकट आहे.

( छगन ग्लास व बाटली घेऊन येतो. )

**तारा०**—हें पहा छगन, माझं काम आलं कीं मला सांगायला ये. ( छगन जातो. पीत असतां ग्लास पुढं करून ) घ्याल का एक घोट ?–नको ?– ठीक ! पुष्कळ मोठमोठे लोक आमच्या इथं घेतात हो ! घेतां का ? हें चालत नसलं तर दुसरं भरतें.

**नाना०**—( स्वगत ) आतां कमाल झाली.

**तारा०**—बोलत कां नाहीं ? भरूं का दुसरं ?

**नाना०**—मी कधीं घेत नसतों.

**तारा०**—नाहीं ? बरं तर, नको तर नको. [ पिते. ]

**नाना०**—मला एका कामामुळं इथं यावं लागलं—


**तारा०**—तें मला ठाऊक आहे. थांबा जरा.

**नाना०**—पण मला आत्तां—

**तारा०**—आत्तां काय ?

**नाना०**—आत्तां काम आटपून परत गेलं पाहिजे. माझी बायको तिकडं माझी वाट पहात असेल.

**तारा०**—मग बायकोची कशाला एवढी भीति बाळगायला पाहिजे ?



**तारा०**—घ्याल का एक घोट ? [ अं. २ रा प्र. २ रा पृ. ३२ ]

नाना०—तो प्रश्न माझा आहे.–तुम्हांला माझ्याशीं सरळ बोलायचं आहे का नाहीं ?

तारा०—अगगग! किती राग आला पण! असं रागावून काम होत नसतं गडे.

नाना०—तुमच्या नवऱ्यानं—

तारा०—माझ्या नवऱ्यानं? कोणच्या? आत्तां स्टेजवर पाहिला त्यानं? काय केलं ?

नाना०—( स्वगत ) ही बोलूंच देत नाहीं.

तारा०—काय केलं त्यानं ?

नाना०—( त्रासून ) निव्वळ गाढवपणा !

तारा०—आपल्याला कां इतकं वाईट वाटतं? अहो, ती बायको आहे; तिनं पुरुषाचं सोंग घेतलं आहे. ती मेली माझा तेवढ्या सोंगापुरतीच नवरा !

नाना०—तुम्ही गणपतराव मोन्यांचं कुटुंब ना ?

नाना०—हो. मग कांहीं जुनी ओळख काढायचा विचार आहे वाटतं ? काय तरी बाई! आमच्या नाटकवाल्यांशीं चांगलेचांगले लोक देखील नातं जोडूं पहातात !

नाना०—मला तुमच्याशीं कांहीं एक नातं जोडायचं नाहीं. मी सांगतों तें ऐकून घ्या. तुमचा नवरा गणपतराव माझ्याकडे असतो. तुमच्या या असल्या वर्तनानं त्याच्या नांवाला काळिमा लागला आहे.

तारा०—मी नांव मिळवितें यांत त्यांच्या नांवाला कसला काळिमा ? मी कांहीं कसबीण म्हणून प्रसिद्ध नाहीं. मी नाट्यकलेला हात भार लावतें, त्या कलेनं माझी प्रख्याति होते आणि म्हणूनच तुमच्यासारखे लोक माझ्या पायांत कुत्र्यासारखे घुटमळत असतात. त्या मेल्या गणपतरावाच्या चुलीची सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करून, त्या मेल्या खापरतोंड्याच्या अर्ध्या वचनांत राहून मला एवढा लौकिक कमवतां आला असता का ?

नाना०—अनीतीच्या पायावर उभारलेली इमारत ढांसळून पडून तींत राहणारांचा केव्हां ना केव्हां चुराडा होणार. पतिनिष्ठा हाच बायकांचा धर्म !

तुमचं वांकडं पाऊल पडलं ही गोष्ट तुमच्या स्वतांच्या अब्रूला, तुमच्या नवऱ्याच्या अब्रूला, तुमच्या कुळाच्या अब्रूला—

**तारा०**—अहो महाराज! हे तुमचं अब्रूचं पुराण बस्स करा. मला हा तुमचा कोरडा उपदेश नको आहे.

**नाना०**—मी तुम्हांला कोरडा उपदेश करीत नाहीं. तुमचे सर्व ऐषआराम चालावेत अशाच योजनेनं मी बोलत आहे. तुम्ही हा नाटकाचा धंदा सोडा.

**तारा०**—आणि काय करा?

**नाना०**—लांब कुठं तरी जाऊन रहात असाल तर गणपतराव तुम्हांला त्यांची सर्व मिळकत-सरासरी दहा हजारांपर्यंतची द्यायला तयार आहे. शिवाय त्याच्याकरतां मी स्वतः पांच हजार तुम्हांला निराळे देतों. मात्र तुम्ही त्याची बायको आहां, ही गोष्ट उघडकीला येऊन त्याची अब्रू जाण्यापूर्वी इथून तुम्हीं कुठं तरी दूरच्या प्रांतांत जाऊन राहिलं पाहिजे.

**तारा०**—तुम्हांला इतकं कसं कळत नाहीं, कीं ज्या धंद्यावर मीं एवढा नांवलौकिक मिळवला तो का आतां मी सोडीन. तुम्ही मला पैशाची आशा दाखवतां! पण मला कांहीं कमी का आहे इथं? भरपूर पैसा आहे, मोठमोठ्या लोकांवर वजन आहे, मान आहे, सारं कांहीं आहे. शिवाय कुणाची बांधलेली नाहीं, मनाला वाटेल तसं वागावं. असे दहा हजार आणि पांच हजार मी एका घटकेंत मिळवितें. हें सुख सोडून हद्दपार झालेल्या एखाद्या माणसाप्रमाणं कुठं दूर जाऊन मी कां राहूं? तुम्हांला तरी सांगायला कसं वाटतं कुणाला ठाऊक!

**नाना०**—विचार करा. त्याचा स्वभाव तुम्हांला माहीत आहे. अब्रू म्हणजे प्राण आहे त्याला. तुम्ही उठून गेलां एवढ्यामुळं घरदार सोडून या परक्या ठिकाणीं येऊन तो राहिला आणि आतां इथंही तुम्ही त्याची बायको आहां या गोष्टीचा जर बभ्रा झाला तर तो आत्महत्याच करील.

**तारा०**—मग, करीना आत्महत्या! त्यांत माझं काय नुकसान आहे? आत्महत्या केल्यावर त्याचा बदलौकिक व्हायचा चुकेल वाटतं?—पण तें कशाला? मी इथून मुळींच जाणार नाहीं. मात्र मी त्याची बायको आहे

ही गोष्ट कुणालाही कळूं देणार नाहीं; याबद्दल तुम्हीच सांगतां म्हणून तुम्हांला वचन देतें.

**नाना०**—तुम्ही एवढं तरी कबूल करतां यांत मला आनंद आहे. पण माहितीच्या एखाद्या गृहस्थानं तुम्हांला ओळखलं आणि ही खबर गांवांत पसरली तर—

**तारा०**—मला हें कांहीं समजत नाहीं. मी करीन म्हटलं आहे तेवढं करीन; यापेक्षां माझ्याकडून कांहींएक होणार नाहीं. ( छगन येतो ) काय रे, काम आलं का ?

**छग०**—होय, पडदासुद्धां उघडला !

**तारा०**—होय का ? छगन, हे ग्लास आणि या खुर्च्या घेऊन जा.

[ छगन खुर्च्या घेऊन जातो. ]

**नाना०**—( तारा जाऊं लागते ) पण मी पुन्हा एकदां केव्हां येऊं ? तुमच्याशीं पुन्हा एकदां बोलायचं आहे. तो खरोखर प्राण देईल त्याची कींव येऊं द्या.

**तारा०**—मला जास्त बोलतां येत नाहीं. मीं एकदां सांगितलं तेंच.—माझं काम आलंच. [ धांवत जाते. ]

**नाना०**—( स्वगत ) अरेरे ! किती निंद्य हें आचरण !—अंगावर शहारे येतात.—गणपतराव ( गणपतराव येतो ) अरे, असं गांगरल्यासारखं काय करतोस. तूं ऐकलंसच सगळं ?

**गण०**—हो ऐकलं.

**नाना०**—पाहिलंस ? ती कांहीं ऐकत नाहीं. काय करायचं आतां !—पण असा धीर सोडूं नकोस आणि भलताच अविचार करूं नकोस. मी पुनः प्रयत्न करीन, समजलास ? ( त्याचा हात धरून ) अरे, तुला ताप भरला आहे. माझ्या गाडींत बसून घरीं जा. मी दुसरी गाडी मागवीन आणि कमलेला आणि राधाबाईंना घेऊन मागाहून येईन.

**गण०**—पण ही गोष्ट कमलाबाईसाहेबांना कळवूं नका हो.

**नाना०**—कां ? मी तिला सगळ्या बऱ्यावाईट गोष्टी सांगत असतों. तिला मसलतींत घ्यायला कांहीं हरकत नाहीं.

३२०४

**गण०**—नका, त्यांना कळवूं नका. नाटकांतले तिचे ते अश्लील हातवारे आणि मुद्रा पाहूनच त्यांच्या अंगावर शहारे आलेले मीं पाहिले. तीच माझी बायको असं त्यांना कळल्यावर मला त्यांच्यापुढं हें काळं तोंड न्यायलाही शरम वाटेल.

**नाना०**—बरं तर;-पण तूं जा आतां. ( गणपतराव जातो ) हा बिचारा किती प्रसंगांत सांपडला आहे! याची स्थिति खरोखर नीट नाहीं.-तारेशीं पांच मिनिटं भाषण म्हणजे निव्वळ नरकवास! पण तो पत्करला पाहिजे. नाहीं तर तो म्हणतो त्याप्रमाणं खरोखर आत्महत्या करील.-त्याला वांचवण्याकरतां आपली शिकस्त केली पाहिजे. [ जातो. ]

---

# प्रवेश ३ रा.

—:*:—

**स्थळ**--बाबासाहेबांची बाग. ( आनंदराव येतो. )

**आनं०**—ही अद्याप कां बरं येत नाहीं ? मीं तिला खूण केली ती तिनं पाहिली यांत शंकाच नाहीं. कारण लगेच चंद्रसूर्य लाल झालेले माझ्या नजरेस आले.-ती माझ्यावर आषक तर आहेच;-पण नानासाहेबांवर तिचं मन गेलं असावं असा मला संशय आहे. नानासाहेब हिच्या नादीं लागले तर हिच्याहून शतपटीनं मारू अशी कमला आमच्या बाहुपाशांत आपण होऊन धांवत येईल. आणि मग या राधेनं-अरे! पण ही आलीच. कोणी पाहील कीं काय या भीतीनं वरचेवर मागं वळून पाहाते आहे. [ राधाबाई येते. ]

**राधा०**—( रागानें ) एवढ्या मंडळींत येऊन मला खूण करायला कांहींच कसं वाटलं नाहीं! मी कांहीं तुमची बायको नाहीं. विषयवासनेनं मनुष्य वेडावून गेला म्हणजे त्याची सगळी अक्कल जाते. निव्वळ हलकटपणा आहे हा!

**आनं०**—तुम्ही विनाकारण माझ्यावर घसरतां. एकाद्याला वाटेल तुमच्याजवळ माझी एक पैचीही किंमत नाहीं.

**राधा०**—अबबब! एवढी? छेः! छेः! ही जास्तच झाली. तुमची एक फुटकी कवडीचीही किंमत नाहीं माझ्याजवळ!

**आनं०**—( तिच्याकडे रागानें पाहून ) बरं! बरं!

**राधा०**—( वेडावून ) बरं! बरं!

**आनं०**—( हंसून ) हें पहा, आतां आपुकमापुकाचं भांडण व्हायची वेळ आली आहे. मेहेरबानी करून तेवढा नका आणूं प्रसंग!

**राधा०**—( रागानें ) मीं कधीं तरी आणला आहे का? तुम्ही जशी आतां मला बोलायला जागा ठेवलीत तशी मीं कधीं तरी तुम्हांला जागा ठेवली आहे का?

**आनं०**—( हंसून ) नाहीं. कबूल! म्हणूनच म्हणतों, आतांदेखील मला कुरकुरायला जागा ठेवूं नका.

**राधा०**—शुद्ध जनावर आहां झालं!

**आनं०**—शाबास! छान हुद्दा दिलांत! आपण त्या कमलेसारख्याच स्पष्टवक्त्या आहांत. मात्र तिच्यापेक्षां थोडा सभ्यपणा-कमी आहे.

**राधा०**—मला तुमच्याजवळ कांहीं तो शिकायला यायचं नाहीं. माझ्यामागं कशाला लागतां तुम्ही?—त्या नानासाहेबांच्या बायकोचीं लुगडीं धुवायचं काम तुम्हांला पाहिजे ना? तुम्हांला मिळत नाहीं मला माहीत आहे. मी करूं का शिफारस तुमची तिथं?

**आनं०**—जपून-हळू-मला तापवूं नका हं! मलाही कांहीं तरी करतां येईल! मीं मनावर घेतलं तर नानासाहेबांच्या बायकोवर आपलं जें 'निस्सीम प्रेम' आहे त्यांतली खुबी सांगून नानासाहेबांचे डोळे मला चांगले उघडतां येतील समजलांत? मग आपल्याला कसं काय वाटेल? आपल्याला रुचेल का हें—तें जाऊं द्या. या वेळीं मी थोडा रंगांत आहें. एक आनंदाची बातमी तुम्हांला कळवावी म्हणून तर तुम्हांला खूण केली. तुम्ही तीं ऐकून देखील घेत नाहीं ना?

**राधा०**—कसली बातमी?

**आनं०**—हे सद्गुणाचे पुतळे नानासाहेबदेखील सरतेशेवटीं तुमच्याआमच्यासारखे मनुष्यच आहेत! तुमच्याआमच्यासारखे त्यांनाही विकार आहेत! माझ्यावर जितकी सहज जादू चालली तितक्याच सहज रीतीनं तुम्ही त्याला भारून टाकाल! काय, बातमी ऐकणीय आहे कीं नाहीं?

**राधा०**—हें असलं बोलणं माझ्या नाहीं हो कामास पडायचं. आपलं त्या कमलेवर मन गेलं आहे म्हणून मला नानासाहेबांच्या गळ्यांत अडकवावयाची मसलत! मग मला अगोदरच नादीं लावायचं नव्हतं. [ डोळे पुसते. ]

**आनं०**—असं काय करतां? तुम्हांला एवढं कसं कळत नाहीं? माझ्या म्हणण्याचा इतका साधा अर्थ तुमच्या लक्ष्यांत येत नाहीं? मग तुम्ही अगदीं बथ्थड आहां!–असं बोलतों म्हणून रागवाल पुन्हा हो!–आतां मी अगदीं थोडक्यांत स्पष्ट सांगतों,–हा नानासाहेब दुसऱ्या मोठमोठ्या भोंदूसारखाच तारेकडे जात असतो; आणि तारेकडे जाणं याचा अर्थ तुम्हांला माहितच आहे. अगदीं सोप्या शब्दांत सांगायचं म्हणजे त्याला आपल्या बायकोचा वीट आला म्हणून त्यानं निराळं पाखरूं देखील ठेवलंन्!

**राधा०**—( एकदम त्याच्याकडे पाहून ) तुमची खात्री आहे याबद्दल?

**आनं०**—पुरी खात्री झाली आहे माझी!–तुम्ही, कमला आणि नानासाहेब नाटकाला गेलां होतां तेव्हां नानासाहेब तारेला भेटायला तिच्या रंगाच्या खोलींत गेले होते म्हणून तुम्हीच मला चिठ्ठी पाठविलींत. त्या वेळीं तारा आणि नानासाहेब यांच्यासंबंधानं मलाही संशय आला, आणि आतां तर तो अगदीं दृढ झाला. नानासाहेब तारेची नेहमीं मुलाखत घेतात. त्यांनीं तिला पुष्कळ पत्रंही लिहिलीं आहेत. त्या नाटकमंडळींत तिची याबद्दल पुष्कळ थट्टाही चालते आणि ती फिदी फिदी हंसते यावरून तें स्पष्टच होतं. फार कशाला? परवांच्याच दिवशीं गणपतरावाची प्रकृति पहायला जाण्याचा बहाणा करून ते शहरांत आले होते, तेव्हां तर ते तारेला भेटायला तिच्या बिऱ्हाडीं गेले होते बिऱ्हाडीं! मीं प्रत्यक्ष पाहिलं आणि तिनंही मला सांगितलं. मी तिच्याकडे असाच कधीं कधीं जात असतों. आमची थोडीशी––

**राधा०**—( विचार करीत ) हें ऐकून तिची छाती फाटून जाईल.

**आनं०**—कुणाची?

**राधा०**—तिची! कमलेची! या बातमीनं तिच्या अंतःकरणाला धक्का बसून ती खचून जाईल असं तुम्हांला नाहीं वाटत?

**आनं०**—तुम्हांला तेंच हवं ना? काय हो!–स्त्रियांचं अंतःकरण मृदु, कोमल असतं असं म्हणतात खरं, पण असल्या बाबतींत मला तर असा अनुभव

आहे कीं, तें दगडापेक्षांही कठीण अशा पदार्थापासून बनविलेलं असावं. तरी पण आपण परवानगी द्याल तर कमलेला नानासाहेबांची आठवण होऊं देणार नाहीं.

**राधा०**—तुम्ही ?

**आनं०**—हो हो मी-मी तिला आधार देईन. एका अर्थी हें फार चांगलं झालं असं तिला वाटेल!

**राधा०**—बेलाशक मनांत मांडे खा.

**आनं०**—मला चिडवूं नका हं! पैज हवी तर. मी म्हणतों हें खरं झालं नाहीं तर स्त्रीचरित्र मला समजत नाहीं असंच म्हटलं पाहिजे.

**राधा०**—( स्वगत ) बरं होत आहे! याच्या गळ्यांत कमलेची धोंड पडली तर मला हवं तेंच मिळालं, तूर्त माझ्या मागची पिटापिटही नाहींशी झाली. ( उघड ) ठीक आहे. माझी खात्री आहे, कमला तुम्हांलाच काय पण ब्रह्मदेवालाही भीक घालावयाची नाहीं. ठरली पैज ?

**आनं०**—ठरली.—बोल बोल करतां तिला गुंगवून टाकली नाहीं तर नांव बदलीन.

**राधा०**—अस्सं! हंः हंः हंः हंः ! [ जाऊं लागते. ]

**आनं०**—थांबा जाऊं नका. एक गोष्ट मात्र तुम्हीं माझ्याकरितां केली पाहिजे. एवढंच करा, माझ्यासंबंधानं कमलेजवळ गोष्टी काढीत जा; तिला मी चांगला वाटेन असं कांहीं तरी सांगत जा; माझी तिच्याजवळ खूप स्तुति करीत जा. कशी कराल?—हं अश्शी! आणि तिचा माझ्यावर विश्वास बसेल—असं करा. समजलांत ?

**राधा०**—समजलें. कसं करूं ? इसापनीतींतल्या बगळा आणि लांडग्याच्या गोष्टीप्रमाणं, होय ना ? बिचाऱ्या बगळ्यानं लांडग्यावर विश्वास टाकला आणि बिचाऱ्याला लांडग्यानं खाऊन टाकलं!—ठीक. मीं तुम्हांला मघांशीं सांगितलंच आहे, मी तुमची शिफारस करीन म्हणून. तुमच्या इच्छेप्रमाणं तुम्हांला जागा मिळणार नाहीं, माझी खात्री आहे. मी असंही सांगून पाहीन कीं तुम्हीं पूर्वीच्या जागेवर उमेदवारींत आपलं कौशल्य नीटसं दाखवलं नाहीं म्हणून तुम्हांला ती जागा मिळाली नाहीं. असंच ना ?

( आनंदराव तिच्याजवळ जातो, ती थोबाडींत देते; इतक्यांत साळू सोडा-बॉटरच्या बाटल्या खडबडवीत येते. )

**आनं०**—(चपापून ) ही सटवाई इथ ूठून आली !

**राधा०**—तूं काय करीत होतीस ग इथं ?

**साळू०**—मी ? मी इथं नव्हतें बाईसाहेब. मी त्या तिकडं लांब लतामंडपांत बाबासाहेब आणि कांहीं मंडळी बसली आहेत त्यांना सोडा, लिंबू घेऊन गेलें होतें. [ राधाबाई जाते. आनंदरावही हंसत जातो. ]

**साळू**—( स्वगत ) बाईसाहेबाचं खरं स्वरूप आनंदरावाजवळ दिसतं ! मी त्यांचीं पत्रं उघडून नेहमीं वाचतें आणि चोरून हीं अशीं भाषणं ऐकतें, म्हणून मला त्यांचं रूप चांगलं कळूं लागलं ! असल्या चालीच्या बाईजवळ कशाला राहिलें असंच आतां वाटूं लागलं आहे. बाईसाहेबांच्या मनांतून नानासाहेबांवर कांहीं तरी बालंट आणून कमलेला दुःख द्यायचं आहे काय ! आम्ही चाकर माणसं म्हणजे यांचाच पगार घेऊन यांच्याच गोष्टी उघडकीला आणणारे हेरच नाहीं तर काय !—ठीक. तशीच वेळ आली तर गंगूला सांगून तिच्या बाई-साहेबांना जागं केलं पाहिजे.—हे कोण ? गोविंदबुवा ! अहो गोविंदबुवा ! जरा इकडं या. ( गोविंदा येतो ) या नाटकांत तारा तारा म्हणून कुणी बाई आहे नाहीं ?

**गोविं०**—कोण, तारा ? ती राधाकृष्ण प्रासादिक तारा ना ? तुला माहीत नाहीं ? नाहीं हो, पण तुला कशी माहीत असणार ! या सगळ्या गांवांत असा एक देखील पुरुष मिळणार नाहीं कीं त्याला ती माहीत नाहीं. अग, नाटकांत सोंग घेणारी एक हलकट कसबीणच आहे ती.

**साळू**—इश्श ! तशी का ती आहे ? तशी जर ती आहे तर नानासाहे-बासारख्यांनीं आपल्या बायकोला चुकवून तिला भेटावं का ? आणि या आनं-दरावाची आणि तिची एवढी जानपछान असावी कां ?

**गोविं०**—आनंदराव वाटेल त्या बाईकडे जाईल. या तारेसारख्या त्याच्या कितीक रखेल्या असतील. कवडी किंमतीचा मनुष्य आहे तो ! मी आपले जोडे पुसायला देखील असला मनुष्य ठेवणार नाहीं. पण नानासाहेबांसंबंधानं—

साळू, हें खरं नसेल. ते असल्या फंदांत पडतीलसं वाटत नाहीं. तरी पण मनुष्यस्वभाव आहे, काय नेम सांगावा!

**साळू**—कमलाबाईसाहेब किती उत्तम बायको आहे!

**गोविं०**—अग, आमच्यासारख्यांनीं लोटांगण घालावं तिच्यापुढं! खरी माउली आहे!

**साळू**—आणि म्हणूनच आपल्या बाईसाहेब तिच्याविषयीं इतक्या जळत आहेत त्या. तिचा जीव घ्यायलाही त्या कमी करायच्या नाहींत! ( जवळ येऊन हळू ) मी आतां सांगतें तें लिहून ठेवा गोविंदबुवा—नीट लिहून ठेवा—नानासाहेबांवर कांहीं तरी बालंट येणार आहे; कमलाबाईसाहेबांवर कांहीं तरी प्रसंग येणार आहे; आणि त्याच्या बुडाशीं कोण कोण आहे हें या साळूला पक्कं ठाऊक आहे. [ साळू जाते.]

**गोविं०**—साळूला ठाऊक आहे! आणि हा गोविंदाही नुसत्या पोळ्या लाटीत बसला नाहीं. मलाही तें ठाऊक आहे! कड्याकुलपांत कृत्य केलं असलं तरी तें उघडकीला आल्यावांचून रहात नाहीं.

( गोविंदा जातो. चंद्र्या येतो. )

**चंद्र्या**—खोडी केल्याबिगर पोटच भरत न्हाई. गोइंदबुवा ' असं करू नगस तसं करू नगस !'' म्हूनशान रोज फुंकणी फुकत्याती; साळू 'गप रहा गप रहा ' म्हून सारखं दळण दळते अन् या इटोबाचा हात वरवंट्यावानी रोज माझ्या पाठीवर फिरतुया पन आपनाल्ही काइ गप न्हावत न्हाई.—हा कोन इटोबाच येतुया. हातामंदी कागुद हाये आन् हा त्यो कागुद चाटतोया कशापाईं?—कायबी गोड त्या कागुदामंदी गुंडाळून आनलं असल तवा चाटतुया. हा बामन लई घानेरा बगा?

( विठोबा एका तसबिरीचे मुके घेत येतो. )

**विठो०**—( स्वगत ) हंः हंः हंः! किती नामी आहे! काय पण सुंदर आहे! हीस पहावें म्हणून परवां पावलीस खर्चून नाटकासही गेलों. माझ्याकडेस तिचें लक्ष्य यावें म्हणून एकदा मोठ्यानें ' वन्स समोर ' म्हणून ओरडलों, तों लागलीच तिनें माझ्याकडेस पाहिलेंच! गम्मत ही कीं सारे लोक माझ्याकडेस पाहून मस हंसायास लागले. हं हंः हंः हंः!

[ तसबिरीचे मुके घेतो. ]

**चंद्या**—अरेच्या! हा बामन त्या कागदाच मुक काय घेतुया! याह्नी येड तर न्हाई लागलं!

**विठो०**—आतां खिशांत ठेवावें. कुणी पाहिल्यास पंचायतीस व्हायचें.–पण नाहीं, पुन्हा एकदां ध्यावेंच. [ तसाबिरीचे मुके घेतो. ]

**चंद्या**—आतां कसं करावं बरं?–हां हां! [ झाडामागें दडतो. ]

**विठो०**—( कानोसा घेऊन ) काय बरें खुसबुसतें आहे? या बागेंत भूत आहे असें लोक म्हणतात. तें तर आलें नाहीं ना? मनुष्य पापांत निमग्न झाला म्हणजे भुतास फावतें. माझ्या अंगास पाणी सुटायास लागलें. एकदम घराकडेस जावें. [ जाऊं लागतो. ]

**चंद्या**—( डोकीवर धोतर घेऊन भेडसावतो ) हां! [ पुन्हा दडतो. ]

**विठो०**—ओ! ओ! ओ! [ असें ओरडत धांवत सुटतो. ]

( साळू येते. )

**साळू**—अहो असं ओरडतां कां?

**चंद्या**—गाढवावानी!

**साळू**—अहो असे भेदरून पळतां कुठं? [ विठोबाला धरते. ]

**चंद्या**—पाय न्येत्याल थतं!

**साळू**—अहो तुम्हांला झालं आहे तरी काय?

**चंद्या**—दांतखिळी बसलीन् काय!

**विठो०**—तें–भू–भू–भू–त—

**साळू**—( थोडी घाबरून ) भूत! तुम्हांला भूत दिसलं कीं काय?

( चंद्या पुन्हा भूत दाखवितो. )

**विठो०**—तें–ब–घ–आलें.

**साळू**—( घाबरून ) अरेरे, बिचाऱ्याला झपाटलं बरं! विठोबा, घाबरूं नका. मी घरांत जातें आणि नारळ आणतें उतरून टाकायला.

**विठो०**—जाऊं नकोस, येईल.

**साळू**—( जास्त घाबरून ) भिऊं नका, भिऊं नका.–कुणाला हांक मारीन तर कुणीच जवळ नाहीं. [ चंद्याच्या आंगावरून जाते. ]

**चंद्या**—( तिला भेवडावून ) हाँ!

( साळू किंकाळत विठोबास बिलगते )

**विठो०**—( ओरडून ) ओ–आलें–धरलेंन्—

**साळू**—( पुन्हा किंकाळते )

**चंद्या**—( आनंदानें नाचत ) छान मजा हाय ! अशी कंदोंबी पायली न्हवती ! [ पुन्हा भेवडावतो. विठोबा व साळू एकामागून एक ओरडतात. ]

( गोविंद येतो. )

**गोविं०**—अरे, काय आहे काय ? वेड्यासारखे ओरडतां काय ? अरे, आतां भिऊं नका.–ही सारी भुताटकी आहे. मीं करतों तिचा बंदोबस्त ! मी मांत्रिक आहे. भिऊं नका. किती तरी भुतं मीं आजपर्यंत बाटलींत भरून गाडली आहेत ! खवीस म्हणूं नका–म्हशा म्हणूं नका–ब्रह्मसंमंध—

**विठो०**—आला कीं काय ? आँ ! [ किंकाळतो. ]

**साळू**—( किंकाळते ) ई !

**गोविं०**—अरे घाबरूं नका. आतां मंत्र घालतों. ( खडे गोळा करून मंत्र टाकतो ) छु मंतर–छु मंतर–छु मंतर ! झाला, बंदोबस्त झाला. अतां भूत इथून जायचंच नाहीं. अडकून राहिलं तें आतां !

**चंद्या**—भूत असल तर जानार की न्हाई ! हाबी दिवाना बनला.--आतां कसं करावं ?–हां हां ! असा वळसा घालूनशान यास्नी भ्येटाया जावं म्हंजे आनखी गम्मत ! [ जातो. ]

**गोविं०**—काय रे विठोबा–काय साळू–आतां कसं वाटतं तुम्हांला ? आतां भीति उडाली ना ? हे घ्या खडे. पदराला बांधा म्हणजे पिशाच्च आलं तरी स्पर्श करणार नाहीं.

**विठो०**–पण आतां भेडसावणार नाहीं ना ?

**गोविं०**—( चंद्या होता तिकडे पाहून ) नाहीं, आतां तें भेडसावणार नाहीं.

**विठो०**—मस तें ताडमाड उंच दिसलें कि रे !

**साळू**—आणि गोविंदबुवा, मला किनई तें अगदीं ठेंगणं दिसलं !

**गोविं०**—पाहिलंत ? तें पिशाच यांत शंकाच नाहीं. ( चंद्या येतो. ) चंद्या ! बरा आलास. अरे, आतां केवढा घोंटाळा उडाला होता ! मला बीरमंत्र येत होते म्हणून बरं झालं !—

**विठो०**—नाहीं तर या साळूचा आणि माझा आज निका—

**चंद्या**—निका कशापाई ? लगीन करायापायीं मुसलमान व्हनार व्हता कीं काय ?

**साळू**—थट्टा काय करतोस मेल्या ?–अरे आम्हांला भुतानं झपाटलं होतं हो !

**चंद्या**—( भय वाटलेंसें दाखवून ) काय भुतानी ?

**गोविं०**—अरे हो चंद्या. अरे तुला कांहीं त्याची भीति नाहीं.

**विठो०**—पण काय रे गोविंद, आमच्या कोंकणांत शिमग्यांत होळीवर किनई भूत माणसाचें रूप घेऊन खेळायास कि रे येतें !

**गोविं०**—अरे, कोंकणांतली गोष्ट कशाला ? आतां आपण बसलों आहों ना ? यांत सुद्धां आतांचं तें भूत कुणाच्या ना कुणाच्या रूपानं असायचं !

**साळू**—( घाबरून ) मग गोविंदबुवा, त्याला मंत्रानं बांधून टाका.

**विठो०**—( गोविंदाचा हात धरून ) तूं मांत्रिक आहेस. मस वांचीव रे !

**गोविं०**—मी त्याला आत्तां पकडतों. ( माती हातांत घेऊन थोडा वेळ मंत्र म्हणतो. )

**चंद्या**—( स्वगत ) हा बामनबी एडा बनला ! हा माझ्या तडाख्यांत सापडाया होवा व्हता, म्हंजे गामनबुवा बागरून नंदी खाकत मारून पचाच्या काठानं पळत सुटल असतं !

**गोविं०**—( माती चंद्याच्या आंगावर मारून ) पकडलं !

[ चंद्याचा कान धरतो. ]

**चंद्या**—असं काय एड्यावानी करतासा ? मी चंद्या हाय चंद्या !

**गोविं०**—नाहीं. तूं भूत आहेस. कबूल हो नाहीं तर तुला झोंडपतों –साळू ! धांव एक वेताची छडी आण.

**चंद्या**—न्हाई–न्हाई–मी कबूल व्हतों. मी चंद्या हाय भूत न्हाई.

**गोविं०**—पुन्हा नाकबूल ?–भुता ! कबूल हो, नाहीं तर तुला आतां भाजतों. विठोबा, एक कोलीत घेऊन ये.

( विठोबा व साळू घाबरून बसतात. )

**चंद्र्या**—नका, मास्नी भाजूं नका गोइंदबुवा ! मी भूत व्हतों पन आतां न्हाई. या इटोबाची वाईच मजा केली आन् ही साळूमातर उगीच सांपडली.

**विठो०**—मस या कार्ट्यानें भेडसावलेन एकूण ?–थांब तुझा कानच खुडून देतों हातावर ! [ त्याचा दुसरा कान धरतो. ]

**साळू**—( चंद्र्याच्या मागें जाऊन त्याला बडवून ) कार्ट्याला मजा पहा-यला पाहिजे ना ? ही घे मजा मेल्या !

**गोविं०**—राहूं दे साळू ! सोड विठोबा !–मीं पहिल्यापासून गुलामाचे खेळ पाहिले. पण तुमची खात्री होणार नाहीं म्हणून हे लुटुपुटीचे बीरमंत्र तयार केले. जा गुलामा, पुन्हा असं करूं नकोस. अरे, घाबरून त्यांचे प्राण जायची वेळ आली होती. ऐक साळू–

**चंद्र्या**—( स्वगत ) मसलत आंगावर आली इचिभन !

**विठो०**—( स्वगत ) मसलतीस आंगावर येणार ! [ शोधतो. ]

**चंद्र्या**—ह्या गोइंदबुवानीं समदी घान क्येली.–पन ह्या इटोबा काय सोधतोय बरं ?–हं हं ! मंगाशीं मुक ध्येत व्हता त्यो कागुद असल.–त्यो बगा, आपून जाऊन झटाकदिशीं उचलून घ्यावा.

[ कागद उचलतो तोंच विठोबा धांवत येतो. ]

**विठो०**—( स्वगत ) आंगावर आलेंच.

**चंद्र्या**—आं! इचिभन ही तसबीर हाये–अन् एका आवची !–थांब बामना, गोइंदबुवाला सांगतों.

**विठो०**—चंद्र्या, तूं आतां चिप बैस हां–

**चंद्र्या**—मी कां म्हून चिप बसन.--गोइंदबुवा ! ह्ये आपल्या इटोबाचं परताप ! या तसबीरीच ह्या इटोबा मुक ध्येत व्हता.

[ तसबीर देतो. ]

**गोविं०**—अरे ही तारेची तसबीर ! काय रे विठोबा ! कुठं पैदा केलीस ही ? हा चंद्र्या काय म्हणतो ऐकलंसना ?

**चंद्र्या**—आतां कस बोलस्याल !–( विठोबा डोळे वटारतो ) परान जाई-पावत डोळ फाडलत तरी आता म्येनार न्हाई.

**गोविं०**—विठोबा, बरा सांपडलास. आणि या पोरानं तुझ्या तोंडांत शेण घातलं हेंही ठीक झालं. त्या तारेचे मुके घ्यायला तुला शरम कशी नाहीं वाटली ?

**विठो०**—असें भलतेंच काय बोलतोस रे गोविंद ! मी कधीं तरी असें केलेंय काय ?

**गोविं०**—अरे, तुला तारा मिळत नाहीं म्हणून तूं तसबिरीवरच तहान भागवतोस ? तुझं पाप कांहीं कमी नाहीं. छेः ! छेः ! शुद्ध पशु आहेस तूं !

**विठो०**—पश्चात्तापास झाल्यावर लाजेस धरून काय करायचें ? गोविंद, मस आतां बोलूं नकोस. मस खरोखरीच पश्चात्तापास झालें आहे. मी त्या तसबिरीस फाडून टाकतों पहिल्यानें. [ तसबीर फाडतो. ]

**गोविं०**—ठीक असंच कर.—चला आतां, कामाला लागा. चंद्र्या, जा दिवे लाव. [ गोविंदा व साळू जातात. ]

**चंद्र्या**—अन् आतां इटोबानं त्येच क्येलं न्हाई तर काय ?

**विठो०**—राक्षसा ! चल आतां नको छळूस मस. तुझ्या पुढें लोटांगण घालतो. [ चंद्र्यापुढें लोटांगण घालतो. पडदा. ]

---

# प्रवेश ४ था.

—:*:—

( नानासाहेबांच्या बंगल्यांतील एक दालन. राधाबाई येते. )

**राधा०**—( स्वगत ) नानासाहेबांची तारेशीं खरोखरच जानपछान आहे तर !—वाः ! हें कसं माझ्या पथ्यावर पडलं पण ! नाटक चालू असतांना नानासाहेब तिथून उठून गेले तेव्हां ते तारेला भेटायला पडद्यांत गेले असं त्या वेळीं मीं कमलेला मनचंच सांगितलं—पण बाई पहातें तर नानासाहेब तिथं खरोखरच गेले होते ! कमलेनं विचारल्यावर त्यांनीं ही गोष्ट कमलेजवळ कबूलही केली !—पण लबाडच तो ! तो का तिला तिथं जायचं खरं कारण सांगणार !—तिला भेटायचा त्याचा दुसऱ्या पुरुषाहून निराळा हेतु थोडाच असणार आहे ? तो

तिथं पापबुद्धीनं गेला नव्हता, अशी जरी कमला खात्री देत होती, तरी तिच्या मनाच्या शांततेचा तेवढ्यानंच विध्वंस झाला.—आनंदरावांनीं दिलेल्या माहितींचा मारा करून आज तिच्या कोंवळ्या मनाच्या !चिंधड्या तर उडवून दिल्याच!—ती पहा, कमला माझ्या विषानं जर्जर होऊन पलंगावर पडली आहे. आतां तिचं डोकं सारखं भ्रमण करीत रहाणार, आणि या भ्रमानं ती वेडी होऊन नानासाहेबांच्या गृहसौख्याची माती झाली म्हणजे माझ्या जिवाला समाधान होईल! यांतून कोणचा धन्वंतरी तिला आतां बरी करील? [ नानासाहेब येतो.

**नाना०**—काय? कमला इथंही नाहीं?—कोण राधाबाईसाहेब? कमला कुठं आहे?

**राधा०**—त्यांना आज बरं नाहीं. त्यांचं डोकं कीं काय दुखत आहे.—त्या आंतल्या पलंगावर पडल्या आहेत. मला वाटतं ही उन्हाळी त्यांना बाधली.

**नाना०**—तर मग अगोदर जाऊन कांहीं तरी उपचार केला पाहिजे.

[ जाऊं लागतो. ]

**राधा०**—नानासाहेब?

**नाना०**—काय?

**राधा०**—एक क्षणभर थांबा. तुमच्याजवळ एक गोष्ट बोलण्याकरितां मी किती दिवस तरी संधि पहात होतें; मला आतां बोलूं द्याच. माझ्या मनाला ती सारख्या टोंचण्या देते ( खालीं पाहून ) तुम्हांला माहितच आहे, कीं तुम्ही यात्रेला जाण्यापूर्वी माझ्या हातून एक मूर्खपणा झाला—

**नाना०**—मग त्याचं आतां काय! त्या गोष्टीची आठवणच करूं नका. मी ती केव्हांच विसरून देखील गेलों.

**राधा०**—आपण थोरच आहां!—जशी आपण ती विसरलांत तशी त्याबद्दल मला क्षमाही पण केलीत ना?

**नाना०**—क्षमा—पूर्ण क्षमा! ( स्वगत ) हिला खरोखर पश्चात्ताप झाला असावा. ( जवळ जाऊन उघड ) राधाबाई! मागच्या गोष्टीबद्दल मनाला वाईट वाटून घेऊं नका. कदाचित् माझ्याकडेही त्याचा दोष थोडासा येईल. तो माझाच मूर्खपणा होता असं मीच म्हणतों. समवयस्क तरुण स्त्रीपुरुषांनीं भलत्याच प्रकारची थट्टाविनोद करणं चांगलं नव्हे हें मला समजायला हवं होतं.

( राधाबाईचे डोळे पाण्यानें भरलेले पाहून ) आतां मात्र आपला खरा स्नेह जमला आहे, आणि तो कायमचा टिकेलही पण. तुम्ही कमलेवर जी ममता करितां ती पाहून मला किती आनंद होतो त्याची तुम्हांला कल्पनाही व्हायची नाहीं.

**राधा०**—त्यांच्यावर कोण ममता करणार नाहीं ?—नानासाहेब ! त्यांना तुम्ही फार जपत जा. त्यांचं मन किती नाजुक आहे !—एखादा रागाचा शब्द कुणी बोललं तर तितक्यानंसुद्धां त्यांचा जीव घाबरा होईल बरं !

**नाना०**—माझ्या तोंडून तरी तिला तसा एकही शब्द जायचा नाहीं !—तिचं कसं काय आहे तें मला पाहिलं पाहिजे. आज सणाचा दिवस आणि तिला बरं नाहीं. [ नानासाहेब जातो. ]

**राधा०**—( क्रूरपणानं हंसून ) पुरुष तिथून मेले सारे सारखे ! हा ढोंगी आहे असं कुणाला तरी वाटेल ?—कमला आणि तारा—किती निरनिराळ्या वर्तनाच्या या बायका आहेत !—एक जितकी सद्गुणी तितकीच दुसरी दुर्गुणी ! आणि हा या दोघींवरही प्रेम कसं करतो कल्पनाच करतां येत नाहीं !—कुणाची रुचि कशी असते कांहीं सांगवत नाहीं बाई !—पुरुषांच्या प्रामाणिकपणावर मी काडीचाही विश्वास ठेवीत नाहीं.—आणि त्यांची नीति म्हणजे निव्वळ—हंः हंः हंः हंः ! [ राधाबाई जाते. ]

---

# प्रवेश ५ वा.

—:*:—

**स्थळ**—कमलेचा दिवाणखाना.

( कमला पलंगावर निजली आहे. )

**कम०**—( उठून हळू हळू दिवाणखान्यांत हिंडूं लागते. नंतर सुस्कारे टाकीत ) हें खरं असेल का ?—छे ! नाहीं, माझा यावर विश्वासच बसत नाहीं.—राधाबाईचा गैरसमज झाला असेल.—तिनं नीट ऐकलं नसेल. ( श्वास टाकून )—पण जरी हें खरं असलं तरी त्यांत तिकडचा दोष नाहीं.—हा सगळा माझा—माझा दोष. त्यांची मर्जी मी जशी संभाळायला हवी होती तशी संभाळली

नाहीं. माझीच चुकी !–पण मी कुठं बरं चुकलें ?–छेः, हें मुळींच खरं नाहीं.–तरी पण राधाबाई म्हणते हें खरं आहे–आणि ती तर यांना पुष्कळ दिवसांपासून ओळखते !–ती म्हणत होती कीं, माझ्या लग्नापूर्वी तिकडचं तिच्यावर-राधाबाईवर अतोनात प्रेम होतं!–महाराज! त्या प्रेमामुळं आपल्याला किती वेदना झाल्या असतील! आणि म्हणूनच आपल्याला जिवाचा कंटाळा आला आहे, असं आपण बद्रिकाश्रमीं म्हणत होतां.–अहाहा! काय तो बद्रिकाश्रम !–( हुंदका येतो तो आवरून थोड्या वेळानें ) त्यांना कंटाळा येणार नाहीं असं मला केलं पाहिजे. मीं पूर्वीच जर तसं केलं असतं तर त्यांना माझा कंटाळा आला नसता.–पण मीं जें हें ऐकिलं आहे त्याबद्दल मी नाहीं ग बाई त्यांना प्रश्न विचारीत बसणार! माझा त्यांच्यावर भरंवसा नाहीं असं नको त्यांना वाटायला!–नाहीं, माझ्यांतच कांहीं तरी दोष असेल आणि तो त्यांना आवडत नसेल! नाहीं तर त्यांचं मन कसं गेलं असतं त्या–(हुंदके देते) महाराज! मी तुम्हांला योग्य नाहीं हें मला माहीत होतं पण मला वाटलं–मला खरोखर आशा वाटत होती कीं माझं प्रेम माझ्या सगळ्या दोषांची भर करील. ( स्तब्ध राहते, नंतर तांब्यांतील पाणी घेऊन डोळ्यांना लावते. इतक्यांत नानासाहेब येतो. )

**नाना०**—काय झोंपाळू! झोंप पुरी झाली का ?–तुला आतां आराम वाटतो ना ?

**कम०**—राम जवळ आल्यावर आराम कां नाहीं वाटणार ?–खरंच माझ्या आळशीपणाचं मला हसूंच येतं. माझी कांहीं गरज लागली होती का ?

**नाना०**—तुझी मला सदोदित गरजच आहे. लाडके ! तुझ्यावांचून मला चैनच पडत नाहीं.

**कम०**—( स्मित करून श्वास टाकून ) हें बोलणं केवळ मला बरं वाटावं म्हणून.

**नाना०**—नाहीं नाहीं.–अगदीं खरं आहे म्हणून! तुला काय हें माहीत नाहीं ? काय ग जादुगारिणी ?

**कम०**—मी जर जादुगारीण असतें तर आपल्याला माझ्यापासून दूरच जातां आलं नसतं !

**नाना०**—असं कां म्हणतेस! सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामाची कितीही दगदग पडो, तुझं दर्शन होतांच त्या श्रमांची स्मृतिच नाहींशी होते. कोणच्याही बिकट प्रश्नामुळं मन भांबावून जावो, तुझं ध्यान करतांच सर्व प्रश्नांचा खाडकन् उलगडा होतो. या कमलिनीच्या सहवासांत गोड परिमलाचा आस्वाद घेण्यांत आणि मधुरसाचं सेवन करण्यांत गुंग होऊन भ्रमराप्रमाणं तुझा बंदीवान होतों! हा तुझा मंत्रसामर्थ्याचा प्रभाव नव्हे तर कशाचा प्रभाव?

**कम०**—मला फसवायचा विचार दिसतो आहे, पण असल्या स्तुतीनं मी फसेन असं का आपल्याला वाटतं?

**नाना०**—ही स्तुति असेल तर! मी तुला एकदां फसवलं आहे, आतां पुन्हा कशाला फसवूं?

**कम०**—आपण मला फसवलं? तें केव्हां?

**नाना०**—तुला आठवत नाहीं का? बद्रिकाश्रमीं एके दिवशीं सूर्य अस्ताच्या वेळीं आपण दोघेंच आश्रमाच्या उद्यानांत प्रेमकथा सांगत हिंडत हिंडत त्या प्रचंड बकुल वृक्षाखालीं आलों. आपल्या आगमनानं संतोष पावून त्या बकुल वृक्षानं आपल्या शिरावर लग्नमंत्राक्षतांप्रमाणं आपल्या मधुर पुष्पांचा वर्षाव केला!—

**कम०**—अहाहा! त्या वेळीं आनंदानं वर पहातांच एक चिमुकला पक्षी सुस्वर स्वरावर मंगलाष्टकं म्हणत असलेला पाहून, परमेश्वरानंच आपल्या गांठीं बांधल्या असं वाटून आपला आनंद गगनांत मावेनासा झाला. इतक्यांत बाबांनीं मला आश्रमांतून हाक मारली,–

**नाना०**—तेव्हां तूं आपल्या याच सुकुमार हातानं तीं बकुलपुष्पं उचलून चटकन माझ्या अंगावर टाकून वनदेवतेप्रमाणं झटकन चालती झालीस. त्या वेळीं जातां जातां तूं आपल्या उल्हासित नेत्रांमधून माझ्यावर एक विद्युत्प्रवाह सोडून मला घायाळ केलंस! तो घाय सुखद व्हावा म्हणून तूं टाकलेलीं तीं फुलें हीं पहा, अद्याप मीं आपल्या हृदयावर बाळगलीं आहेत! ( खिशांतल्या चांदीच्या डबींतील फुलें दाखवितो ) हीं कधीं मीं तुला दाखवलीं होतीं का? बघ मीं तुला कसं फसवलं!

**कम०**—( फुलांचा वास घेऊन ) अहाहा!—खरंच मला आतां एकदम किती बरं वाटूं लागलं ! आपल्या अंगांत विलक्षण मंत्रसामर्थ्य दिसत आहे.

**नाना०**—ही विद्युत् जोंपर्यंत जवळ आहे तोंपर्यंत मी एक मांत्रिकच आहे.—लाडके ! तूं अगदीं वेळेवर उठलीस. आतां या बागेंत विजेची रोषनाई करून या आकाशस्थ रोषनाईला मीं लाजवणार आहे. चल गच्चीवर! ही विद्युल्लता तिथं गेली म्हणजे जिकडे तिकडे लखलखाट होऊन सर्व सृष्टि आनंदानं हंसूं लागेल ! [ जातात. ]

अंक २ रा समाप्त.

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

—*:S*:—

**स्थळ**—बाबासाहेबांचा बंगला. विठोबा येतो.

**विठो०**—( स्वगत ) त्या चंद्यानें मस बागेंत भेडसावल्या दिवसापासून पहातों आहे, हा गोविंद अन् साळू कांहीं तरी खलबतें करीत असतात. मस पाहिलें कीं दोघेंही स्तब्ध रहातात ! यावरून माझ्यासंबंधानेंच त्यांचें कारस्थान असावें असा मस जबर संशय आहे. याचा उलगडा कसा करावा बरें ? –हा चंद्या येत आहे. पोरगा मोठा धूर्त आहे. यास जरा चाचपटून पाहूं या. ( चंद्या येतो. ) काय रे चंद्या ! अलीकडे पहावें तो जिकडे तिकडे खलबतें दृष्टीस पडतात.

**चंद्या**—उघड्या पाठ्यावर वरवंट्यानं वाटलं म्हंजे वाटण भाईर पडतं तवां लोकांनीं खलबत्तं काढलं! खलबत्त्यांत काय का कुटाना समद आमंदीच्या आमंदी न्हातया.

**विठो०**—अरे तसें नव्हे रे ! तूं अगदीं बावळा आहेस. मी कुंटण्याचा खलबत्ता नाहीं म्हटला रे. मी म्हणत होतों कीं जिकडे तिकडे मसलती चालतात. शिवाय कुंटण्याच्या शास्त्रांत तूंस रे काय समजणार? कुंटण्या योग्य काय, वाटण्या योग्य काय हें सांगण्याचा अधिकार तूंस नाहीं. तो अधिकार एक गोविंदास–नव्हे मसच आहे. पण तें जाऊं दे. मीं तुझ्याशीं वाद न घालण्याच्या निश्चयास केलें आहे. तूं लहान असून मोठ्या अक्कलवानासही खालीं पहावयास लावशील. मी तर त्या घटकेपासून तूंस माझा जिवश्चकंठश्च स्नेही समजतों. तेव्हां खरें खरें सांग, ह्या गोविंदाचें अन् साळूचें एवढें काय चालतें रे ?

**चंद्या**—( स्वगत ) कसा माझ्या पोटांत शिराया पहातुया ? पन् म्हंगाव हा चंद्या तुझं बारसं जेवलाया !

**विठो०**—चंद्या, बोलत कां नाहींस रे? तूंस समजलें नसल्यास थोडें तर्कास चालींव रे. माझ्या तर्कास तर असें वाटतें कीं, कांहीं तरी कुभांड रचून मस काढून टाकण्याचा त्यांचा बेत असावा.

**चंद्या**—( स्वगत ) हा हा! आतां कोलीत लाऊनशान् तमाशा बघायची एळ कशी नामी आलीया. मासनी परवां ब्रागंत मारलं न्हाई! घेतो एकदमच समदा घोटाळा उडवूनशान्!

**विठो०**—अरे तूं बोलत कां नाहींस? तूंस एवढें सांगणें जिवावर कां येतें?

**चंद्या**—( दुःखानें ) त्ये तसंच हाय म्हूनशान्!

**विठो०**—म्हणजे माझा तर्क बरोबर आहे तर! मस वाटेस लाबायास तो पहातों आं?

**चंद्या**—निसत्या वाटस न्हव, स्वर्गाच्या वाटस.

**विठो०**—स्वर्गाच्या वाटेस?

**चंद्या**—व्हय इटोबा. मी त काय एक पोर. पन मी गोइंदबुवास इक्ता कां भ्येतो? खरं म्हटलं तर तुमास्नी भ्यावं! कारण तुमचा राग, हुशारी गोइंदबुवामंदी कुठं हाये? पन तुमी साधं! भाबडं! काळकपटी न्हाई! मी जास्ती बोलत न्हाई, पन इक्तच सांगतुया तुमास्नी या दुनयेतनं काढायचा त्येंचा इचार हाये. तवा जपा झालं. एकटा जीव. त्यो हाय मांलिक! तवा येवी-बीवीला तुमचा बळी येईल. कऱ्हाडा का काय त्या जातीचाच हाय ना गोइंद-बुवा? ग्येले सालींच एक सोन्यावानी ताजा तवाना बामनाचा पोर तडफडून म्येला हो. आन् आज संक्रांत तुमच्यावर य्येतनार. मला तर रडू येतं बगा.

**विठो०**—आतां या संकटांतून कसें सुटावें? जय शंकरा विश्वेश्वरा! महा-रुद्रा! तूंस लघुरुद्र करीन. जय गणपते एकदंता! तूंस चांदीचे दोन दांत देईन. जय लक्ष्मीपते! तूंस दिडकी ठेवीन. जय सद्गुरू दत्तराजा तूंस दिडकीची खडी-साखर वाटीन. जय सत्यनारायणा! तुझी पूजा करीन. जय खंडोबा! मुलगीस मुरळी करीन. जय देवी अंबाबाई! तूंस कोणासही न कळत बकरा बळी देईन. जय म्हसोबा! तूंस कोंबडें देईन. जय पिंपळनाथा मुंजाबा! तूंस दहींपोहे देईन. जय मातोश्री जाखणी! तूंस चोळी पातळ वाहीन. जय खवीसा! तूंस भुंडा नारळ देईन.

**चंद्या**—पन ह्यो खवीस गोइंदबुवा तुमचा शेंडीचाच नारळ घेतल्याबिगर न्हाई न्हानार !-अरे पन ह्ये काय लचांड? हा गोइंदबुवा अन् साळू हकडच्च येत्याती. आतां सुबाल्या कराया हवा. [ पळून जातो. ]

**विठो०**—हा पोर घाबरून पळाला हो. हा ब्रह्मसमंध अन् जखीण इकडेस येत आहेत. मी घाबरलों आहे तर खराच. पण थोडें आड उभें राहून हे काय बोलत आहेत तें ऐकावें. [ विठोबा आड लपतो, गोविंदा व साळू येतात. ]

**साळू**—गोविंदबुवा, आतां ही गोष्ट दिरंगाईवर टाकून सोय नाहीं.

**गोविं०**—मी तरी कुठं लांबणीवर टाकावी म्हणतों! नीट वेळ आली म्हणजे आजच--

**विठो०**—( स्वगत ) म्हणजे हे आजच माझें चंदन उडवणार तर !

**गोविं०**—हो. कारण ही गोष्ट वारा प्यायली म्हणजे आपल्या हातीं कांहीं रहाणार नाहीं.

**विठो०**—( स्वगत ) पण म्हणावें मस आतां सगळें समजलें आहे.

**साळू**—त्या मेल्याला एकदां चांगला चोपला असता--

**विठो०**—( स्वगत ) बळी देण्यापूर्वी मस चोपण्याचा यांचा बेत आहे वाटतें!

**गोविं०**—नाहीं, तसं करून काय करायचं? आपण कशाला त्याला मारा! देवाला डोळे आहेत तो त्याला बघून घेईलच.

**विठो०**—(स्वगत) पण मीं असें काय केलें कीं, देवानें मसच निवडावें?

**साळू**—वाटेल त्या बाईवर याची आपली वांकडी नजर !

**विठो०**—( स्वगत ) पण देवाची अन् लेकहो तुमची तरी कां माझ्यावर एवढी करडी नजर?

**साळू**—स्वतःच्या बायकोस टाकून भलते भलते ढंग करायला याला लाज नाहीं वाटत?

**विठो०**—( स्वगत ) मीं आपल्या बायकोस टाकलें हें ईस कसें समजलें?

**साळू**—मेल्याची बायको उपाशी मरते आणि हा इकडे चैनी मारतोय्. काय कपडे, काय रांडा आणि काय ब्रॅन्ड्या !

**विठो०**—(स्वगत ) कोण हा गहजब ! देवा ! एक अंगवस्त्राखेरीज अंगावर धड वस्त्र देखील नाहीं रे किंवा कधीं गुळाच्या चहासही शिवलों नाहीं !

गोविं०—हे पहा बाबासाहेब येत आहेत. आज वेळ चांगली दिसत नाहीं. मला वाटतं आज ही गोष्ट राहूं द्यावी.

साळू—छेः ! छेः ! गोविंदबुवा ! आजच्या आज निकाल केलाच पाहिजे. कुलाचाराच्या आणि नांवलौकिकाच्या गोष्टी आहेत ह्या.

गोविं०—बरं तर होऊन जाऊं दे.

विठो०—( स्वगत ) माझा राग आतां मस आवरेनासा झाला आहे होऊन जाऊं दे तर होऊन जाऊं दे ! मेलें मेंढरू आगीस थोडेंच भितें.

[ बाबासाहेब येतात. ]

बाबा०—गोविंदा ! तुझा चेहरा असा उतरलेलासा दिसतो ? आजारी नाहींस ना ? आज कामाला लागून स्वतःला त्रास करून घेऊं नकोस.

गोविं०—छेः ! छेः ! बाबासाहेब ! मी आजारीबिजारी कांहीं नाहीं. मी आपल्याला कांहीं—

विठो०—( एकदम पुढें येऊन ) आतां छपवूं नकोस. चोरून कां ठेवतोस ? मी तुझें सगळें कारस्थान बाहेर काढतों. मी तूंस थोडाच मोजतों आहे. मी बाबासाहेबांस सगळें निवेदन करतों.

गोविं०—अरे तूं बोलूं नकोस. तूं इथं कशाला आलास ?

विठो०—कशास म्हणजे ? तुम्ही माझा घात करूं पहातां--

गोविं०—तुझा घात करूं पहातों ?

विठो०—हो, हो. घात करूं पहातां.–बाबासाहेब ! हा गोविंद अन् ही साळू दोघेंही माझ्या प्राणावर उठलीं आहेत. एका बायकोच्या पोटावर पाय आणण्याचा यांचा बेत आहे. मी आपल्या बायकोस टाकली आहे खरी—

बाबा०—( स्वगत ) ज्या गोष्टी टाळतों त्याच दत्त म्हणून पुढें येतात !

गोविं०—अरे थांब रे, आम्ही दुसरंच सांगणार आहों.

विठो०—दुसरें–काय सांगणार ? मी तारेच्या तसबिरीचें चुंबन घेतलें हेंच कीं नाहीं ? मस त्याबद्दल पश्चात्तापास झालें म्हणून मी तूंस सहस्र वेळां शंख करून सांगितलें पण तूंस दया नाहीं रे !

बाबा०—अरे हा काय घोटाळा आहे ? अरे विठोबा, तुझी कुणीं ही थट्टा—

**विठो०**—थट्टेची गोष्ट नव्हे बाबासाहेब!–मी कोंकणांतून बायकोस टाकून आलों खरा, पण ती आपल्या बाईसाहेबासारखी नाटकास जात होती म्हणून नव्हे रे ! तिचें कधीं वांकडें पाऊल पडलें नाहीं रे!

**साळू**—याचं डोकं फिरलं खास!

**विठो०**—गोविंदा, तूंस ठाऊक आहे कीं मस काल्योची भाजी आवडत नाहीं. ती तिनें मस बाढलीन किं रे! कां नाहीं डोकें फिरणार?

**बाबा०**—एवढ्याशा क्षुल्लक कारणावरून तूं आपल्या बायकोला टाकलंस! केवढा हा अविचार !

**विठो०**—दुसऱ्यांचें कसें असतें तें मस काय ठावें. पण बाबासाहेब, आपण समुद्र आहां. बाईसाहेबांचे महान् अपराधही आपण पोटांत घालाल इतकें आपलें मोठें पोट आहे. बाईसाहेब मडमेंसारख्या दुसऱ्याच्या हातांत हात घालून गेल्या तरी आपल्या नजरेस येणार नाहीं. मोठ्याचें सर्वच मोठें! त्यांच्या नजरा आमच्यासारख्या आकुंचित सूक्ष्म थोड्याच आहेत!

**गोविं०**—ह्या वेड्यानं सगळा घोटाळा उडवून दिला!–साळू, मी तुला सांगत नव्हतों आज वेळ चांगली नाहीं म्हणून?

**बाबा०**—( स्वगत ) अशा वेळीं मनाची स्थिति लपवणं किती कठीण!

**विठो०**—बाबासाहेब, न्याय करा. या साळूनं अन् या गोविंदानं मस बडवून देवीस माझा बळी देण्याच्या मसलतीस केलें आहे. मी यांतून निभावलों तर ठीक, नाहीं तर बाबासाहेब! माझ्या बायकोस ती आपलीच आहे असें समजून तीस अन्नवस्त्र मिळेल असें करा.

**बाबा०**—विठोबा, गप्प बैस. मी याचा बंदोबस्त करीन बरं, तूं जा आतां.

**विठो०**—बाबासाहेब! तुम्ही देव आहां. भोळे सांब आहां. तुमच्या पुढेंच मी आहे. तुम्हांस सांगायास नकोच. मी कधीं दुसऱ्याच्या बायकोकडेस वाईट नजरेनें पाहिलें असेन तर रौरव नरकांत पडेन. आम्ही बोलून चालून गरीब! नाहीं तर तो आनंदराव पहा, गुलाम आमच्या बाईसाहेबांच्याकडेस देखील––

**बाबा०**—विठोबा, तूं आतां कांहीं बोलूं नकोस. तुझी सगळी भानगड समजली मला. तूं जा–जा आतां.

**विठो०**—नाहीं, पण मी म्हणतों, आम्हीं चाकर माणसांनीं ह्या गोष्टी कितीही पाहिल्या असल्या–नाहीं बाईसाहेबांच्या या भानगडी जरी आमच्या नजरेस आल्या असल्या–तरी या गोष्टी आपल्या कानावर घालणें आम्हांस शोभत नाहीं. कारण तसें केल्यानें तुम्हांसही त्रास आणि आम्हांसही कमीपणा! पण आतां पोटांतली गोष्ट बाबासाहेब तुम्हांस म्हणून सांगतों,–जरा कान द्या–आमच्या बाईसाहेब आणि आनंदराव यांचें अलीकडेस फार रहस्य चालतें.

**गोविं०**—साळू, आपलं काम विठोबानंच केलं.

**साळू**—मी पळतें आतां इथून. [ जाते. ]

**बाबा०**—विठोबा! तुला हजारदां सांगितलं तूं जा. पण तुझं चऱ्हाट आहेच चालू! गोविंदा, याला इथून बाहेर घालीव रे.

**विठो०**—काय! या गोविंदास मस बाहेर घालवायास सांगतां? मस वाटलेंच. इमानी नोकराच्या हालास कुत्रें खाणार नाहीं. तुम्हांस गोविंदा चांगला वाटायचाच. पण माझी जर अशी अप्रतिष्ठा करायची होती, तर मस नुसतें जायास सूचना द्यायाची होती. मी एका पायावर गेलों असतों. नुसत्या तावरून ताकभातास मी ओळखतों. पण माझ्या शत्रूस–या गोविंदास मस बाहेर काढायास लावतां अन् माझा अपमान करतां? काय म्हणावें तुम्हांस?–काय करावें–नशिबास दोष देऊन स्वस्थ बसावें. मी तरी काय हेंच सांगणार होतों कीं बाईसाहेबांस चार लाथा मारून त्या आनंदरावास घरीं येण्यास बंदी करा. पण इमानी नोकराच्या सल्लेस कोण पुसतो. मी जातोंच. थेट कोंकणच्या वाटेस धरतों. बळी जाण्यास येथें थोडाच रहाता आहे मी! [ रागारागानें जातो. ]

**बाबा०**—काय रे गोविंदा, कां त्याला असं उगीच चिडवतां? तो लपून ऐकत होता म्हणून त्याला चिडवण्याकरतां, त्याला उद्देशून कांहीं बोलत होतां वाटतं?

**गोविं०**—आम्ही त्याला उद्देशून मुळींच बोलत नव्हतों. मी आणि साळू कांहीं महत्त्वाच्या गोष्टी आपल्या कानावर घालाव्या म्हणून––

**बाबा०**—विठोबासंबंधानं कीं काय?

**गोविं०**—नव्हे, आपल्याचसंबंधानं. विठोबा जें बाईसाहेबांसंबंधानं बोलला त्याचा बाबासाहेबांनीं विचार करावा.

**बाबा०**—गोविंदा, तुझी खोड कांहीं जात नाहीं. तुम्हीं नोकरांनीं आपलीं कामं पहावीं. दुसऱ्या गोष्टींत लक्ष घालूं नये. देवानं मला डोळे, नाक, कान सर्व इंद्रियं दिलीं आहेत आणि त्या सर्वांवर राज्य करणाऱ्या मनाला सदसद्विवेक बुद्धीची जोड देऊन त्याची स्थापनाही या हृदयसिंहासनावर केली आहे.—पुन्हा असल्या गोष्टी काढून मला त्रास देऊं नकोस.

**गोविं०**—ठीक आहे.

**बाबा०**—त्या विठोबाची समजूत कर जा. तो रागांत आहे, तुम्ही जीव घ्याल म्हणून पळूनबिळून जाईल.

**गोविं०**—आज्ञा. [ गोविंदा जातो. ]

**बाबा०**—( स्वगत ) मी चेहऱ्यावर शांतवृत्ति धारण केली खरी, पण अंतःकरणांत एकच खळबळ उडून कालवाकालव चालली आहे. हृदयाला शतशः विंचू लागून त्याच्या वेदना मस्तकांत आऊन तेंही बेफाम होऊं पहात आहे.—हा एक यःकश्चित् वाढपी ! बायकोनं न आवडणारा पदार्थ वाढला म्हणून तिचं मुखावलोकनही करीत नाहीं आणि मी ती माझ्याशीं बेमान झाली हें माहीत असूनही तिला पाहिजे तशीं मिरवूं देतों ! किती भिन्न या मनोवृत्ति !—हृदया ! शांत हो. बेफाम होऊन आजपर्यंत अनेक ग्रंथांच्या परिशीलनानं कमाविलेल्या शांतीला कायमची तिलांजलि द्यायला मला उद्युक्त करूं नकोस !—कांहीं असलं तरी माझ्या बाळाची ती आई आहे.—तिनंच ना त्याला जन्म दिला ?—त्याच्या कल्याणाकरितांच ना मी रात्रंदिवस जपतों आहे ? मग त्याचा या जगांतला प्रवास सुखकर व्हावा म्हणून मला कितीही दुस्सह अपमान सोसावे लागले तरी ते सोसलेच पाहिजेत. [ जातो. ]

---

# प्रवेश २ रा.

*

**स्थळ**—नानासाहेबांचा दिवाणखाना.

( नानासाहेब, कमला व राधाबाई बोलत आहेत इतक्यांत गणपतराव येतो. )

**गण०**—नानासाहेब ! सगळी तयारी झाली. चलतां ना ?

**नाना०**—हा आलोंच. चल खालीं. [ गणपतराव जातो. ]

**कम०**—( गणपतराव गेला तिकडे पाहून ) गणपतरावांना काम तर जास्त पडत नाहीं ना ? परवां ते कामावर आले तेव्हां मीं त्यांना पहिल्यानं ओळखलं देखील नाहीं बाई ! या आजारामुळं त्यांच्यांत कितीतरी फरक पडला आहे ! पूर्वीं चालणं कसं ताठ होतं, पण आतां साठ वर्षांच्या म्हाताऱ्याप्रमाणं पोक काढून चालतात.

**राधा०**—आणि बाई त्यांचे केससुद्धां या दुखण्यापासून करडे दिसायला लागले, आणि त्यांचा चेहराही पांढरा फिटुक आणि खप्पड दिसायला लागला.

**कम०**—ते अजून बरेच आजारी असावेत.–माझ्या समोर ते उभे सुद्धां कां रहात नाहींत ? त्यांचे डोळे तरी कसेसेच दिसतात बाई !

**नाना०**—( गोंधळून ) ते जाग्रणानं. त्याला बरोबर झोंप लागत नसेल. —बरोबर आहे, तो परवां मला तसं म्हणाला देखील होता.

**कम०**—गणपतराव पुन्हा लग्न कां करीत नाहींत ? तुमच्या बायकोला इथं आणवा म्हणून मीं त्यांना मागं एकदां विचारलं होतं, तेव्हां त्यांनीं 'ती मला सोडून गेली' असं म्हणून केवढा उसासा टाकला ! आणि गोरंमोरं तोंड करून ते एकदम निघून गेले.–त्यांची बायको वारली आहे हें आपण जर मला अगोदरच सांगून ठेवलं असतंत तर माझ्या हातून अशी चूक होती ना ! बिचाऱ्याचं फार प्रेम असेल तिच्यावर !

**नाना०**—हो–खरोखरच–त्याचं फार प्रेम होतं तिच्यावर. पण आतां— हो काय म्हणत होतों मी–त्याला दुःख वाटणं सहाजिक आहे. तो लग्न करता तर–पण तें होणं नाहीं. त्याच्या बाबतींत काय करावं असं झालं आहे मला.

**कम०**—गणपतरावांचे डोळे अगदीं तारवटलेले दिसतात. ( हळूच ) त्यांचं डोकं बिकं तर फिरलं नाहीं ना ?

**नाना०**—छत् ! त्याचं डोकं अगदीं ठिकाणावर आहे. ( स्वतःशीं ) माझं डोकं मात्र फिरणार खास. ( उघड ) तो अगदीं आहे तसा आहे. तशी त्याच्या· बद्दल धास्ती नको.—बरं, राधाबाईंना बरीच रात्र झाली. गाडी देऊन त्यांना पोहचत्या करा. त्यांची मंडळी वाट पहात असतील.–मला यायला बरीच रात्र होईल. जागत बसूं नकोस माझ्याकरितां. समजलीस ?

[ नानासाहेब घाईघाईनें जातात. ]

**राधा०**—आज इतकी गडबडींत स्वारी कां दिसते !

**कम०**—कुणास कळे ! कौन्सिलर व्हायची खटपट चालली आहे ना ?

**राधा०**—कौन्सिलर व्हायची का लव्हर व्हायची ?

**कम०**—( विषय उडवावा या हेतूनें ) आतां कुणाचे लव्हर व्हायचे आहेत !

**राधा०**—कुणाचे म्हणजे तारेचे. आणि नेहमींप्रमाणं तिकडेच गेले आतां. प्रेमच जडलं आहे तिथं !

**कम०**—( एकदम राधाबाईकडे पाहून ) राधाबाई ! तुम्हांला किती वेळां सांगितलं बरं, कीं ही गोष्ट माझ्या जवळ काढूं नका म्हणून ? माझा या गोष्टी-वर मुळींच विश्वास नाहीं—आणि तुमचाही असूं नये. तुम्हांला कुठून कां कळलं असेना—अगदीं खोटं तें ! असल्या विचारानं आपण तिकडची किंमत कमी करितों.—तुमचा त्यांचा घरोबा आहे आणि मी तर त्यांची पत्नी आहे—त्यांच्या विरुद्ध कुणी कांहींही बोललं तरी आपण तें खरं समजतां कामा नये.—मग तें अगदीं पुराव्यानिशीं शाबीत का असेना !—आणि इथं तर कांहींच पुरावा नाहीं.

**राधा०**—बाईसाहेब ! पुरावाच हवा असला तर वाटेल तितका मिळेल.—तसं कशाला ? नानासाहेबांनाच विचारा, तुम्ही तारेला भेटतां का नाहीं, म्हणजे तेच काय सांगतात तें पहा.

**कम०**—असल्या गोष्टींबद्दल मी त्यांना कधींच विचारणार नाहीं.

**राधा०**—बरं बाई ! या गोष्टीची तुम्हांलाच जर चीड नाहीं—

**कम०**—मला चीड नाहीं असं नाहीं.—पण त्यांच्या प्रेमाला मी पात्र व्हावं ही माझी इच्छा आहे. आणि त्यांच्याविषयीं मीं जर भलताच संशय धरला, तर मी त्याला कधींच पात्र व्हायची नाहीं. मी मरेपर्यंत असाच त्यांच्या-वर विश्वास ठेवीन.

**राधा०**—( तिचा हात धरून ) तुमच्याशीं ते बेइमान झाले तरी ?

**कम०**—बेइमान ? बेइमान ! म्हणजे माझ्यापेक्षां दुसऱ्या कुणावर तरी त्यांचं प्रेम जास्त आहे असंच ना ?—छेः ! हें अगदीं अशक्य आहे.

**राधा०**—अशक्य आहे ?—काय अशक्य आहे ?—कांहीं अशक्य नाहीं ! अगदीं शक्य आहे. अशा गोष्टी घडलेल्या आहेत त्यांच्या हातून ! माझ्यासंबं-धाची हकीगत विसरलांत वाटतं ?

**कम०**—( चेहरा फिक्कट होतो नंतर थोडा वेळ विचार करून ) मी ही कधीं खरी म्हणणार नाहीं!—हं! मी त्यांना नकोशी झालें आहे असं जेव्हां त्यांच्या स्वतःच्या तोंडून ऐकेन किंवा तसं त्यांचं स्वतःचं एखादं पत्र पाहीन, तेव्हांच तें मला खरं वाटेल!

**राधा०**—आणि मग पुढं?

**कम०**—पुढं? पुढं काय करायचं तें मग पाहीन.—पण हो मात्र तुमची खात्री असूं द्या, कांहीं जरी झालं तरी मी त्यांना मुळींच दोष देणार नाहीं.—बिलकूल नाहीं.

**राधा०**—व्यभिचाराबद्दल त्यांना कांहींच दोष देणार नाहीं,

**कम०**—नाहीं. कारण तुम्हीच पहा, हा माझा अपराध आहे; त्यांचा नव्हे. तुम्ही एखादं सुवासिक फूल परिमल असेपर्यंत हातांत ठेवलंत आणि त्याचा सुगंध गेल्यावर तें फेकून दिलंत, तर त्यांत तुमचा काय बरं दोष? तुम्हांला दुसऱ्या चांगल्या ताज्या टवटवीत सुवासिक फुलाची इच्छा होणं स्वाभाविक आहे. हा त्या फुलाचा दोष आहे. कारण त्याला आपला परिमल तुमची तृप्ति होईपर्यंत टिकवतां आला नाहीं. तसंच, जर तिकडली माझ्यावरची प्रीति नष्ट झाली असली तर त्या फुलासारखाच माझ्याकडे दोष येतो.—त्यांत त्यांचा काय बरं दोष? ते होते तसेच आहेत. माझ्यांतलीच मोहकता गेली असं नाहीं का होत?

**राधा०**—( स्वगत ) हात टेकण्याची पाळी आली इथं! असल्या बायको-पुढं माझं काय चालणार? ( उघड ) बाईसाहेब! राग येऊं देऊं नका,—पण असं म्हणणं म्हणजे वेडेपणाच आहे.—तुम्ही आपली त्रेतायुगांतली पुराणांतली बायको होत चाललां आहांत. पतीला देवासारखा समजून त्याच्या पुढं नाक घासून त्याची दासी होणं तुम्हांला बरं वाटतं! हें आरंभीं गोड दिसलं तरी मूर्खपणाचंच आहे. आजपर्यंत जितक्या म्हणून बायका—पतिव्रता म्हणा त्यांना हवं तर—अशा तऱ्हेनं वागल्या, त्यांना त्याबद्दल प्रायश्चित्तच भोगावं लागलं. तुम्हांला माहीत नाहीं का हें?

**कम०**—तुमच्या तोंडूनच मी हें प्रथम ऐकतें हो. पुराणकाळचीच बायको व्हायची माझी इच्छा आहे. त्या बायकांना तुम्ही वाटेल तें म्हणा-

पतीच्या आज्ञेंत राहून त्याची मनोभावानं सेवा करण्यांतच खरं सुख आहे. अहिल्या, द्रौपदी, सीता या महापतिव्रतांना छळ सोसावा लागला, हें त्यांना प्रायश्चित्त भोगावं लागलं का? माझी कुठं आहे तेवढी योग्यता! पण तिकडच्याकरितां माझा किती जरी छळ झाला तरी मी तो मुकाट्यानं सहन करीन. समजलांत?

**राधा०**—पण—

**कम०**—राधाबाई! पुरे करा. असलं तुमचं भाषण मला ऐकवतच नाहीं. —हो पण अगदींच विसरलें. तुम्हांला घरीं जायला बरीच रात्र झाली. मी गाडी तयार करायला सांगतें.— [ कमला जाते. ]

**राधा०**—काय हें प्रेम! काय ही पतिनिष्ठा! असल्या सुंदर प्रेमाचा विध्वंस? असल्या पतिनिष्ठेचा भंग?—पण छेः! असला नेभळा विचार उपयोगी नाहीं.—नानासाहेबांना तारेचा नाद लागला आहे यांत शंकाच नाहीं, आणि कमलेला तसं वाटतही असेल, पण पुरावा असल्याशिवाय तिची खात्री होत नाहीं.—इलाज नाहीं, आनंदरावाच्या मार्फत तारेची गांठ घेऊन तिच्याकडून नानासाहेबांच्या हातचं पत्र आतां मिळवलंच पाहिजे.

( कमला येते व राधाबाईस कुंकूं लावून दोन पाऊलें पोहोंचविते. )

**कम०**—गेली एकदाची पीडा! माझ्या मनांत असल्या कल्पना भरवून हिला मोक्ष का मिळणार आहे? या बाईच्या वाऱ्यालाही उभं राहूं नये असं आतां वाटूं लागलं आहे. पण तिकडचा त्यांचा घरोबा म्हणून बाई तोडून बोलवत नाहीं.—जाऊं द्या. ते विचारच नकोत मेले!—हें काय बरं?—या माझ्या चिपळ्या? अहाहा! या चिपळ्या घेऊन इथल्याप्रमाणंच मी बद्रिकाश्रमीं नारायणाचं भजन करीत असें.—या वेळींच या कां बरं दृष्टीस पडाव्या?—बरोबर आहे. असल्या वाईट विचारापेक्षां 'माझं नामस्मरण कर' अशीच भगवंताची आज्ञा दिसते. ( चिपळ्या घेऊन )—नारायणा! तुझं नांव किती तरी गोड—किती तरी पवित्र आहे! थोडा वेळ मुखानं सेवा घडूं दे.

[ भजन करते.

पद.

**भजन बिना जलजयो ऐसा जीवना। भजन० ॥ ध्रु० ॥**

**परवत सूना एक बिरछ बिना बिरछ सुना एक पातबिना ॥**
**जल० ॥ १ ॥**
**मंदर सूना एक दीप बिना, दीपसुना एक तैलबिना ॥ २ ॥**
**तिरियासूनी एक पुरुष बिना, पुरुष सुना एक पुतर बिना ॥ ३ ॥**
**परजासूनी एक राज बिना, राज सुना एक न्याय बिना ॥ ४ ॥**
**समुंदर सूना एक शीप बिना, शीप सुनी एक स्वात बिना ॥ ५ ॥**
**कहत कबीरा सुन भै साधु, जीव सुना एक नाम बिना ॥६॥**

( भजनांत दंग झाली असतां रामजी येतो. )

**राम०**—आनंदराव आल्याती.

**कम०**—त्यांना सांग, स्वारी बाहेर गेली आहे. ( आनंदराव येतो ) ( उठून ) स्वारी बाहेर गेली आहे. [ रामजी जातो. ]

**आनं०**—( बसून ) मला ठाऊक आहे. मी आतांच त्यांना थिएटरच्या दरवाज्यांत शिरतांना पाहिलं.

**कम०**—( बावरते, परंतु लगेच हसूं आणून ) पाहिलं असेल! त्यांना काम फार पडतं हल्लीं तेव्हां करमणुकीकरितां गेले असतील नाटकाला. नाटकासारखं मनरंजन दुसऱ्या कशानंही होत नाहीं. ( स्वगत ) ही दुसरी पीडा आली; केव्हां जाते कुणाला ठाऊक!

( सचिंत चिपळ्या वाजवीत बसते. )

**आनं०**—( स्वगत ) माझा पहिला बाण तर वर्मीं लागला! पण त्याचं कांहींच वाटत नाहीं असं दाखविते ही. वस्ताद बायको आहे!

**कम०**—मी भगवंताचं भजन करून करमणूक करून घेत होतें.

**आनं०**—चालूं द्या तर मग तुमचं भजन. मी अजून कोणत्याही बाईला भजन करतांना पाहिलं नाहीं. माझ्या येण्यानं त्यांत व्यत्यय तर नाहीं ना आला?

**कम०**—तसं कांहीं नाहीं. मला एवढंच वाटतं, स्वारी इथं असती तर बरं झालं असतं. तुमच्याशीं बोलायला चालायला कुणी नाहीं.

**आनं०**—कमलाबाईसाहेब ! तुम्ही आहां हें पुष्कळ झालं. तुम्ही बोललांत म्हणजे झालं ! मला त्यांत आनंद आहे.

**कम०**—पण आपल्याला काय बोललं म्हणजे आवडेल तेंच मला समजत नाहीं. माझ्या बोलण्याचा तुम्हांला राग यायचा.

**आनं०**—(हंसून) मला राग ? तुमचं बोलणं आवडत नाहीं असा मनुष्यच नाहीं. जो तो तुमची स्तुति नाहीं का करीत ? आणि तुमच्यावर आषक्‌—नाहीं लोभ नाहीं का करीत ?

**कम०**—त्या तसल्या स्तुतीचाच मला संताप येतो. देवानं एखादीला रूप दिलं, तें लोकांनीं तिच्याकडे निर्लज्जपणानं टक लावून पहावं, कुजबुजावं, चेष्टा करावी म्हणून का दिलं आहे ?—असल्या हलक्या, नीच लोकांमुळं मला फार त्रास होतो.

**आनं०**—तुम्ही सुंदर झालांत म्हणून ही शिक्षा आहे तुम्हांला ! ( खुर्ची जवळ ओढून ) नानासाहेब परत केव्हां येतील ?

**कम०**—कांहीं सांगतां येत नाहीं. असं म्हणणं झालं होतं कीं आज मला बराच उशीर होईल. गणपतराव त्यांच्याबरोबर गेले आहेत.

[ चिपळया वाजवीत सचिंत बसते. ]

**आनं०**—( थोडा वेळ थांबून ) असं हें कुठपर्यंत चालणार ?—रागावूं नका. मी तुमचा एक खरा मित्र, तुमचं खरोखर कल्याण व्हावं म्हणून विचारतों कीं असं हें कुठपर्यंत चालणार ?

**कम०**—म्हणजे ? तुम्ही काय म्हणतां तें मला समजत नाहीं. तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय ?

**आनं**—( स्मित करून अडखळत ) माझ्या म्हणण्याचा अर्थ—म्हणजे गांवांतले जे चार लोक बोलतात तेंच मी बोलतों—नानासाहेबांना त्या नाटका-तल्या बाईचा जो भलताच नाद लागला आहे तो किती दिवस चालणार ?

**कम०**—तुमचा समज चुकीचा आहे—अगदीं साफ चुकीचा आहे. तुम्ही तिकडचे स्नेही आहां, तेव्हां असं जर कुणाला बोलतांना ऐकलंत, तर ताबडतोब खोटं आहे म्हणून सांगत जा. ह्या सगळ्या गप्पा आहेत आणि त्यांपासून तिक-डच्या अब्रूला कमीपणा आहे. त्यांत इतकंसुद्धां खरं नाहीं !

आनं०—खरं नाहीं? या दीपज्योति शपथ हें खरं आहे. बाईसाहेब ! मला अतिशय वाईट वाटतं पण बोलतोंच—नानासाहेबांनीं तुम्हांला फसवून शिंदळकी सुरू केली आहे.

कम०—(एकदम उभी राहून) असं बोलवतं तरी कसं तुमच्यानं? आनंदराव, तुम्ही चुकतां आहांत!—त्यांना थिएटरामध्यें जाण्यानं जर कमीपणा येतो तर तुम्ही तर तिथं नेहमीं जातां! मग तुम्हांला कसा नाहीं कमीपणा वाटत?—तिकडं नांवं ठेवायची तुमची योग्यता नाहीं. आपल्या पायाखालीं काय जळत आहे दिसत नाहीं वाटतं?

आनं०—बाईसाहेब! माझ्यावर रागावूं नका—माफ करा, मला बोलायचं कांहीं कारण नाहीं, पण माझ्याच्यानं बोलल्यावांचून कसं रहावेल? क्लबांत जा, मेवान्यांत जा, कुठंही जा, ज्याला त्याला तुमच्याबद्दल कळकळ वाटते. जो तो तुमच्याबद्दल हळहळतो! मग मी तर काय तुमचा यःकश्चित् का होईना पण मित्र. मग मला हें कसं सहन होईल?—उद्यां वर्तमानपत्रांमधून देखील यावर टीका होईल! हो, तेवढंच राहिलं आहे आतां.

कम०—मी पुन्हा सांगतें हें सगळं खोटं आहे.|या क्लबांतल्या आणि गांवांतल्या लोकांना मझ्याबद्दल कळकळ दाखवायचं आणि हळहळ वाटायचं कारण काय? माझी कुणालाही दया यायला नको! माझे पति चांगुलपणाची आणि सत्याची मूर्तिच आहेत! मला ते जगांतल्या सर्व लोकांहून श्रेष्ठ वाटतात! तेच माझ्या सौख्याचे आणि प्राणाचे धनी आहेत. त्यांची माझ्यावर कृपा असावी म्हणून मी रात्रंदिवस देवाची करुणा भाकीत असतें.—तुम्हांला जर माझ्याबद्दल कळकळ वाटत असली, तर एक गोष्ट माझ्याकरितां करा. असल्या खोडसाळपणाच्या गप्पा कुणी सांगूं लागलं, तर त्यांना जिथल्या तिथं दाबीत जा, मी किती आनंदांत आहे हें त्यांना कळवा, आणि त्यांनीं अगदीं बारीकसारीक गोष्टींत देखील मला कधींही फसवलं नाहीं असं स्पष्ट सांगा!

आनं०—कधीं फसवलं नाहीं असं तुम्ही म्हणतां? तुमची खात्री आहे?

कम०—हो खात्री आहे. जी जी गोष्ट मला ठाऊक असणं योग्य ती ती मला सांगितल्यावांचून कधींही रहात नाहींत. आणि मी—मी आपला सगळा जीव जरी

त्यांना संतुष्ट करण्यांत खर्च केला तरी त्यांचं माझ्यावर जें प्रेम आणि कृपा आहे त्यांची बरोबरी कधींही होणार नाहीं.

**आनं०**—बाईसाहेब! ही तुमची पतिनिष्ठा आणि पतिप्रेम अवर्णनीय आहेत. पण खऱ्या गोष्टी अगदीं निराळ्या आहेत. तुम्ही कितीही डोळेझांक केलीत तरी खरं तेंच खरं! नानासाहेब हीं तुमचीं स्तुतिपर भाषणं ऐकायला असते तर मला मनापासून आनंद झाला असता,-पण त्या ताराजीच्या मिठींतून ते इकडे येणार कसे?

**कम०**—( कानावर हात ठेऊन सर्वांगावर शहारे येऊन ) खोटं—अगदीं खोटं! ( बेशुद्ध पडते. आनंदराव प्रथम घाबरतो नंतर आनंदी दिसतो व कमलेस स्पर्श करावयास जातो, इतक्यांत दार वाजतें म्हणून तें बंद करून पुन्हा स्पर्श करावयास जातो, तोंच कमला उठते ) हें काय हें? तुम्हांला वेड तर नाहीं लागलं?

**आनं०**—हो, मला वेडच लागलं आहे. ( कमलेचा हात धरावयास जातो. ती संतापानें लाल होऊन दटावते. तो मागें सरतो. )

**कम०**—अरे देवा! हा का मनुष्य आहे?—अन्नूवर दरवडा घालणारा राक्षस! मित्राचं सोंग घेणारा भोंदू!—अरे मांगा, मीं असं काय केलं कीं तुझ्या मनांत माझ्याविषयीं विषयवासना उत्पन्न व्हावी!—मी तुला कोण वाटलें म्हणून माझ्या पवित्र देहाला स्पर्श करायला उद्युक्त व्हावंस?—मी कोण आहे तुला ठाऊक नाहीं?—मी नानासाहेब जहागिरदाराची सहधर्मचारिणी आहे बरं!—आणि तूंच तिकडची निंदा करीत होतास नाहीं?—तूंच! चल निघ.-एकदम या घरांतून चालता हो. पुन्हा पायरी चढशील तर खबरदार!—अजून उभा?—थांब, मी रामजीलाच हाक मारतें—

**आनं०**—जरा थांब—थोडा विचार कर. किती जरी हांका मारल्यास तरी कुणालाही आंत येतां येणं शक्य नाहीं. मीं केव्हांच दरवाजा बंद करून घेतला आहे!

**कम०**—काय तूं दरवाजा बंद केलास होय!—

[ भिंतीजवळच्या विष्णूच्या तसबिरीजवळ उभी रहाते. ]

**आनं०**—हो मीं बंद केला.–आणि दरवाजा बंद करूनच राहिलों नाहीं, तर तूं बेशुद्ध पडलीस तेव्हां या–या हातांनीं तुला गाढ आलिंगन दिलं!--

**कम०**—खोटं बोलायला तुला कांहींच कसं वाटत नाहीं ? माझं पातिव्रत्य इतकं जागरूक आहे कीं परपुरुषाचा नुसता स्पर्श झाला तर माझा पवित्र आत्मा या देहांत एक क्षणभरही वास करणार नाहीं, आणि माझ्या अंगाला दुष्ट बुद्धीनं स्पर्श करणाऱ्या हाताचे कोळसे झाल्यावांचून रहाणार नाहींत.

**आनं०**—अस्सं ? तर मग आत्तां पाहूं काय होतं तें !

[ तिला धरावयास जातो. ]

**कम०**—( त्याच्या मस्तकांत ठोसा मारून ) विश्वासघातक्या ! गळेकापू ! भ्याडा ! ( एकदम विष्णूच्या तसबिरीची कळ दाबून चोरदारांतून आंत जाते चोरदार बंद होतें. )

**आनं०**—काय ! ही कुठं गेली ? किती सफाइनं निसटून गेली–गेली म्हणून जाते कुठं !–आज तिला सोडीत नाहीं.–इथंच चोरदार असावं कारण हा विष्णु मला हंसतो आहे. अरे गुलामा ! मी असल्या देवांना नाहीं मोजीत ! ( लाथ मारतो. आंत घांट वाजते ) काय ही घंटा कुठं वाजते ? दरवाजा उघडूं या लौकर. ( धांवत जाऊन दरवाजा उघडतो तोंच रामजी येतो. )

**राम०**—( इकडे तिकडे पाहून ) बाईसायबांनीं घांट वाजवली ना ?

**आनं०**—( धीर धरून ) बाईसाहेबांनीं नव्हे–मीं वाजवली. मला जरा कंदील दाखव फाटकापर्यंत. [ दोघेही जातात. पडदा. ]

---

# प्रवेश ३ रा.

———:०:———

**स्थळ**—माजघर.

( कमला येते. )

**कम०**—माझं चित्त अगदीं भांबावून गेलं आहे.–या प्रकरणाचा कसा निकाल लावावा ?–समजा, मीं हें तिकडं सांगितलं तर ते क्षणाचाही विलंब न लावतां आनंदरावाला गांठतील आणि त्या बेरडाला चांगली शिक्षा करतील.–

पण अशानं त्या मेल्याचा आणि इकडचा मोठा तंटा होऊन स्वारीवरच संकट येईल.–असं झालं म्हणजे सगळे वाईट परिणाम एक माझ्या अविचारीपणामुळं स्वारीला भोगावे लागतील! –बरं, ही गोष्ट जर तिकडं कळवली नाहीं आणि फक्त या आनंदरावाला घरीं येण्याची मनाई केली तर ? –स्वारीला हें माझं वागणं चमत्कारिक नाहीं का वाटणार?–काय करावं कांहीं सुचत नाहीं.—तूर्त हें एवढंच राहूं द्यावें. आनंदराव बहुतेक आतां इकडं तोंड दाखवणार नाहीं.– मी उद्यां नीळकंठरावांच्या आईला भेटतें आणि त्यांनाच काय करावं तें विचारतें. त्या ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध आहेत, त्याच बरोबर मार्ग सांगतील. [ कमला जाते. ]

---

# प्रवेश ४ था.

——:०:——

**स्थळ**—रस्ता. 'काळकूट' वर्तमानपत्राच्या ऑफिससमोर.

**आनं०**—( हातांतील कागदावर थोडा वेळ पेन्सिलीनें लिहून ) बस्स झालं! पुरे इतकं. हा प्रकाश होता म्हणून बरं झालं. ( दारावर ठोकून ) कोण आहे दार उघडा हो!

**चाकर**—( आंतून ) कोन व्होवं ?

**आनं०**—सखारामपंत एडिटर आहेत का ? ( चाकर येतो )

**चाकर**—व्हय हाईत.

**आनं०**—त्यांना खालीं पाठवून दे.

**चाकर**—पन् वर गानं नाचनं चाललं हाय तवां त्ये कुनालाबी भेटनार न्हाईत.

**आनं०**—आनंदराव इनामदार आले आहेत म्हणून सांग.

**चाकर**—मग आमंदी या की.

**आनं०**—नको; त्यांनाच इकडं गपचिप पाठवून दे.

( चाकर जातो. आनंदराव कागद पुन्हा वाचतो. सखारामपंत झिंगत येतो.)

**सखा०**—अरे वा! इनामदारसाहेब! कुठून मेहेरबानी झाली ही ? वर गाणं चाललं आहे. म्हैसूरकडच्या आहेत. थोडी आंत यायची तसदी घ्याल तर उपकार होतील.

**आनं०**—माफ करा. आतां रात्र फार झाली आहे. मी एवढ्याकरितांच आलों–हा लेख आपल्या कालकूटाकरितां लिहिला आहे. आपल्याला आवडण्यासारखाच तो आहे—

**सखा०**—( कागद घेऊन ) पण आधींच सांगून ठेवतों, या अंकांत घालतां येईलच असं सांगतां येत नाहीं. कारण उद्यांचा अंक छापून तयारही असेल.

**आनं०**—कांहीं हरकत नाहीं. परवांच्या अंकांत द्या. वाचून पहातां ना ?

**सखा०**—हो तर ! (वाचतों) "आम्हांला पक्क्या आधारावरून असें कळतें कीं, येथील वरिष्ठ कोर्टांत लवकरच एक मासलेवाईक अन्नवस्त्राचा वादा येणार आहे."

**आनं०**—नीट वाचा. वादा नाहीं.

**सखा०**—"वादा" नव्हे, दावा. हंहं ! दावा येणार आहे. सरदाराग्रणी श्रीमंत नानासाहेब जहागिरदार" बरं मग ?

**आनं०**—पुढें वाचा.

**सखा०**—तेंच करतोंय् . "जहागिरदार यांनीं बद्रिकाश्रमीं जाऊन एका तपस्वी कन्येबरोबर कांहीं महिन्यापूर्वीं विवाह केल्याचें आमच्या वाचकांस आठवत असेलच. त्यानंतर सुधारकांच्या नेहमींच्या आचरटपणास अनुसरूनच दुसऱ्या एका चिखलांत–किंबहुना दुर्गंधींत सडत पडलेल्या गाईला वर काढण्याचा स्तुत्य हेतु श्री. नानासाहेब यांनीं मनांत धरावा हें योग्यच आहे." कोण ?

**आनं०**—पुढं चालूं द्या.

**सखा०**—"ही गाय म्हणजे श्री राधाकृष्णप्रासादिक मंडळींतील प्रख्यात गुणवती नटी ताराजी या होत." हं ! "अलीकडे दोनचार महिने श्री. नानासाहेब यांनीं गुणवती ताराजीला आपल्या अंगरूपी छत्राखालीं घेतली होती" माझ्या जवळ बोलत नाहीं कशी ? "पण आतां त्यांना अर्धांगी करण्याचा त्यांचा मानस आहे." कमलाबाईसाहेब मेल्या कीं काय ?

**आनं०**—तुम्ही शेवटपर्यंत वाचा अगोदर.

**सखा०**—"श्रीमंतांचें पहिलें कुटुंब श्री. सौभाग्यवती कमलाबाईसाहेब यांना ही गोष्ट असह्य होऊन"–त्यांनीं जीव दिला ?

**आनं०**—नाहीं. आज जरा जास्त झालं वाटतं.

**सखा०**—हो जरा गाणं नाचणं चाललं आहे.

**आनं०**—वाचा पुढं.

**सखा०**—हो बरी आठवण केलीत. " असह्य होऊन त्यांनीं श्रीमंतांवर अन्नवस्त्राचा दावा आणण्याचा विचार केला आहे. आम्ही आणखी असेंही ऐकतों " पण मी वाचतों आहे !

**आनं०**—मी ऐकतों आहे ! चला वाचा पुढं.

**सखा०**—" असेंही ऐकतों कीं बाईसाहेबांनीं एका रूपगुणसंपन्न तरुणाचा आश्रय-सल्ला घेतला आहे." कोण ? आपण ! " सुधारणेचे दुष्परिणाम जितके स्पष्ट दिसतील तितके चांगलेच असल्यामुळें आम्ही श्रीमंत नानासाहेबांचे फार आभारी आहोंत. " ( गुंडाळीत ) छान आहे ! अगदीं चुरचुरीत आहे !-पण याच्या खरेपणाबद्दल जरा—


**आनं०**—मी खोटं लिहीन ? तुमचा माझ्यावर विश्वास नाहीं तर ?

( दोन नोटा हातांत देतो. )

**सखा०**—छः छेः छेः ! तसं नव्हे, तसं नव्हे ! तुमचा दर्जा आणि बाकीच्या -( नोटा मोजीत ) पन्नास आणि पन्नास शंभर-गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे.- तुम्हांला सहाजिकच खऱ्या बातम्या लागणार !-आमच्या कालकुटांत पुष्कळ झणझणीत लेख लिहून त्याला तुम्हीं ऋणी करून ठेवलं आहे, पण एवढंच, नानासाहेब अशा दुर्वर्तनाला लागतील असं वाटत नव्हतं.-पण आपण सगळीं माणसंच आहोंत,—बरं परवांच्या अंकांत हा मजकूर येईल.

**आनं०**—त्या अंकाच्या एक शंभर प्रति माझ्याकडे पाठवा. जिकडे तिकडे पाठविल्या पाहिजेत ना ? त्यांचं बिल निराळं मिळेल.-तुमच्यावर खटलाबिटला व्हायची तर तुम्हांला भीति वाटत नाहीं ना ?

**सखा०**—हाः हाः हाः हाः !-मला भीति? अहो, माझ्यावर खटला व्हावा हीच माझी इच्छा आहे. यापेक्षां मला जास्त काय प्रिय असणार ! खटला झाला म्हणजे कालकूट लोकप्रिय झालाच. आणि प्रसिद्धीबरोबर संपत्तीचीही वृद्धि आहेच. हाः हाः हाः हाः ! तुम्ही वर येत नाहीं तर ? गाणाऱ्या चांगल्या असून नाचकाम उत्तम करतात. पात्रही देखणं आहे !



सखा०—पण याच्या खरेपणाबद्दल जरा— [ अं. ३ रा प्र. ४ था पृ. ७०

**आनं०**—माफ करा. येतों आतां. ( सखारामपंत जातो. ) छान झालं. आतां मला समाधान वाटत आहे.–पण हें डोकं फार ठणकतं आहे–तडाखा जबर मारला शिंचीनं ! ( पॉकेटमिररमध्यें तोंड पाहून ) अरे बाप रे ! केवढा हा वळच्या वळ ! वा पॉकेटमिररा ! ज्या तुझ्यामध्यें मी नाटकाला बसलों असतां स्वतःचा चेहरा पाहण्याच्या मिषानं ग्यालरीमधील सुंदर सुंदर बायकांना प्रतिबिंबाच्या रूपानं हातांत धरून त्यांचं दर्शन घेत असें, त्याच तुझ्यामध्यें या एका अवदसेनं मारलेला टोला पहाण्याचं या माझ्या फुटक्या कपाळीं यावं ना ?–ठीक आहे पाहून घेईन. ही माझ्या हातून सुटणार काय! जोंपर्यंत आमच्यासारख्या वजनदार सद्‌गृहस्थांच्या मोलवान् शब्दावर वाटेल तो मजकूर छापायला असलीं हीं द्रव्यलोभी एडिटरं तयार आहेत, तोंपर्यंत एखाद्या महापतिव्रतेलासुद्धां भर बाजारांत ओढायला आम्ही कमी करणार नाहीं.

[ जातो. ]

## अंक ३ रा समाप्त.

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

स्थळ—आनंदरावाचा दिवाणखाना.

( ताराजी बसली आहे. )

**तारा०**—मला मुद्दाम चिठ्ठी लिहून घरीं बोलावलं आणि आनंदराव तर इथं नाहींत! आतां त्यांची किती वाट पहावी बाई! त्या कोण बाईला माझी भेट पाहिजे होती तीही अजून आली नाहीं. मला तर आतां बसून कंटाळा आला.–थोडा वेळ वाट पाहून जाऊं झालं. ( आनंदराव येतो. )-वाः! आम्हांला खूप तिष्ठत ठेवलंत! कां बोलावलं होतं?

**आनं०**—( कानांत सांगतो–ती हंसते )–एवढ्याचकरितां. त्या बाई आत्तांच आल्या. मी त्यांना आंत पाठवितों. त्यांना लागेल तें द्या म्हणजे झालं. त्यांना तुमच्याशीं एकांत पाहिजे, तेव्हां मी बाहेरच रहातों म्हणजे दुसऱ्या कुणाचा उपद्रव होणार नाहीं.

**तारा०**—त्यांना एकांत हवा असला तर तुम्ही इथं रहा, मी दरवाजा संभाळतें. हंः हंः हंः हंः!–जा तर त्यांना द्या पाठवून.

[ आनंदराव जातो. ]

मला तर बाई नवल वाटतं, या थोर घराण्यांतल्या बायकांना दुसऱ्यांची उठाठेव कां? ( राधाबाई येते ) या. आपण कोण तें मला माहीत नव्हतं—

**राधा०**—ताराबाई! आमचं हो नांव तुमच्या कानापर्यंत कुठून येणार! तुमच्यासारखं ज्याच्या त्याच्या तोंडीं असणं नशीबींच लागतं!–एका खासगी गोष्टीसंबंधानं तुमच्याकडून कांहीं बातमी मिळवावी म्हणून मी आलें आहे; त्या गोष्टीवर माझ्या एका जिवलग मैत्रिणीचं सुखदुःख अवलंबून आहे. ( ताराजी

कांहींच बोलत नाहीं असें पाहून )-माझ्या परिचयाचे श्रीमंत नानासाहेब जहागिरदार म्हणून एक गृहस्थ आहेत त्यांना आपण ओळखतांच?

**तारा०**—होय, ओळखतें.

**राधा०**—ते तुमच्याकडे नेहमीं येत असतात, नाहीं?

**तारा०**—नेहमीं येत असतात.

**राधा०**—तुम्हांला कदाचित् मी तुमची जबानी घेतें असं वाटेल-पण मी तुम्हांला कांहीं विचारूं का?

**तारा०**—बेलाशक! वाटेल तें विचारा. किती का विचारा ना-उत्तर द्यायला माल मी बांधलेली नाहीं!

**राधा०**—( स्वगत ) काय जहांबाज बायको आहे. ( उघड ) आनंदरावांनीं मला सांगितलं—

**तारा०**—( हंसून ) हं-हं-हं-! मग मला तसं अगोदरच सांगावं कीं नाहीं?-आतां बरोबर. आनंदरावांची आणि तुमची बरीच दाट ओळख आहे, मला सांगितलं त्यांनीं!

**राधा०**—त्यांची माझी फक्त ओळख आहे बऱ्याच दिवसांची.

**तारा०**—मोठी मापुक स्वारी आहे नाहीं बरं ती?-खरं ना?-

**राधा०**—( स्वगत ) काय बेमुर्वतखोर बायको आहे!

**तारा०**—बरं, तुम्हांला नानासाहेबासंबंधाची हकीगत हवी आहे?-मी सांगतें.-माझ्या भानगडींत ते आपण होऊन पडले आहेत—

**राधा०**—पण ती भानगडच काय आहे?

**तारा०**—ती उठाठेव तुम्हांला कशाला? त्या भानगडीसंबंधानं मी तुमच्याजवळ एक अक्षर देखील बोलणार नाहीं. पण त्या भानगडींत नानासाहेबांचा संबंध आहे-आहे म्हणजे काय? त्यांना आहे असं वाटतं, आणि म्हणूनच ते नेहमीं माझ्याकडे येतात आणि पुष्कळ वेळ त्यासंबंधानं बोलत बसतात. त्यांची डाळ माझ्याजवळ मुळींच शिजत नाहीं. पण त्यामुळं मला त्रासच होतो. ( जांभई देऊन ) त्यांची नीति फार कडक आहे तुम्हांला असेलच माहीत. त्यांना उपदेश करायला फार हवा आणि अशा माणसांशीं मला नीट वागतां येत नाहीं.

**राधा०**—तुम्हांला हें पसंत नाहीं तर मग ?

**तारा०**—छत् ! मला हें मुळींच आवडत नाहीं. आमचीं आपलीं माणसं आनंदरावासारखीं निराळीं !–पण काय चमत्कार आहे पहा–ते इथं येतात म्हणून त्यांच्याबद्दल गांवांत कोण कंड्या उठल्या आहेत बाई! एका अर्थीं हें छान झालं आहे ! त्यांना असंच पाहिजे. माझ्या भानगडीत त्यांनीं कां म्हणून पडावं?–हें पहा काल रात्रींच त्यांचं मला एक पत्र आलं आहे. तुम्ही हवं तर वाचून पहा तें! [ पत्र देते. ]

**राधा०**—( पत्र वाचते ) "ताराजी यांस–माझे एक स्नेही अत्यवस्थ आहेत अशी तार आल्यामुळें मी आतांच पुण्यास जाण्याच्या गडबडींत आहे. तुम्ही आशेला जागा न ठेवल्यामुळें मला सुचेनासें झालें आहे. मीं जीं जीं वचनें दिलीं आहेत तीं तीं पुरीं करायला तयार आहे. तुम्हांला द्रव्याची किंवा कसलीही दधात पडणार नाहीं; उलट तुमच्या हातीं अपार संपत्ति येऊन, तुम्हांला स्थाईकपणा मिळेल व तुमच्या सध्यांच्या रहाणीपेक्षां जास्त सुख होईल. शिवाय, तुमच्यामुळें ज्याचें आयुष्य निःसार होऊन ज्याला जीव नकोसा झाला आहे, असा एक हतभागी प्राणी मृत्युमुखांत पडत आहे, त्याला जीवदान दिलेंत असें समजून तो तुमचा जन्माचा ऋणी होईल. तुमच्या अंतः–करणाला थोडी तरी दया येऊं द्या. इतक्या निष्ठुर होऊं नका. पुन्हा एकवार मला भेट द्याच. माझ्या शब्दाची तुमच्या जवळ थोडी तरी किंमत असूं द्या. अधीक काय लिहूं. नानासाहेब."

––ताराबाई! या पत्राची तुम्हांला काय गरज आहे आतां? मला द्या ना हें?

**तारा०**—तुम्हांला हो काय करायचं आहे तें !–उगीच त्यांना चिडवायला हवं असेल !

**राधा०**—होय, तेवढ्याकरितांच पाहिजे म्हणा ना !–तुमच्या भानगडींत नानासाहेबांनीं पडावं ही त्यांची मोठी चुकी आहे–अगदीं मूर्खपणा आहे, आणि त्यापासून तुम्हांला बराच त्रासही होत असेल—

**तारा०**—हो, होतोच.

**राधा०**—तर मग या पत्राच्या सहाय्यानं–कारण या पत्रांतलं सगळं गाणं त्याच्या गळ्यांत येतं आहे–मी नानासाहेबांचा तुमच्या मागचा त्रास कमी

करीन.–त्यांनीं पुन्हा तुमच्या वाटेलाही जाऊं नये असं करीन, समजलं का? पण हें पत्र मात्र तुम्हीं मला दिलं पाहिजे.–तुम्हांला राग येत नसेल तर मी इतकंसुद्धां बोलून ठेवतें कीं या पत्राबद्दल मी तुम्हांला कांहीं तरी मोबदला मनाजोगा–घेण्यासारखाच मोबदला—

**तारा०**—असं चाचपून कशाला पहातां? मी सांगतें, तुम्ही मला पैसे देणार—होय ना?

**राधा०**—( हंसून ) तुम्ही जर अगदीं मोकळया मनानं बोलतां तर—

**तारा०**—अर्थात्! माझा व्यवहार नेहमीं मोकळा असतो. हंः हंः हंः!–शिवाय 'हंः हंः हंः' 'नको नको' असं ढोंग करण्यांत काय अर्थ आहे? पैसा आहे तर सारं कांहीं आहे. तो नसला तर एवढे खाण्यापिण्याचे, कपड्यालत्त्याचे, गाडीघोड्याचे खर्च चालावेत कसे? कुणाचं तरी चाललं आहे का त्यावांचून?–मला या मूर्ख लोकांकडून इतकीं पत्रं येतात कीं तीं फाडून त्यांना कचऱ्याची पेटीच दाखवावी लागते. त्याऐवजीं त्या पत्रांबद्दल जर मला पैसे मिळत असले तर मी हा धंदा बंद करीन.

**राधा०**—छेः बाई! हा धंदा सोडून दिलांत तर सगळया जगाचं नुकसान होईल. तुमच्यावांचून आमच्या या शहरच्या लोकांचं चालायचंच नाहीं. ( नोटा काढून )–तर मग हें पत्र ठेवतेंच.

**तारा०**—बेलाशक ठेवा. ( राधाबाईजवळून नोटा घेत )—आणखी नानासाहेबांना म्हणावं आपलीं कामं नीट संभाळा–तुमच्या परिचयाचे ते आहेत तेव्हां त्यांना सांगा, ताराजी म्हणत होती कीं आपल्या घरच्या भानगडी कराव्यात–दुसऱ्याच्या भानगडींत कां पडतां?—तुम्हीच सांगा, इथं येऊन रोज मला सन्मार्गाचा आणि धर्माचा उपदेश करून यांना काय करायचं आहे? मला त्यांचे उपदेश नको आहेत. नीति आणि अनीति! जितक्या म्हणून बायका हा धंदा करतात त्यांच्यापेक्षां माझं आचरण किती तरी शुद्ध आहे. कोण म्हणतं माझं वर्तन चांगलं नाहीं म्हणून? तुमची छाती आहे म्हणायची?—आम्ही नाटकांतल्या म्हणून आमचं आचरण वाईट! पण तुमच्यासारख्या कितीक बायका आम्हांला खालीं पहायला लावतील. फरक काय तुमच्या आमच्यांत? तुम्ही नवऱ्याच्या जवळ रहातां आणि आम्ही नवरे सोडून—

**राधा०**—जाऊं द्या तें! मला तर बाई तुमच्यासारख्या साऱ्या नामांकित नटांबद्दल मोठा आदर वाटतो. रंगदेवीच्या गळ्यांतले अलंकारच ते! कांहीं वर्षांपूर्वी लोक नटांच्या सावलीला देखील उभे रहात नव्हते, पण आतां तुमच्या नाटकाच्या धंद्यांतल्या माणसांना मोठमोठे लोकदेखील घरीं बोलवून मान देऊं लागले आहेत.

**तारा०**—आम्हांला नाहीं अजून देऊं लागले. पुरुष-नटांना द्यायला लागले आहेत खरे, पण आम्हां स्त्री-नटींना बरीक उघड मान देत नाहींत. घरीं येऊन सारवणी मात्र करितात मागाहून!–बरं, मला आतां गेलं पाहिजे. [ उठते. ]

**राधा०**—( उठून ) तुम्ही माझ्या शब्दाला मान दिलांत—

**तारा०**—छेः छेः तसं कांहीं नाहीं. त्यांत कांहींच नाहीं.–बरं तर मी येतें आतां. [ ताराजी जाते. ]

**राधा०**—( स्वगत ) शर्थ आहे बाई या बाईची! सटवीनं आपल्या बरोबरीला मला आणून ठेवलंन्!–पण आपलं काम तर झालं!–तारेच्या नानासाहेबांसंबंधाच्या भाषणावरून मी म्हणत होतें तसा त्यांचा प्रेमसंबंध दिसत नाहीं. ( पत्र पाहून )–पण या पत्रावरून तर नानासाहेबांत पाणी मुरतंय्, यांत शंकाच नाहीं!–या पत्रावरून असं दिसतं कीं तारेवर त्यांचं अनिवार प्रेम आहे. पण ती त्याला झिडकारते आहे!–असंच असलं पाहिजे.–तरी पण तारा स्वतः म्हणते कीं ते मला नीतिपर उपदेश करतात! हें मात्र याच्याशीं मुळींच जुळत नाहीं. तो तिच्यावर फिदा झाला असता तर बाई तो तिला उपदेश कसा करता?–खरं असो किंवा खोटं असो–कमलेला हें पत्र दाखवायचंच.–तिला पुरावा पाहिजे का? हा घे पुरावा. हा तर तुला नाकबूल करतां येत नाहीं!

[ आनंदराव येतो. ]

**आनं०**—का झालं काम? तुम्हांला पत्र दिलं म्हणून ती म्हणत होती. पाहूं तें पत्र?

**राधा०**—हें पहा. ( उघडून दाखविते पण चपापून ) पण थांबा हं–या पत्रावर नुसतं 'ताराजी' असं कसं लिहिलं? 'प्राणप्रिये,' 'जिवलगे' किंवा नुसतं 'प्रिये' असं सुद्धां कसं नाहीं?–कमलेनं ही शंका काढली तर?—

**आनं०**--( पत्र वाचून ) वाः ! मजकूर तर अगदीं उघड उघड आहे ! मग शंका कां ? मायन्यांत काय आहे ? नानासाहेब कांहीं या कामांत आमच्या सारखा बाकबगार नाहीं. पण तुम्हांला मायन्याचाच कमीपणा वाटत असला तर अक्षरासारखं अक्षर काढण्याची कला या पठ्याला कांहीं विशेष कठीण नाहीं वाटत ! ( लिहून ) हें घे तुझं 'प्राणप्रिये!–' झालं ? आतां गेली काळजी ?

**राधा०**--आतां पार गेली ! आज मात्र मला तुमचा उपयोग झाला खरा !

**आनं०**--मग आतां तरी आमचं बक्षीस ?

**राधा०**--बक्षीस काम झाल्यावर. [ एकदम निघून जाते. पडदा. ]

---

# प्रवेश २ रा.

——:०:——

**स्थळ**--रस्ता.

( ताराजी येते. )

**तारा०**--ही बया राधाबाई आणि आनंदराव कांहीं तरी कृष्णकारस्थान करायच्या खटपटींत आहेत.—काय असेल बरं ?–कांहीं का असेना ! माझ्या मागचा हा नानासाहेबांचा त्रास यांनीं चुकविला म्हणजे झालं ! मला खरोखर त्या नानासाहेबांच्या धर्मपर व्याख्यानांचा अगदीं वीट आला आहे.—अगदीं ब्रह्मदेव आला म्हणून मी का हा नाटकाचा धंदा सोडणार आहे आणि दूर कुठं तरी रहायला जाणार आहे ? खुळा कुठला !—पाहूं द्या–( नोटा मोजीत ) पन्नास–पन्नास–शंभर–मिळून दोनशें ! ठीक आहे !–कांहीं वाईट नाहीं ! ( छगन एक गांठोडें घेऊन रडत येतो. ) कां रे छगन ! असा रडत रडत चाललास कुठं ? कुठल्या मुशाफरीला निघाला आहेस ?–इकडं ये पाहूं असा.

**छग०**--कशाला यायचं ? तुमचे नोकर झालों म्हणून आम्हांला कांहींच मान नाहीं वाटतं ! [ रडतो. ]

**तारा०**--अरे पण तुझा एवढा अपमान तरी काय झाला ?

छग०—काय झाला म्हणजे? तुम्ही घरीं असतां तोंपर्यंत कुणी बोलत नाहीं, पण तुम्ही कुठं बाहेर गेलां रे गेलां कीं लागले सगळे हात धुवून माझ्या मागं.

तारा०—मी नसलेली पाहून धरला वाटतं तुला कुणीं फैलावर?

छग०—कुणाची माय व्याली आहे मला फैलावर धरायची! त्या सोमरस नाटकमंडळींतला तो काळू आला होता आणि तोन् मी जरा मजेंत चहा घेत बसलों होतों, तों केशवराव म्यानेजर आले आणि म्हणतात कसं “काय रे छगन्या, तीं हॅण्डबिलं वांटायचीं सोडून गप्पा काय मारीत बसला आहेस!”—तुमच्या खोलींत एक सिगारेटचं खूट पडलं होतं तें मीं फेंकून देण्याकरितां हातांत घेतलं होतं, तर म्हणतात काय “ताराजींच्या सिगारेट तूं चोरून ओढतोस काय!” आणि मग त्यांनीं माझ्या दोनचार कानशिलांत लगावल्या. ( रडतो ) आम्हांला काय हात नव्हते वाटतं? पण म्हटलं जाऊं द्या. आपण राहूंच नये या कंपनींत! आतांच्या गाडीनं मी जातों कसा.

तारा०—वेडा कुठला! चल घरीं. मी सांगतें केशवरावांना. पोरानं जरा मजा केली तर या म्यानेजरांच्या कां पोटांत दुखतं?

छग०—जेवायला बसलों तरी तसंच! आम्हीं कांहीं मागावं तर तिकडे कुणी लक्षच देत नाहीं. गडीमाणसं—जो तो आम्हांला बोलणार!

तारा०—बरं पण आतां चल घरीं.

छग०—तालीममास्तर तरी तसेच! कधीं कामंही देत नाहींत! दिलींच तर तीं कसलीं दासीबिसींचीं. त्या बाबूवर मात्र नेहमीं चांगलीं चांगलीं कामं नेमतात. तो नको म्हणाला तरी त्याला पाठीलागून कामं देतात. तो चुकला तरी त्याला रागवत नाहींत. उलट त्याचं चुकलेलंच बरोबर म्हणतात. तेच आम्ही चुकलों तर खाडकन् तोंडांत देतात! ( रडतो ) आम्हांला काय हात नसतात वाटतं!—शिकवतां तर कांहीं येत नाहीं पण उगीच मिजास!

तारा०—अरे असं बोलूं नये.

छग०—बोलूं नये म्हणजे? तुम्हांलासुद्धां तो शिकवायला पहातो. मला असा राग येतो—पण तुम्हीच कांहीं बोलत नाहीं. फार त्याचं प्रस्थ माजलं आहे!

**तारा०**--अरे तें असूं दे. चल घरीं. माझी खोली सोडून तूं आतां कुठं जाऊं नकोस, मग तर झालं ना ?

**छग०**—पण तुमच्यामुळंच मला सारे चिडवतात, आणि माझी भलतीच थट्टा करतात !

**तारा०**—अरे थट्टाच करतात ना? मग काय !

**छग०**--पण लोकांत आम्हीं आमची मंडळी अशी आहे तशी आहे म्हणून बढाई मारावी आणि यांनीं आम्हांला असं वागवावं म्हणजे काय !

**तारा०**—बरं, मी करतें त्याचा बंदोबस्त.–आजपासून कंपनीचे मालकच बदलून टाकतें.–हें बघ, तूं आपलं हें गांठोडं घरीं नेऊन ठेव,–नाहीं तर चल माझ्याच बरोबर. हो, पण काय रे छगन ! माझ्या खोलींत सकाळीं तुला एक अधेली सांपडली ना ?

**छग०**--मला ?–छे बुवा ! मी तुम्हांला आणून नसती दिली का ?

( साळू मागें येते. )

**तारा०**—मला तूं कुठं आणून देशील ! मी गेलें होतें आनंदरावांकडं. तुला कुठं ठाऊक होतं तें.–अरे, आज ध्यानीं मनीं नसतां एका चिटोऱ्याची दोनशें रुपये किंमत आली !

**साळू**—( स्वगत ) चांगला धागा लागला ! कोण कोण होतं तेही कळलं ! बाईसाहेब काय लगबगीनं गेल्या पण ! हिच्या पाळतीवर आलें म्हणून बरं झालं. [ साळू जाते. ]

**तारा०**—तेव्हां हें बघ, आजपासून माझ्या खोलींतलीं सगळीं चिटोरीं नीट जपून माझ्याकडे आणून देत जा. आज हा एक नवीनच धंदा सुरू केला आहे, तेव्हां जरा रंग उडाला पाहिजे. ती तुला सांपडलेली अधेली तुझ्याजवळ आहेच, हे आणखी दोन रुपये घे आणि एक छानदार ब्लॅक ॲन्ड व्हाइट स्कॉच व्हिस्कीची बाटली आणून दे.

**छग०**– पण माझ्याजवळ अधेली देवा शपथ नाहीं.

**तारा०**—काळूच्या मेजवानीला खपली वाटतं सगळी ?

**छग०**—गुरुशपथ, मीं ती—

**तारा०**—खर्चून टाकली !–म्हण ?–बरं, हा आणखी एक रुपया घे आणि यांतली अधेली राहील ती मला परत आणून दे. नाहीं तर हें बघ, रस्त्यांत पडली म्हणून सांगशील. [ जातात. ]

---

# प्रवेश ३ रा.

—*—

**स्थळः**—कमलेचा दिवाणखाना,

( राधाबाई बसली आहे, कमला येते. )

**कम०**—तुम्हांला बराच वेळ तिष्ठत बसावं लागलं. येणार होतां तर अगोदर सांगून पाठवावं कीं नाहीं ? मी घरीं लवकर आलें असतें. आज स्वारी पुण्यास गेली आहे, उद्यांपर्यंत यायचे नाहींत. तेव्हां म्हटलं नीळकंठरावांच्या आईना भेटून यावं, म्हणून त्यांच्याकडे गेलें होतें. त्यांनीं आग्रह केला, तेव्हां तिथंच फराळ केला.–पण तुम्ही बोलत कां नाहीं ? आणि तुमचा चेहराही गंभीर कां दिसतो ?

**राधा०**—गंभीर दिसतो ?–कांहीं तरी कारणानंच दिसत असेल.–नानासाहेब पुण्यास गेले आहेत ?

**कम०**—होय. बापुसाहेब अत्यवस्थ आहेत अशी तार आली, म्हणून त्यांना जावं लागलं.–मी चहा मागवतें थांबा हं.

**राधा०**—नको, एवढ्यांत चहाबिहा कांहीं नको. ( कमलेकडे कळवळ्यानें पाहून ) कमलाबाईसाहेब ! तुमच्या मनाला धक्का बसण्यासारखं कांहीं कळवायचं माझ्या नशिबीं आलं आहे. तुम्हांला तें ऐकवेल तरी कसं ?

**कम०**—म्हणजे ! तुमच्या म्हणण्याचा अर्थ तरी काय ?–स्वारीसंबंधानं तर कांहीं नाहीं ना ?

**राधा०**—होय, त्यांच्याचसंबंधानं—

**कम०**—काय, स्वारीसंबंधानं ? काय बरं ? माझ्या काळजाचं पाणी झालं आहे. बोला–बोला लवकर.

**राधा०**—बाईसाहेब! आतां मन घट्ट करून दुःख सोसल्यावांचून गत्यंतर नाहीं. असल्या गरीब गाईची देवालासुद्धां करुणा येऊं नये ना?

**कम०**—राधाबाई! मी काय समजूं? शेवटचं काय तें एकदम सांगा. माझ्यानं नाहीं आतां धीर धरवत.

**राधा०**—तेंच सांगतें, नानासाहेब पुण्यास गेले पण—

**कम०**—पण काय?

**राधा०**—जाण्यापूर्वी ताराजीला—

**कम०**—त्या नाटकांतल्या बाईसंबंधानं जर कांहीं बोलायचं असलं तर मी तें ऐकूं इच्छित नाहीं. मीं इतके दिवस असल्या गोष्टी ऐकल्या हीच माझी चुकी झाली. पतीच्यासंबंधानं चुगल्या ऐकणं, हें पत्नीचं शील नव्हे!—ते त्या तारेला भेटत असले तर ते कुणा स्नेह्याच्या कामाकरितां भेटत नसतील कशावरून?—आपण नाटकाला गेलों होतों त्या वेळीं ते पडद्यांत तारेला भेटले तेव्हांच मीं विचारलं, त्या वेळीं मी कांहीं कामाकारितां गेलों होतों, असं नाहीं का ते म्हणाले? आपले नीळकंठरावसुद्धां ती कृष्णाबाई म्हणून एका नाटक मंडळीची मालकीण होती तिच्याकडं जात. पण कशाकरतां?—त्यांच्या एका मित्रानं लिहिलेलं नाटक त्या मंडळीनं बसवावं म्हणून! मग हे तरी तशाच कांहीं तरी कामाकरतां कशावरून नसतील जात?—त्यांच्या प्रेमाबद्दल, एवढासासुद्धां संशय घेणं मला शोभत नाहीं. म्हणून म्हणतें राधाबाई, ज्या गोष्टीमुळं माझ्या मनाला वाईट वाटतं, ती गोष्ट काढून तिच्यावर कशाला चर्वितचर्वण करितां?

**राधा०**—तुमचं कसं का असेना—मला बोलायचं कारण नाहीं. पण तुम्ही जी आतां तुलना केलीत ती मात्र पार चुकली! कृष्णाबाईच्या आणि तारेच्या योग्यतेंत जमीनअस्मानाचं अंतर आहे. शिवाय कृष्णाबाई म्हातारी आहे! आणि नीळकंठराव कुठंही गेले तरी त्यांच्यावर टीका करण्याची कुणाची प्राज्ञा आहे? तुम्ही माझ्यावर रागावा, वाटेल तें करा, पण मीं जर तुम्हांला हें दाखिवलं नाहीं, तर मीं स्नेहधर्म पाळला नाहीं असं मला वाटेल. (पत्र दाखवून) हें तुमच्या पतिराजांचंच अक्षर ना?—हें पत्र नानासाहेबांनीं काल रात्रीं ताराजीला पाठविलं. तिनं स्वतः आज सकाळीं हें मला दिलं! [पत्र देते.]

**कम०**—( परत पत्र फेंकून ) पण मीं तें काय म्हणून वाचावं ?

**राधा०**—काय म्हणून ? तुम्ही त्यांच्या अर्धांगी आहां म्हणून ! तुम्हांला कांहीं तरी अभिमान आहे ? असलं पत्र तुमच्या नवऱ्यानं त्या तसल्या बायकोला लिहावं का ?–जरा तरी शरम धरायची होती ! हें त्यांचं वर्तन सहन करणं न करणं तुमच्यावर आहे. आपला आपण मान राखला पाहिजे, समजलांत ? पतीवर किती का प्रेम असेना! असल्या समजून उमजून केलेल्या अपमानाबद्दल कुणीही क्षमा करणार नाहीं !

**कम०**—त्यांनीं माझे सहस्र अपराध केले, तरी माझं प्रेम त्यांना क्षमाच करील. ( पत्र वाचून थरथर कांपते ) " ज्याचं आयुष्य निस्सार होऊन ज्याला जीव नकोसा झाला आहे– " [ विचारांत बसते. ]

**राधा०**—( स्वगत ) हिला कांहींच वाटलेलं दिसत नाहीं !–माझ्या अंगाचा नुसता संताप झाला आहे. ( उघड ) तुम्हांला काय वाटतं आतां ?

**कम०**—कांहीं एक नाहीं.

**राधा०**—कांहीं एक नाहीं ?

**कम०**—तिकडच्या विरुद्ध कांहीं एक नाहीं. कारण हा तिकडचा दोष नव्हे–माझा आहे. त्यांचं आयुष्य निःसार होऊन त्यांना जीव नकोसा व्हावा हा माझा अपराध आहे. त्यांना हवं होतं तें माझ्यांत असतं तर त्यांना माझा कंटाळा येता ना. ( दुःखानें ) मला माझ्याबद्दल कांहींच वाटत नाहीं, पण त्यांच्या सुखाच्या आड मी आलें याबद्दल मला जास्त वाईट वाटतं.–हें पत्र तुम्हांला कुणीं दिलं ?

**राधा०**—मी मघांशींच नाहीं सांगितलं, तारेनं स्वतः दिलं म्हणून ?

**कम०**—पण तिनं हें तुम्हांला द्यायचं काय कारण ?

**राधा०**—( चचरत ) कारण–कारण–नानासाहेबांचा माझा परिचय आहे असं तिला कळलं, तेव्हां ती मुद्दाम माझ्या भेटीला आली, आणि नानासाहेबांना माझी पाठ सोडायला सांगा, म्हणून काकुळतीला येऊन तिनं मला सांगितलंन्. बाईसाहेब ! तुमच्याबद्दल तिच्या मनांत कांहीं वाईट नाहीं. ती कांहीं चांगली बायको नव्हे, पण तिलासुद्धां तुमची कींव येते !



( राधाबाई दुःखांत निमग्न अशा कमलेकडे पाहून, क्रूरपणानें हंसून जाते. ) [ अं. ४ था प्र. ३ रा पृ. ८३ ]

**कम०**—( स्वगत ) अरे देवा ! तिनं–तारेनं–एका कसबिणीनं माझी कींव करावी ? आणि कां, तर मला माझ्या पतीचं प्रेम राखतां येत नाहीं म्हणून !–( उघड ) राधाबाई ! तुमचं माझ्यावर प्रेम असेल असं मला वाटत होतं—

**राधा०**—हो आहेच.

**कम०**—तुम्हीं मला अतिशय दुःखी केलंत, आपल्या मुळीं भेटी झाल्या नसत्या तर फार चांगलं झालं असतं. तुमची गांठ पडण्यापूर्वीं मी किती सुखी होतें !–तरी मला तुम्ही आवडत होतां.–माझं बरं करण्याच्या इच्छेनं हें केलं असं तुम्हांला वाटत असेल, पण मला तसं वाटत नाहीं.–आतां तर काय ! जिकडेतिकडे अंधःकारमय आणि भयाण दिसतं आहे !–मला दुःख द्यावं म्हणून एवढी खटपट कां केलीत ? मला त्यांच्या प्रेमाविषयीं संशय वाटावा म्हणून एवढा प्रयत्न कां केलांत ? आणि त्या प्रेमाला मी मुकलें, हें आज आत्तां धांवत येऊन सांगायचं तरी काय कारण ?–तुम्ही नसतां तर हें दुःख मला कधींच झालं नसतं ! भगवंतावर जशी माझी भक्ति आणि विश्वास आहे, तशी भक्ति माझ्या प्रियपतीविषयीं अंतःकरणांत बाळगून, तसा विश्वास त्यांच्या खरेपणाबद्दल धरून मी सुखांत–आनंदांत मेलें असतें !–राधाबाई ! –कृपा करा आणि मला एकटीलाच असूं द्या. हीच तुमची शेवटची भेट !

( पायाजवळ पडलेल्या पत्राकडे पाहात दुःखांत चूर होऊन बसते. )

**राधा०**—या घटकेला तुम्हांला माझा राग आला असेल, पण एकदमच बरं वाईट सांगण्यांत स्नेहधर्म आहे असं मला वाटलं !–स्वप्नांत रहाण्यापासून कांहीं फायदा नाहीं.–बाईसाहेब ! तुमच्याबद्दल माझा जीव तिळतिळ तुटतो आहे. [ थोडा वेळ कमलेकडे पाहून दरवाजापर्यंत जाते व क्रूरपणानं हंसून एकदम निघून जाते. ]

**कम०**—( दीर्घ श्वास टाकून ) ठरलं ! असंच करायचं.–असं केल्यावांचून त्यांच्या मार्गांतला आपला कांटा निघणार नाहीं ! त्यांच्या सुखाच्या आड मीच येतें आहे.–यांनीं त्या तारेला कांहीं वचनं दिलीं आहेत आणि तीं पूर्ण करायला हे तयार आहेत. यांनीं मला मृत्युमुखांत पाहूं नको म्हणून मागणं मागितलं आहे; आणि शेवटीं माझ्या शब्दाची थोडी तरी किंमत असूं दे,

म्हणून आर्जवं केलीं आहेत!–मी इथं आहे म्हणून तीं यांच्या म्हणण्याला तयार नसेल! मी गेल्यावर सगळं कांहीं तिकडच्या म्हणण्याप्रमाणं होईल. पतीला ज्यापासून सुख तेंच पत्नीनं करावं–हाच खरा धर्म आहे!–या जिवाचा अंत करून त्यांच्या मार्गांतून कायमचं नाहींसं व्हावं का?–छेः! ही आत्म-हत्या! हें भयंकर पाप न करतां बद्रिकाश्रमीं बाबांच्या आश्रमांत जावं, त्यांना सर्व हकीगत सांगावी आणि ते जसं सांगतील तसंच करावं.–काय करायचं तें आत्तांच केलं पाहिजे.–हे उद्यां सकाळीं घरीं येतील–त्यांना माझ्याच्यानं पहाव-वणारसुद्धां नाहीं.–आठाला पांच मिनिटं आहेत. नऊ वाजतां मेल आहे. आत्तांच निघायचं.–पण मी कां गेलें याबद्दल त्यांना पत्र लिहून ठेवलंच पाहिजे. ( टेबलाजवळ जाऊन पत्र लिहिते ) "प्राणनाथ" ( हुंदका येतो. नंतर धैर्य धरून पुन्हा सुरवात करते ) "मी बद्रिकाश्रमीं बाबांकडे जातें. मी कां जातें हें सोबतच्या पत्रावरून आपल्या ध्यानांत येईल.–आणि आपल्याला माझी गरज लागेल तेव्हां मी आपलीच आहे. आपली कमला." आटोपलं!( तारेचें पत्र घेऊन ) हें यांत घालायला हवं. ( पत्र बंद करते. गंगू येते ) कोण, गंगू? बरी आलीस. मला आज घरीं जेवायचं नाहीं, बाहेर जायचं आहे.

**गंगू**—मग कपडे नकोत का बदलायला?

**कम०**—कांहीं नको. आहेत हे बरे आहेत. तूं जा खालीं सांग.

**गंगू**—बाईसाहेब! आपण अगदीं थकून गेल्यासारख्या दिसतां, आणि आपलं तोंडदेखोल उतरलं आहे.

**कम०**—आज माझं कपाळ दुखतं आहे. होईल मेलं बरं!

**गंगू**—पण आपण रात्रीं तिकडंच रहाणार?

**कम०**—हो. मी परत यायची नाहीं.

**गंगू**—मला साळूनं बोलवलं आहे. जा म्हटलंत तर जाईन. दहाला परत येईन

**कम०**—जा, मला आतां त्रास देऊं नकोस- ( गंगू जाते. )–आतां हें पत्र यांच्या या रोज वाचायच्या गीतेंत घालून ठेवावं.–पण स्वारीचं आल्याबरोबर तिकडे लक्ष कसं बरं जाईल?–हीं माळ यांत घालून ठेवावी.–आतां आणखी कांहीं राहिलं नाहीं.–जाण्यापुरते पैसे घ्यावेत.–झालं.–( शालजोडी पांघरल्या-

वर )-हें काय ? ही त्यांची तसबीर ! ही तर मला बरोबर हवीच !-त्यांचं माझ्यावर अत्यंत प्रेम होतं आणि माझ्या योग्यतेपेक्षां मी जास्त सुखी होतें. फाजील सुखाचा शेवट दुःखांतच व्हावयाचा !-मी त्यांना आतां दुसरीच्या स्वाधीन करतें आहे. त्या दुसरीवर त्यांचं प्रेम अतोनात आहे. इथं आवडी-नावडीचा प्रश्न नाहीं ! त्यांच्या सुखाचाच प्रथम विचार केला पाहिजे. हा जीव त्यांवरून ओवाळून टाकीन !-हे गृहदेवते ! मी आतां इथून जातें आहे पण मी तुला कधींही विसणार नाहीं. त्यांना सुखी ठेव आणि निरंतर त्यांच्यावर कृपादृष्टि असूं दे. [जाते. पडदा पडतो.]

---

**अंक ४ था समाप्त.**

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ--रस्ता.**

**नीळ०**—नानासाहेब घरीं नाहींत; कुठं गेले? ते केव्हां भेटतील आणि केव्हां त्या आनंदरावाला या चाबकाखालीं बडवीन, असं मला झालं आहे. कमलेच्या अंगावर हात टाकायला याला शरम कशी वाटली नाहीं? इकडे कमलाही बद्रिकाश्रमीं निघून गेली. खरंच, कमलेच्या कोमल मनावर या प्रकारामुळं भयंकर परिणाम झाला असला पाहिजे.

[ एक वर्तमानपत्र विकणारा मुलगा ' कालकूट दोन दिडक्या ' करीत येतो. ]

**मुल०**—कालकूट! कालकूट! ताजी खबर! ताजी खबर! नानासाहेब आणि ताराजी! दोन दिडक्या! दोन दिडक्या !

**नीळ०**—नानासाहेब आणि ताराजी! हें काय आहे बुवा? ए पोरा, एक अंक दे रे! ( मुलाला दोन दिडक्या देऊन अंक घेऊन वाचतो. ) काय! या कालकूटानं–हलकटानं कमलेच्या निर्मळपणाला डाग लावूं पहावा काय! आणि नानासाहेबांची नाचक्की करून त्यांची लोकमान्यता कमी करायला हें कालकूट पहात आहे काय!–हलकट–पशु कुठला! हा एडिटर कोण आहे मला पाहूं या! ( वर्तमानपत्राच्या शेवटीं वाचतो ) " सखाराम धोंडदेव गोडसे यांनीं मालकाकारितां हें पत्र आपल्या मातंग छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें. " ठीक आहे. हीच कामगिरी अगोदर बजावली पाहिजे. पहिल्यानं कालकूटाकडे मोर्चा फिरवूं या. [ जातो. ]

( पडदा वर जातो. कालकूटपत्राचें ऑफिस. सखारामपंत एडिटर खुर्चीवर बसून टेबलावर पडलेले कागद वाचीत आहेत. )

**सखा०**—अलीकडं कांहीं चळवळ नव्हती तेव्हां पत्रांत काय लिहावं ही पंचाईत पडे ! चळवळ नसली कीं आम्ही एडिटर उपाशींच मरायचे ! तेव्हां या खुर्चीवर बसून आम्हांलाच कांहीं चळवळी उपस्थित कराव्या लागतात. आजच्या अंकाचा खप विलक्षण चालला आहे. [ चाकर येतो. ]

**चाक०**—नीळकंठराव आल्याती.

**सखा०**—( घाईनं ) कोण, नीळकंठराव ? जा. जा. त्यांना वर घेऊन ये.

[ चाकर जातो. नीळकंठराव येतात. ]

या. आपला माझा प्रत्यक्ष परिचय नाहीं. आपण माझ्याकडं आलां हा माझ्यावर मोठा अनुग्रहच झाला. त्यांतल्या त्यांत आपण माझे व्यवसायबंधु असल्यामुळं, बंधुप्रेमानं—

**नीळ०**—आपलं बंधुप्रेम कसं काय आहे, तें मागाहून पाहतां येईल. प्रथमतः मी ज्या कामाकरितां आलों आहे तें काम आटोपलं पाहिजे. ( कालकूटाचा अंक दाखवून ) हा मजकूर आपणच लिहिलांत का ?

**सखा०**—नाहीं, मीं लिहिला नाहीं. पण तो खरा असल्याबद्दल माझी खात्री आहे. मोठ्या—फार मोठ्या गृहस्थाकडून तो मिळाला आहे.

**नीळ०**—( ओंठ चावून ) अस्सं ? ( चाबूक सरसावून ) तर मग मी प्रथमतः तुम्हांला निक्षून सांगतों, यामधील एकही गोष्ट खरी नाहीं. इतकंच नव्हे तर एका थोर गृहस्थाची व त्याच्या कुटुंबाची अब्रू मलीन करण्याच्या हेतूनं जाणूनबुजून हें केलेलं आहे. आणि याबद्दल तुम्ही एकटे जबाबदार आहां ! तुम्हांला जड जाईल !

**सखा०**—रावसाहेब ! आपला हा राग अगदीं गैरवाजवी आहे. माझ्या बाबतींत अशी चमत्कारिक आणि कडक भाषा वापरायचं कांहीं कारण नव्हतं. बाकी, आपल्याला बोलण्याचा अधिकार आहे. आपण एक मोठे स्वयंस्फूर्तीचे लेखक आहांत—आणि अशा लेखकांच्या अंगीं थोडा विक्षिप्तपणा असतोच. —पण जाऊं द्या तें ! तुमचा आणि नानासाहेबांचा स्नेह असेल तेव्हां तुम्हांला राग येणं स्वाभाविक आहे. पण आम्ही वर्तमानपत्रकर्ते अशा खासगी गोष्टींकडे लक्ष देऊन आमचा गुणकारी, मनुष्याला ताळ्यावर आणून पावन करणारा

कोरडा जर आवरून धरला तर आमचं कर्तव्य आम्हीं बजावलं असं होणार नाहीं. आमचं कर्तव्य–आमचं उच्चतम कर्तव्य–आमची सार्वजनिक जबाबदारी यांपासून आम्हीं कधींही पराङ्मुख होतां कामा नये.

**नीळ०**—मी पुन्हा बजावतों कीं ही सर्व गोष्ट खोटी आहे आणि तुम्हीं त्याबद्दल माफी मागितली पाहिजे.

**सखा०**––माफी ? अहो रावसाहेब ! आपण स्वप्नांत आहां. माफी ! मी माफी मागणार ! एकदां लिहिलेलं मी कधींही मागं घेणार नाहीं.–तें खरं असल्याविषयीं माझी पूर्ण खात्री आहे. सत्याकरितां मरायलाही मी तयार आहे. सत्य तें सत्य ! ‘ सत्यमेव जयते ’ सत्याचा सर्वदा जयच व्हायचा ! नानासाहेबांना बेलाशक सांगा कीं या मोठमोठ्या लोकांमध्यें अनीतीचा जो एवढा प्रसार झाला आहे तो लोकांच्या नजरेस आणावा, या उच्च हेतूनं प्रेरित होऊनच मी लेख लिहीत असतों. या लेखाबद्दल तर मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. माफी ! नानासाहेबांना त्यांच्या या दुर्व्यसनाबद्दल शरम वाटली तर हा मीं एक सार्वजनिक फायदाच केला असं समजेन !–आणि त्यांच्या मनांत जर माझ्यावर फिर्यादच करायची असली–


**नीळ०**—अरे कुत्र्या ! ( पुढें सरसावतो. सखारामपंत खुर्चीमागें जातो. ) तूं फिर्यादीचीच इच्छा करतो आहेस नाहीं ? खटला झाला कीं तुझं नांव प्रसिद्ध झालं ! तुला शिक्षा झाली कीं तुझ्या पत्राचा खप वाढला ! मग तुझा आनंद गगनांत मावेनासा होईल ! पण तुझ्या नशिबीं तें नाहीं. तुमच्या धंद्याच्या ह्या सगळ्या नीच खुब्या मला समजतात बरं ! तुझ्यासारख्या हलकट आणि भागूबाई पत्रकाराशीं निराळ्याच तऱ्हेनं वागलं पाहिजे.

[ सखारामपंताच्या अंगावर सारखे कोरडे उडवतो. ]

**सखा०**—अरे बापरे–अरे देवा–अरे धांवा कुणी–अरे हा मारतोय्–हा माझा जीव घेतोय्–अहो धांवा हो धांवा !

**नीळ०**—( त्याच्यावर पाय देऊन ) आतां कसं वाटतं ?

[ ताराजी येते. ]



तारा०—मी दुर्गंधींत सडत पडलेली गाय का ? [ अं. ५ वा प्र. १ ला पृ. ८९ ]

तारा०—( हंसून ) काय एडिटरसाहेब ! सगळीं हाडं विस्कळून गेलीं ? कुणी गोळा करायला नाहीं का ?—असंच बक्षिस पाहिजे मेल्या तुला ! अं–हं–उठूं नका एडिटरसाहेब ! अहाहाहा ! काय तुमचा चेहरा आनंदी दिसतोय् !

सखा०—मला मारलं काय ! बरं आहे ! तुमच्यावर फौजदारी करतों–पोलीसला बोलावतों–पोलीस—

नीळ०—काय, माफी मागतोस कीं नाहीं ?

सखा०—नाहीं–कधीं नाहीं मागणार.

[ नीळकंठराव त्याला मारायला धांवतो. ]

तारा०—( नीळकंठरावास ) जरा थांबा ! तुम्ही कोण तें कांहीं मला ठाऊक नाहीं–पण आपण सरकसवाले दिसतां ! मला त्याच्याजवळ थोडं बोलायचं आहे तें बोलतें मग घ्या तुम्ही त्याला रंगणांत ! काय रे, तूं आपल्या हलकट पत्रांत माझ्यावर कां थुंकी झाडली आहेस ? ती चाटून परत घे. कढीसारखी भुरक म्हणजे भूक लागणार नाहीं ! प्रख्यात गुणवती नटीला नानासाहेबाशीं कांहीं एक करायचं नाहीं, समजलास ? तो आपला शुक्राचार्यांचा अवतार आहे.–असल्या व्यवहारांतला नव्हे तो. अन् मेल्या ! मी दुर्गंधींत सडत पडलेली गाय का ? माझ्यावर कां रे मेल्या गहजब उडवलास ?

सखा०—( नीळकंठरावास ) मी तुमच्यावर फौजदारी करीन. माझ्या घरांत येऊन मला मारलंत काय !

नीळ०—बेलाशक कर. फार तर मला थोडासा दंड होईल,–इतकं-च ना ? त्यांत काय आहे ? असल्या कुत्र्याला मारण्याबद्दल हें एवढं प्रायश्चित्त कांहीं फार नाहीं !

तारा०—आतां आपण चार दिवस पडूनच रहा. आपली हड्डी बरीच नरम झाली आहे ! अगगई !

सखा०—अरे बाप रे ! मीं काय करावं असं तुम्ही म्हणतां ? माझा मुळींच अपराध नाहीं हो ! तो मजकूर आमच्या दुय्यम संपादकानं मला कळ-वल्याशिवाय घातला हो–तो आतां बाहेर गेला आहे.—पण तुम्ही आनंदराव इनामदाराना गांठा ना ? त्यांनींच तो लेख लिहिला !

**नीळ०**—नाहीं, त्याला आतां गांठणारच आहे. पण तुझ्यावरची जबाबदारी कुठं जाते ? प्रायश्चित्त तुलाच भोगलं पाहिजे.

**तारा०**—होय का ? त्या मेल्या आनंदरावानं लिहिला का ? त्या मेल्या आनंदरावाची गांठ पडूं या, पायपोसांनींच सडकतें.–आमची कंपनी आतां बाहेरगांवीं जाणार आहे. तेव्हां माझ्यासंबंधानं लिहिलेलं सगळं परत घे नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे, समजलास ? ( नीळकंठरावांस ) आतां धरा तुमचं जनावर रंगणांत ! मी जातें आतां.

[ ताराजी जाते. तिच्या मागोमाग सखारामपंत पळून जाण्यास पहातो. नीळकंठराव त्यास अडवतो. ]

**नीळ०**—ही असली गडबड माझ्याजवळ चालायची नाही. माझ्या मनाचं समाधान होईल तेव्हांच तुला सोडीन. आनंदराव एक गाढव तर तूं सात गाढव ! त्यानं लिहिलं आणि तूं छापलंस ! आनंदराव किती किंमतीचा मनुष्य आहे तुला ठाऊक असलंच पाहिजे. कारण लोकांच्या चरित्रांतलीं घाण–दुर्गंधीनं आणि काळोखानं भरलेलीं ठिकाणं तुझ्या पूर्ण माहितीचीं ! तुला पळायला मुळींच वाट नाहीं ! माफी मागून येत्या अंकांत शब्दान् शब्द परत घेतोस कीं नाहीं ? ( सखारामपंत रागानें पहातो ) जर तुला कबूल नसेल तर त्याचा परिणाम काय होईल तो पहा. एकदां कोरडे उडवलेत तसेच मी पुनः उडवीन, आणि ही भुमका गांवांत कळली म्हणजे ज्यांची ज्यांची तूं आजपर्यंत निंदा केली आहेस, ते अशाच रितीनं तुला मरे मरेपर्यंत मारतील. फिर्यादीची तूं आशाच करूं नकोस. या शहरांत तर कांहीं आतां तुझी धडगत नाहीं. पण येत्या अंकांत जर तूं आपला गाढवपणा परत घेतलास तर मी तुझ्या वाटेलाही जाणार नाहीं. सांग, कोणचं पत्करतं आहे तें ?

**सखा०**—( भीतीनं ) बरं तर. तुम्हांला जसं हवं असेल तसं मला लिहून द्या, म्हणजे मी तें येत्या अंकांत घालतों. ताराजीची मला कांहीं मोठीशी किंमत नाहीं.—पण मी तुमच्यावर फौजदारी केल्याशिवाय राहणार नाहीं.

**निळ०**—( हंसून ) तूं माझ्यावर फौजदारी करच. माझा पत्ता माहीत आहेच तुला,–बरं ( कागद घेऊन त्याच्यावर थोडेंसें लिहितो. ) वाच.

**सखा०**—( रडत ) " आम्हीं गेल्या खेपेस स्फुटलेखामध्यें एका निराधार आणि खोट्या बातमीवर विश्वास ठेऊन, अविचारीपणानें श्री. नानासाहेब व श्री. सौ० कमलाबाईसाहेब यांच्यासंबंधानें बेअब्रू करणारी टीका केली, हा आमच्याकडून त्या उभयतांचा मोठा अपराध झाला आहे. त्याबद्दल आम्ही त्यांची सपशेल माफी मागतों. "

**नीळ०**—हा मजकूर शब्दशः स्फुटलेखांच्या प्रारंभीं घातलास म्हणजे मी तुझं काळं तोंड पाहणार नाहीं. पण जर घातला नाहींस आणि मला पुनः चिड-वण्यासारखं जर कांहीं केलंस तर मात्र याद ठेव. माझ्यावर खटला करण्यापूर्वीं नीट दहा वेळां विचार कर.—मी आपला खटला स्वतः चालवीन आणि तुझा पुरा धुव्वा उडवून देईन ! माझ्याशीं अतिप्रसंग कुणींही करूं नये.–तुला जर माझ्यावर वारंट काढायचंच असलं तर आज मात्र मी खास सांपडेन. उद्यां कदाचित् मी घरीं नसेन. ( सखारामपंत अंग चोळतो. ) तुला मारल्यामुळं मला फार आनंद होतो आहे. दुसऱ्या खेपेला मला व्यवसायबंधु म्हणतांना माझं बंधुप्रेम कसं असतं याचा नीट विचार कर. येतों आतां. [ नीळकंठराव जातो. ]

**सखा०**—काय विक्षिप्त गृहस्थ आहे हा ! आला तो मारितच सुटला ! बरं झालं ती घरीं नव्हती. [ पडदा. ]

---

# प्रवेश दुसरा

**स्थळ**—बाबासाहेबांचा दिवाणखाना.

( बाबासाहेब व नानासाहेब येतात. )

**बाबा०**—एकूण कमलाबाईसाहेब निघून गेल्या म्हणून मीं ऐकलं तें खरं!

**नाना०**—ती निघून गेली नाहीं, तर तिला माझ्यापासून मांगपणानं–निर्दयपणानं–क्रूरपणानं हाकून–हाकून लावली ! हें पत्र मुद्दाम मिळवून तिला कुणीं दिलं, यावरून असं नाहीं का होत, कीं कुणीं तरी माझ्यासंबंधानं किळीस उत्पन्न करण्यासारख्या खोट्यानाट्या गोष्टीही तिच्या मनांत भरवून दिल्या असल्या पाहिजेत ? माझ्याच्यानं बोलल्यावांचून राहवत नाहीं–

**बाबा०**—बोलाच. अगदीं स्पष्ट सांगा–बिलकुल संकोच नको. आमच्या कुटुंबानं हें सगळं केलं, हेंच तुम्ही सांगणार ना ?–कांहीं आश्चर्य नाहीं! ( नानासाहेब आश्चर्य वाटून विचारांत पडतात असें पाहून ) नानासाहेब ! विचारांत पडूं नका. मी पुन्हा सांगतों, आमच्या कुटुंबाच्या हातून अशी कोणचीही नीचपणाची गोष्ट होण्यासारखी नाहीं कीं, त्याचं मला आश्चर्य वाटेल. म्हणून म्हणतों या कृष्ण कारस्थानाचा उगम कुठून झाला तें तुम्ही मला सांगा म्हणजे माझ्यानं जर तुमची नुकसानी भरून येण्यासारखी असेल, तर ती भरून काढायला मी तयार आहे.

**नाना०**—आपल्या कुटुंबाचा या कृत्याशीं संबंध आहे, असं आत्तांच गंगूनं मला सांगितलं. पण कमलेजवळच्या त्यांच्या ममतेच्या वर्तनावरून, त्या असं करतील असं मला वाटत नाहीं. तेव्हां गंगूला कळलेलं खोटं असावं. तरी पण–

**बाबा०**—तसं कशाला ? आत्तांच या गोष्टीचा निकाल लावून घेऊं. ( दाराशीं जाऊन ) जरा बाहेर ये.

**राधा०**—( आंतून ) कशाला ?

**बाबा०**—तसंच कांहीं काम आहे. [ राधाबाई येते. ]

**राधा०**—कोण त्रास आहे ! [ नानासाहेबांस पाहून स्तब्ध होते. ]

**बाबा०**—हे नानासाहेब इथं आले आहेत आणि त्यांच्याच वतीनं मी तुला एक प्रश्न विचारणार आहे, त्याचं सरळ उत्तर तुझ्याकडून मिळालं पाहिजे. ( पत्र दाखवून ) हें पत्र नाटकांतल्या तारेकडून तूं आणलंस किंवा नाहीं ? आणि त्यांत हीं बनावट अक्षरं घुसडून, तूं स्वतः काल संध्याकाळीं तें कमलाबाईसाहेबांना दिलंस किंवा नाहीं ?

**राधा०**—तुम्ही काय म्हणतां तेंच मला समजत नाहीं.

**नाना०**—बाईसाहेब ! करून सवरून पुन्हा त्या गांवचेच नाहीं—

**राधा०**—नानासाहेब, माफ करा. असलं बोलणं ऐकून ध्यायची मला संवय नाहीं. तुम्ही शुद्धीवर नाहीं वाटतं ?—आणि आमचे हेही आज स्वतःला विसरलेले दिसतात !—मला तारेसंबंधानं कांहीं एक माहिती नाहीं. माझी आणि कसबिणीची ओळख असण्याचा संबंध काय ? तुमची आणि त्या रांडेची जान-

पछान आहे असं सगळं गांव बोलत आहे ! आनंदराव मला ही गोष्ट सांगत होते !

**नाना०**—( संतापानें ) ठीक आहे ! आनंदराव, तुझ्या गप्पा तुझ्या घशांत कोंबीन तरच नांवाचा नानासाहेब !

**राधा०**—( आश्चर्य व कुत्सितपणानें ) अग बाई ! ही गप्पच का एकूण ! काय तरी बाई ! सगळ्या हकीगतीवरून मला तर वाटत होतं कीं, हें सगळं खरं आहे म्हणून ! ( नानासाहेब संतापून लाल होतात. )

**बाबा०**—मेहेरबानी कर. एका प्रश्नाचं उत्तर दे. तारेसंबंधानं तुला कांहीं एक माहिती नाहीं—आत्तांच तूं असं म्हणालीस—तर काल सकाळीं तूं आनंदरावांच्या घरीं तारेला कां भेटलीस ?

**राधा०**—अहो महाराज ! आपण केव्हांपासून ही पोलिशी सुरू केली ?

**नाना०**—बाईसाहेब ! तुम्ही अशी शपथ घेतां का, कीं माझ्या कमलेनं मला सोडून जावं, म्हणून तुम्हीं कांहींएक केलं नाहीं किंवा बोललां नाहीं ?

**राधा०**—अग बाई ! कमलाबाईसाहेब उठून गेल्या कीं काय ? मला वाटतच होतं, त्या जातील म्हणून ! आपले स्नेही नीळकंठराव यांच्याकडे करा ना तपास ! ते इथं असतांना त्या दोघांचा बराच रस पाघळत असे—सगळ्यांना ठाऊक आहे.

**बाबा०**—कांहीं तरी शरम धर ! शरम धर !

**राधा०**—आपल्याला इतकं वाईट वाटायला नको. मला तर हसूंच येतं ! नानासाहेबांचाच हा सगळा प्रताप आहे. हे नेहमीं तारेकडे जातात हें त्यांच्या बायकोला माहीतच होतं. मला आनंदरावांकडून कळलेलं सगळं मीं तिला सांगितलं होतं. तिला कां म्हणून अज्ञानांत ठेवायची ! आणि तिला तरी नानासाहेबांची कुठं पर्वा होती ! ती आपली नीळकंठरावावरच जास्त खुष असे.

**नाना०**—तुम्ही—तुम्हीच का बोलतां हें ?

**राधा०**—होय, मी—मीच बोलतें ! काय तुमचं म्हणणं आहे ? ( बाबासाहेबांस ) आपल्या या स्नेह्यांचं डोकं ठिकाणावर नाहीं—त्यांना जरा बाहेर घेऊन जा. असल्या किळीसवाण्या गोष्टीबद्दल चर्चा करणं मला प्रशस्त वाटत नाहीं—नानासाहेबांना तारेचा नाद लागला हा कांहीं माझा अपराध नव्हे—

**नाना०**—बाईसाहेब ! आपला समज चुकीचा आहे. तारा ही आमच्या गणपतरावांची बायको. ती दोन वर्षांपूर्वी उठून गेली. मी जो तिच्याकडे जाई तो तिनं हें नाटक सोडावं आणि गणपतरावांची अब्रू वांचावी म्हणून ! मीं जीं तिला पत्रं लिहिलीं तीं त्याच्याकरतां. आनंदरावाला या सगळ्या गोष्टी माहीत असल्याच पाहिजेत. कारण तारा आज दीड दोन वर्षं त्याची रखेली आहे.

**राधा०**—छत् ! मला नाहीं हें खरं वाटत !

**नाना०**—तुम्हांला खरं वाटो किंवा खोटं वाटो–मला काय करायचं आहे. बाबासाहेब ! इथं थांबण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं. बाईसाहेब ज्या अर्थीं सगळ्या गोष्टी नाकबूल करीत आहेत—

**बाबा०**—जरा थांबा. बाईसाहेब नाकबूल करीत असतील, पण मी नाकबूल करीत नाहीं ! बाईसाहेब बोलत नाहींत, पण त्यांनीं आपल्या नवऱ्याला–मला–त्यांच्या वतीनं बोलण्याचा अधिकार दिला आहे ! बाईसाहेबांना हें कबूल आहे कीं त्यांनींच तारेकडून दोनशें रुपयांला हें पत्र घेऊन तुमच्या कुटुंबाला नेऊन दिलं !

**राधा०**—काय ! काय !

**बाबा०**—बाईसाहेब ! मेहेरबानी करून मला मध्येंच अडवूं नका. आपल्या उभयतांच्या अंतःकरणाचे प्रवाह एकच असल्यामुळं, आपले अव्यक्त मी स्वच्छ बोलूं शकतों. ( नानासाहेबांकडे वळून ) बाईसाहेब आणखी असंही म्हणत आहेत कीं त्यांचे प्रिय मित्र आनंदराव इनामदार यांनीं दिलेल्या तुमच्या व तारेच्या काल्पनिक संबंधाची बातमी त्यांना खरी वाटली, म्हणून त्यांनीं हा एवढा उपद्याप केला–आणि या बातमीवर विश्वास ठेवूनच तुमच्याविषयीं तुमच्या कुटुंबाच्या मनांत अविश्वास उत्पन्न करून, त्यांनीं त्यांच्या मनाच्या शांततेचा जितका करवेल तितका भंग केला. यांत त्यांचा हेतु शुद्ध–सरळ होता–म्हणजे कुचाळीची आवड आणि व्यक्तिविषयक द्वेषाची तृप्ति करून घेणं ! अर्थात् बायकी ! आहे तें स्पष्ट–खरं खरं बोलणंच चांगलं !–तुम्हीच पहा, बाईसाहेब कांहीं या गोष्टी नाकबूल करीत नाहींत. आतां त्यांनीं मौन स्वीकारलं आहे हें आपण पहातच आहां !

१२१० ब, नारायण पेठ, पुणे २

**राधा०**—( बाबासाहेबांकडे पाहून दांत चावून ) हेर-हेर कुठले !

[ रागानें जाते. ]

**नाना०**—( स्वगत ) हा घरगुती प्रकार मी पहायला नसतों तर बरं झालं असतं. ( उघड ) बाबासाहेब ! हा प्रकार पाहून मला फार वाईट वाटत आहे.

**बाबा०**—मलासुद्धां फार वाईट वाटत आहे-अंतःकरणापासून वाईट वाटत आहे ! नेहमीं कशा ना कशावरून मला दुःख होतंच, पण आज मात्र त्याची परमावधि झाली. कारण तुमच्या निरपराधी साध्वी पत्नीचा निष्कारण छळ झाला हो ! मला आज सकाळपर्यंत या प्रकरणाबद्दल कांहीं एक माहीत नव्हतं, नाहीं तर मीं खात्रीनं हा दुःखदायक प्रसंग तुमच्यावर येऊं दिला नसता. तरी पण देव करो आणि तुमची आणि तुमच्या प्रियपत्नीची लौकरच भेट होऊन आनंदीआनंद होवो !—हें घ्या पत्र. याची किंमत पैशानंच पुरी झाली नाहीं, दुसऱ्या कित्येक गोष्टी भरीला घालाव्या लागल्या. या नीचपणाच्या सवद्याबद्दल बाईसाहेबांना आतां कदाचित् वाईटही वाटत असेल. तेव्हां माझ्या कुटुंबाकडून जो हा अपराध झाला आहे, त्याबद्दल आपण तिला क्षमा करा.

**नाना०**—खरोखरच तुमचं आयुष्य फार दुःखांत जात असेल !

**बाबा०**—जात असेल ! तुमची नुसती कल्पना आहे.—बहुतेक सर्वांनाच कमीआधिक प्रमाणानं हीं संसारदुःखं सोसावीं लागतात. इतरांप्रमाणं मलाही तीं सोसलींच पाहिजेत.—तुम्ही आतां आनंदरावाला गांठणारच असाल ?

**नाना०**—अर्थात् ! त्याला गांठून त्याची कोरड्याखालीं अशी चामडी लोळवितों कीं त्याच्या अंगावर एक केसभरसुद्धां जागा मोकळी राहूं नये !

**बाबा०**—अस्सं-असंच पाहिजे ! ( मूठ वळून ) नानासाहेब ! तुम्हांला सांगायला नकोच, या मुलाकरितां हो, नाहीं तर त्या हरामखोराला केव्हांच गोळी घालून ठार केला असता ! पुष्कळांना मीं असं कां केलं नाहीं, म्हणून आश्चर्य वाटत असेल. पण माझ्या बाळाला-त्या गरीब पोराला-हें सगळं कळून, खरं

कारणही त्याच्या कानावर गेलं असतं. त्याचं माझ्याशिवाय कोण पहाणार आहे ? आईच्या पापांबद्दल त्याला प्रायश्चित्त घ्यायला लावावं तर आपल्याच हातांनीं आपल्याच पायावर दगड पाडून घेतल्यासारखं होईल ! तिला घरांतून हाकलून दिलं–त्या जारिणीचा खून केला–कांहीं केलं तरी सगळ्याचा परिणाम एकच ! अपकीर्ति ही ठेवलेलीच ! आणि अपकीर्तीचा डाग तर कधींही धुतला जात नाहीं.–तुमची गोष्ट अगदीं निराळी आहे.–तुमच्या पत्नीच्या वर्तनाबद्दल शंका येणं शक्यच नाहीं. पण माझ्या–अरेरे !–जगांतल्या बहुतेक दुःखांबद्दल स्त्रियांनाच जबाब द्यावा लागेल.

**नाना०**—( स्वगत ) आतां इथं थांबणं म्हणजे यांना जास्त दुःख देणंच आहे. ( उघड ) बरं, मी येतों आतां.

**बाबा०**—मी स्वतःविषयींच बोलत राहिलों, माफ करा.–मग तुम्ही बद्रिकाश्रमीं आज रात्रींच जाणार असाल ?

**नाना०**—होय. कारण वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. तिला भेटून तिच्या मनाचं दुःख दूर करीन तेव्हांच मला चैन पडेल. आपल्याला विनाकारण त्रास झाला. येतों तर !

**बाबा०**—या. ( नानासाहेबांस दरवाजापर्यंत पोहोंचवून परत येतात ) या गोष्टीचा आज निकाल लावलाच पाहिजे.

( आंत जाऊन राधाबाईला हात धरून आणितात. )

**राधा०**—उगीच कां हा त्रास ? माझा हात सोडा. तुम्हांला कांहींच कसं वाटत नाहीं ?

**बाबा०**—बरोबर आहे ! मला–तुझ्या नवऱ्याला–तुझा हात धरायला लाजच वाटली पाहिजे ! विलक्षणच हें ! पण मला तुला कांहीं सांगायचं आहे. आज नाहीं उद्यां तें सांगायची पाळी येणारच होती, पण आजच आली त्याला उपाय नाहीं.–बैस या इथं. मी थोडक्यांत सांगणार आहे पण तें शांतपणानं तुला ऐकून घेतलं पाहिजे. ( ती बसते )–आतांच तूं मला हेर म्हणालीस ! तुझ्यावर हेरासारखी टेहळणी करायचं माझ्या कधीं मनांतसुद्धां आलं नाहीं.–तुझं माझं लग्न झालं त्या वेळीं माझं जीवित, सुख, नांवलौकीक हीं सारीं–मीं तुझ्या

स्वाधीन केलीं आणि जरी तूं माझ्याशीं बेईमान झालीस–मी पुन्हा सांगतों कीं जरी तूं माझ्याशीं बेइमान झालीस आणि माझ्या आशांची, महत्त्वाकांक्षेची माती माती केलीस तरी डोळे मिटून मीं इमानानं तुझं जगांतल्या दुष्कीर्ती-पासून रक्षणच केलं. नानासाहेबांच्या कुटुंबाविषयीं सर्व बातमी मला तुझ्या कुळंबिणी कडून-साळूकडून समजली.–ज्या निरपराधी साध्वी माउलीला तूं आपली मैत्रीण म्हटलंस, तिचा अशा रीतीनें नाहक छळ करणं, म्हणजे परमावधीचा निर्दयपणा आणि दुष्टपणाच आहे.

**राधा०**—चाकरमाणसांच्या खोट्यानाट्या सांगण्यावर आपण विश्वास ठेवतां.

**बाबा०**—तुझा आनंदरावाच्या गप्पांवर कसा विश्वास बसला ? तो तर चाकराइतकासुद्धां खास प्रामाणिक नाहीं ! आणि त्या गप्पा खऱ्याखुऱ्या गोष्टी म्हणून ज्याला त्याला नाहीं सांगितल्यास ? साळूविषयीं म्हणशील तर तिनं सांगितलेल्या गोष्टींवर माझा मुळींच विश्वास बसला नव्हता. तिनं माझी पुष्कळ तऱ्हेनें खात्री केली. काल बाहेर जातांना तूं किती रुपये घेतलेस आणि किती परत आणलेस हें तिला माहीत होतं !काल आनंदरावांचं तुला पत्र आलं तें तिनं पाह्यलं होतं ! नंतर काल सकाळीं तूं आनंदरावांकडे तारेला भेटलीस हेंही तिला माहीत होतं ! विशेषतः तिनं तुला तें तारेकडून विकत आणलेलं पत्र वाचतांना पाह्यलं होतं आणि मागं एकदा आनंदरावचं व तुझं बागेंत झालेलं एक संभाषणही तिनं ऐकलं होत ! यामुळं तर तिला दोन आणि दोन चार हें तेव्हांच ताडतां आलं. तूं मला हेर म्हणतेस–पण तुझे हेर तुझ्या स्वतःच्या पैशानं पोसले जात आहेत. साळू तुझ्या उलट फिरली यांत कांहीं एक आश्चर्य नाहीं. तिनं ही हकीगत माझ्यावांचून दुसऱ्या कुणालाही सांगितली नाहीं या-बद्दल तिचे उपकार मान !–तरी पण नानासाहेब येऊन, आपल्या दुःखाची हृदय-द्रावक कहाणी ते सांगेपर्यंत मीं कोणच्याही गोष्टीवर विश्वास ठेवला नव्हता. तुला एक वेळ गय करावी असं त्या वेळींसुद्धां एकदां मला वाटलं, आणि म्हणूनच त्यांच्या समक्ष प्रश्न विचारला. तुझ्या चेहऱ्याकडे नजर जातांच तूं अपराधी आहेस हें मीं सहज ताडलं.–तूं नाकबूल केलंस ! तूं खरं सांगितलं

असतंस तर मला समाधान वाटलं असतं. पण आतां ही गोष्ट बोलून काय फायदा ? कृत्य होऊन चुकलं ! त्या बिचाऱ्या मुलीच्या सुखाची माती करण्यापूर्वी आनंदरावांचं सांगणं खरं आहे कीं नाहीं याबद्दल तूं बारकाईनं चौकशी करायला हवी होतीस ! आनंदराव म्हणजे कांहीं सच्चा मनुष्य नव्हे. तुला तो तसा वाटत असेल, पण आतां ? त्याच्या प्रेमांत तारेची वांटेकरीण होणं तुला कसं काय रुचतं ?

**राधा०**—अग आईग— [ दोन्ही हातांनीं चेहरा झांकून रडते. ]

**बाबा०**—दडव ! दडव तें तोंड ! तो तुझा सुंदर चेहरा मला आवडत होता.—तुझ्या नेत्रांचा प्रकाश मला माझ्या आयुष्याच्या सूर्यप्रकाशाप्रमाणं वाटत होता ! दडव तो चेहरा ! दवड ते नेत्र ! राधे ! राधे ! मी काय बोलूं ? अशी कशी तूं निर्लज्ज बनलीस ? तुला वाटलं की हा आंधळा—याचा स्वतःचा बदलौकिक याला दिसत नाहीं ! पण तुला इतकंच सांगतों, माझं हें हृदय दोन्ही हातांनीं जोरानं दाबून त्यांतलं रक्त थेंब थेंब पिळून काढलं असतंस तरी सुद्धां मला इतक्या वेदना सोसाव्या लागल्या नसत्या.—मी गप्प होतों याचं कारण काय ?—कांहीं का असेना ! पण आतां—आतां याचा शेवट केलाच पाहिजे.

**राधा०**—माझ्याशीं लग्न तरी कशाला केलं ?

**बाबा०**—कशाला केलं ? हा प्रश्न फुकट आहे. जगाच्या रितीप्रमाणं केलं.—लग्न झाल्यावर कांहीं दिवस मी स्वर्गांत आहें असं मला वाटे—तुला काय वाटत होतं कुणाला ठाऊक ! आणि जेव्हां आपल्याला मुलगा झाला तेव्हां तर तुझ्याविषयीं माझी भक्ति-माझी प्रीति इतकी वाढली—मला तूं इतकी पवित्र वाटूं लागलीस कीं देवाप्रमाणं तुझ्यापुढं नम्र होऊन तुझा आशीर्वादच घ्यावा.—नंतर सगळंच बदललं ! तुझ्यांत इतका फरक कसा पडला, मला कल्पनाच होत नाहीं ! माझं मात्र तुझ्यावरचं प्रेम रतीभरही कमी झालं नव्हतं !—ज्यानं तुझं मन भ्रष्ट करून माझ्या सुखाचा नाश केला, त्याचा सत्यनाश होवो ! माझा इतका तळतळाट झाला आहे कीं माझा हा शाप कधींही खरा झाल्यावांचून रहाणार नाहीं.— त्या हरामखोराइतका दुष्ट, चांडाळ,



बाबा०—दडव ! दडव तो चेहरा !  [ अं. १ ला प्र. २ रा पृ. १८ ]

गळेकापू कोण आहे ? कमलेचं मन भ्रष्ट करायला तो पहात होता, पण तिच्या पुढं त्याचं चाललं नाहीं.—पण तुझ्यावर त्याची एवढी जादू कशी चालली ?

**राधा०**—पुरे करा तुमचं बोलणं. मला तें ऐकवत नाहीं. मला ठार कर हवी तर.

**बाबा०**—मी तुला ठार करणार नाहीं—घराबाहेर हाकलून देईन !

**राधा०**—काय ! मला घराबाहेर हाकलून देणार ?

**बाबा०**—होय. माझा स्वभाव जरा विचित्र आहे—पण आहे हा असा आहे.—मीं तुला हाकूनही दिली असती, पण माझ्या मुलाच्या आईच्या पापाचीं कृत्यं चव्हाट्यावर येऊन त्याच्या जन्माची राखरांगोळी करणं, मला पसंत नाहीं.—नाहीं, मी दुसरीच शिक्षा तुला करणार आहे.—मीच बाळाला बरोबर घेऊन तुझ्यापासून दूर कुठं तरी जातों. म्हणजे तुला वाटेल तसं स्वतंत्रपणानं वागायला बिलकूल हरकत होणार नाहीं. बाळाच्या शिक्षणाची सबब माझ्या जाण्याला पुरेशी आहे. त्याच्याविषयींची माझी कळकळ जगजाहीर आहे. माझ्या शिक्षेंत राहिल्यानं त्याच्या मनांत तुझ्याविषयीं कांहींही वाईट शिरणार नाहीं. त्यानं तुला मान देऊन तुझ्या आज्ञेंत वागावं, हेंच मी त्याला नेहमीं शिकवीत असतों. तो अगदीं लहान होता, तेव्हां तूं त्याच्यावर ममता करींत नाहींस, म्हणून त्याला चमत्कारिक वाटे. कित्येकदां तर त्याचं हें भाषण ऐकणं मला कठीण जाई. पण 'बाळ, तुझ्यावर तिचं प्रेम आहे पण कामामुळं तुझ्याशीं खेळ खेळायला तिला फुरसत नाहीं,' असं सांगून मी त्याची समजून घालीत असें. त्याची थोडीच समजूत होत असे म्हणा ! पण मी आपल्याकडून होईल तितकं करीत असें. ( राधाबाई जास्त रडूं लागते ) त्याच्या कोंवळ्या अंतःकरणांत तुझ्याविषयीं फार आदर आहे. कदाचित् प्रेमापेक्षां तुझी भीतिच त्याला अधिक असेल, पण भीति ही तिरस्कारापेक्षां किंवा पूज्य बुद्धि नसण्यापेक्षां पुष्कळ बरी. मीं तुला मुलाच्या आणि माझ्या जबाबदारींतून मुक्त केलं म्हणजे—हें काय ? आतां या रडण्याची कांहीं जरूरी नाहीं.

**राधा०**—( बाबासाहेबांचे पाय धरून ओक्साबोक्शी रडत ) महाराज ! माझा प्राण घ्या, पण मला टाकून जाऊं नका. तुम्हीच माझं दैवत ! माझ्या तोंडावर थुंका–मला मारा–पण एखाद्या अमंगळ वस्तूप्रमाणं मी शिवायलाही योग्य नाहीं असं समजून, माझा त्याग करूं नका. मला एवढी भीक घालाच. प्राणनाथ ! तुम्ही जर मला टाकून गेलांत तर मी आतां हे प्राण ठेवणार नाहीं.

**बाबा०**—( द्रव येऊन ) ही मनाची चंचलता आहे ! पुरे ! पुरे ! झालं तें झालं ! यापुढं मी तुला एक शब्दसुद्धां बोलणार नाहीं. मीं तुला दुःख देणं शक्यच नाहीं. कारण तूं मला प्राणाहूनही प्रिय होतीस. पण आतां काय ? तुला सोडून दूर कुठं तरी जाण्याशिवाय माझ्या हातीं आतां काय आहे.

**राधा०**—( दीनवाण्या मुद्रेनें ) मला एक वेळ तरी सुधारण्याची संधि द्या –एकदां तरी ! आपली खरी किंमत मला कळली असती–आपल्या उदार अंतःकरणाची थोडी तरी कल्पना असती–आपण कसे आहां हें जर मीं समजून घेतलं असतं तर–तुमच्याशीं प्रतारणा करूं लागल्यापासून सुख कसं तें माझ्या मनाला माहीत नाहीं ! आपलं प्रेम पुन्हा संपादन करण्याच्या आशेला जरा तरी जागा ठेवा. माझ्यावर पाहिजे तर यापुढं प्रेम करूं नका, पण दया करून मला टाकून जाऊं नका.–महाराज ! मी आपल्या सर्वस्वाला मुकलें ना ?

**बाबा०**—राधे! तूं निव्वळ या प्रसंगीं तुला तात्पुरता पश्चात्ताप झाला आहे म्हणून बोलत आहेस हें. पण ही उपरति कायमची थोडीच आहे ? तुझं सामर्थ्य या वेळीं तुला समजत नाहीं. परमेश्वर साक्ष, मी तुझ्याकडं कड कपणानं पहात असेन तर ! तुझी इच्छा आहे तर मी एवढ्यांत जात नाहीं. मला धीर आहे.–आतां आपली ताटातूट होणं न होणं, तुझ्या शब्दावर, मुद्रेवर, कृतीवर आहे, समजलीस ? माझं मन कसं आहे हें तुला कळून चुकलं आहे. तूर्त माझं दैव मी समाधानानं तुझ्या हवालीं करितों.–पण प्रेमाबद्दल म्हणशील तर माझं प्रेम इतकं निर्जीव झालं आहे कीं पुन्हा ते जिवंत होऊं शकणार नाहीं ! असा पश्चात्ताप नेहमीं वरातीमागून घोड्याप्रमाणंच आहे.



राधा०—मला एक मुका देतोस बाळ ?

बाळ०—कां नाहीं ? हा घे ! [ अं. ५ वा प्र. २ रा पृ. १०१ ]

**राधा०**—( चेहरा वर करून ) एक वेळ माझा स्वीकार—( चुंबन घ्यायला पहाते )

**बाबा०**—नाहीं ! नाहीं ! हें शक्य नाहीं ! [ एकदम जातो. ]

**राधा०**—( त्यांच्या मागें दारापर्यंत जाऊन ) देवा, त्यांच्यावर प्रेम करण्याची मला आजपर्यंत कशी बुद्धि झाली नाहीं ? आणि आतां जेव्हां ते मला तुच्छ मानीत आहेत–माझा तिटकारा करीत आहेत तेव्हां हें मन त्यांच्या पायाकडे धांव घेत आहे ! वस्तु नष्ट झाली, म्हणजेच तिचं खरं महत्त्व कळतं ! –हे आतां परत येतील का ?–यांचं मन फार कोंवळं आहे ! आजपर्यंत मी आंधळी होतें.–ही चाहूल कुणाची–नाहीं–पण—

[ दुसरी कडून बाळ येतो. ]

**बाळ**—आई ! मी फिरायला जाऊं का ?

**राधा०**—( त्याला जवळ घेऊन त्याच्या मुखाकडे पाहून ) किती नरी माझा बाळ गोजिरवाणा आहे ! चेहऱ्यावर टवटवी कोण आहे ! आणि बाई याचे डोळे तरी किती पाणिदार आहेत !– बाळ ! तूं फिरायला बागेंत जातो आहेस ?

**बाळ**—होय आई ! पण मी तुला जवळ नको असलों तर !

**राधा०**—तूं मला नेहमींच नको असतोस, नाहीं ? मला माझ्या बाळाची केव्हांच गरज नसते.

**बाळ**—( स्वगत ) आज हिला असं काय बरं होतंय् ? ( उघड ) तूं सांगत असतील तर नाहीं जात.

**राधा०**—नको बाळ–आतां जा, जा. पळ, पळ. खेळ जा. परत आलास कीं मात्र लागलाच ये हं.–मी आज कुठंही जात नाहीं; इथंच आहे.–पण थांब, मला एक मुका देतोस बाळ ?

**बाळ**—कां नाहीं देणार ? हा घे.

**राधा०**—( त्याचा मुका घेऊन ) जा बाळ आतां. तिकडं सांग, मीं तुझा मुका घेतला म्हणून ! सांगशील ना ? विसरूं नकोस हं ? ( बाळ जातो. ) अहाहा ! या सुखाचा आस्वाद मीं आतांपर्यंत कां घेतला नाहीं ?–परत येणं झालंच. [ बाबासाहेब येतात. ]

**बाबा०**—आनंदराव इनामदार आगगाडीखालीं चुरडून मेल्याची भयंकर बातमी आत्तांच मला कळली. ते चालत्या-गाडींत बायकांच्या डब्यांत उडी मारून शिरत होते तों पाय चुकून ते रुळावर पडले. फार भयंकर मरण ! सर्व गोष्टी परमेश्वराच्या इच्छेप्रमाणंच होत असतात.-मनुष्य मेल्यावर त्याच्या बद्दलचं शत्रुत्वही लयाला जातं.

**राधा०**—( स्वगत ) मला काय बरं वाटत आहे ?

**बाबा०**—तूं स्तब्ध आहेस. ह्या बातमीनं तुझ्या मनाला धक्का बसला असेल. मीं ती एकदम कळवली नसती तर बरं झालं असतं.

**राधा०**—महाराज ! मला मुळींच दुःख झालं नाहीं. पापाचं प्रायश्चित्त मिळाल्यावांचून रहात नाहीं. महाराज ! खरं खरं सांगतें कीं माझं मन मात्र भ्रष्ट झालं होतं, पण अद्याप या शरिराला परपुरुषाचा स्पर्शही झाला नाहीं. मला आतां पूर्ण पश्चात्ताप होऊन मी आपल्या पायांच्या धुळींत पडलें आहे. आपण जर माझा स्वीकार केला नाहीं, तर मीं आतां खालीं खालीं नरकांत जाणार !

**बाबा०**—( गहिंवर येऊन तिला सावरून ) तूं नरकांत गेली असतीस पण परमेश्वराच्या मनांत तुला नरकांत पाठवायचं नव्हतं. माझ्या हातून जर कांहीं पुण्य घडलं असेल तर तें सारं तुला देऊन तुझा स्वीकार करायला मी तयार आहें.

**राधा०**—महाराज ! त्या महान् साध्वीशीं-कमलेशीं मीं जें वर्तन केलं तें भाल्याप्रमाणं माझ्या हृदयाला टोंचून, माझा जीव कासावीस होत आहे. तिच्या स्वागताकरितां मीं पापिणीनं झोळी, करवंटी तयार करून ठेवली होती. ती बरोबर घेऊन तिचा शोध करून त्या देवतेपुढं क्षमेची झोळी पसरून तिला परत आणीन आणि तिच्या प्रेमाला मी पात्र आहें, हें तिच्या सेवेंत राहून दाखवीन.

**बाबा०**—कमलेला शोधायला तूं जायला नकोस. नानासाहेब तिला घेऊन यायला आत्तांच मेलनं बद्रिकाश्रमास जाण्याकरितां निघाले. तिची सेवा करण्याचा तुझा संकल्प अगदीं योग्य आहे. चला आपणहीं तिकडे जाण्याकरतां सकाळच्या एक्स्प्रेसनं निघूं. [जातात. ]

---

मुंबई मराठी ग्रंथालय
... नारायण पेठ, पुणे

# प्रवेश ३ रा.

**स्थळ**—बद्रिकाश्रम. ( कमला व तिचा बाप नाथजी बोलत बसले आहेत. )

**नाथ०**—कमले ! बाळे ! तूं कांहींही म्हण, पण नानासाहेबांच्या हातून असं वर्तन होणं अगदीं अशक्य आहे. तूं जर या कामांत जास्त विचारानं वागली असतीस, तर हा बद्रिकाश्रमपर्यंतचा बर्फमय व श्वापदांच्या संचारामुळं भयप्रद झालेला मार्ग, एवढी दगदग सोसून, दिवसच्या दिवस अन्नपाण्यावांचून कंठून, सच्छील आणि कोमल मनाला हालअपेष्टा भोगायला लावून कंठण्याची पाळी तुझ्यावर मुळींच येती ना ! दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांच्या हालअपेष्टांत आनंद मानणारीं कित्येक माणसं या भूतलावर आहेत; अशाच पैकीं कांहीं राहुकेतूंनीं नानासाहेबांना ग्रासून टाकलं आहे हें खरं, पण हें ग्रहण कायमचं टिकणारं नसून, सूर्यग्रहणाप्रमाणं तें क्षणार्धांत नाहींसं होईल आणि त्या सहस्ररश्मीप्रमाणंच, हें ग्रहण सुटल्यानंतर नानासाहेब द्विगुणित तेजानं दैदिप्यमान दिसूं लागतील.

**कम०**—असं झालं तर त्यांत मला आनंदच आहे ! बाबा, तुम्हांला काय सांगूं ? ज्या वेळीं आमचं लग्न झालं, त्या वेळीं दुष्यंतशकुंतलेच्या प्रेमचरित्राची ही पुनरावृत्ति आहे असंच मला वाटलं. मी त्यांच्या प्रेमावांचून कशाचीही इच्छा केली नाहीं ! त्यांचं प्रेम हेंच माझं जीवित. प्रेमावांचून मी जिवंत राहणं शक्य नाहीं.

**नाथ०**—पण त्यांलाही तुझ्या प्रेमाशिवाय जगतां येणं अशक्य आहे. बाळे! तुझ्या प्रेमाच्या आकर्षणामुळं तुझा दुष्यंत तुझ्या शोधाकरितां येऊन, तुला घेऊन गेल्यावांचून रहाणार नाहीं. तुझ्या पतीवर माझा पूर्ण विश्वास आहे ! या भास्कराप्रमाणं तो सत्यस्वरूप आहे ! अमंगळपणाचा त्याला डागही नाहीं. तो इथं आल्यावांचून रहाणार नाहीं. हें पक्कं लक्षांत ठेव. ( शिष्य पत्र आणून देतो. ) माझं वचन कधींही असत्य होणार नाहीं. हें पहा त्यांचंच पत्र !

[ नाथजी पत्र वाचतात. ]

**कम०**—मना ! स्वारीचं कुशलवृत्त ऐकाला तूं किती उत्कंठित झालं आहेस ! हृदया ! धीर धर ! असं धडधड उडूं नकोस. माझा वेडेपणा—

**नाथ०**—पहा तूंच पहा ! किती विनय, किती प्रेम, किती दृढनिश्चय, किती मृदु अंतःकरण या पत्रिकेंत भरलं आहे. खरा महात्मा-खरा संत या पत्रिकेंत मला दिसत आहे. दुष्टांकडून साधूंना नेहमीं असाच छळ सोसावा लागतो. पहा, हें पत्र पहा आणि सर्व गोष्टींचा उलगडा करून घे.

**कम०**—द्या-द्या-तें पत्र ! मी त्याचं मुखानं चुंबन घेईन, अश्रूंनीं त्याला स्नान घालीन, आणि नेत्रांवाटे त्याला या अंतःकरणांत दडवून टाकीन ? द्या-द्या-मला तें. माझ्या अंतःकरणाला आधार देऊन, माझ्या व माझ्या पतीच्या आड येणारे कभिन्न ढग छिन्नविछिन्न करून माझ्या पतीचं-माझ्या आत्म्याचं-माझ्या परमेश्वराचं मुखकमल उज्ज्वलित करण्याचं त्याच्या अंगीं सामर्थ्य असेल तर द्या तें मला. तें अमृत प्राशन करून माझं मन मी शुद्ध करीन.

**नाथ०**—घे-हें पत्र घे आणि कर त्याचं मनन. माझी माध्यान्हस्नानाची वेळ झाली. मी आतांच स्नान करून येतों. [ जातात. ]

**कम०**—काय मीं हें केलं ! एकूण मीच दोषी ! अरे देवा ! मला जर मृत्युच यायचा असेल तर त्यांची क्षमा मागण्यापुरतं तरी आयुष्य मला दे.

[ बेशुद्ध पडते. इतक्यांत नानासाहेब येतात. ]

**नाना०**—( सावध करून ) लाडके ! लाडके ! काय, ही बेशुद्ध पडली ? इथं कुणी नाहीं काय ? नाथजी कुठं गेले ? कमले ! माझ्याशीं एक शब्द-तरी बोल ! डोळे उघडून बघ ! हा तुझा दास तुझी क्षमा मागण्याकरितां आला आहे. लाडके ! ऊठ.

**कम०**—( सावध होऊन ) कोण ते ? मी झोंपेंत आहे का ? नाहीं-मी जागी आहे. ( त्याच्या गळ्याला मिठी मारून ) महाराज मीं, आपल्याबद्दल भलताच संशय घेतला-मला क्षमा करा. कुणीं वाटेल तें सांगितलं असतं तरी मी संशय घ्यायला नको होता.

**नाना०**—कमले ! तुला माझं पत्र मिळालं का ? तुला एकदां सर्व गोष्टी सविस्तर सांगून, तुझं मन मला साफ केलं पाहिजे.

3208

**कम०**—मला आतां कांहींएक सांगायला नको. आपल्याला जर माझी गरज नसती, तर आपण इकडे येण्याचा हा त्रास करून कशाला घेतला असता ?

**नाना०**—लाडके ! माझं भूषण तुं, माझा कलिजा तूं, माझा या जगांतला आनंद तूं ! आतां पुन्हा माझ्याबद्दल संशय घेणार नाहींस ना ?

**कम०**—आतां कसा संशय घेईन महाराज ? बाबांनीं मला सांगितलं–पण ते पहा बाबा इकडेसच येत आहेत ! ( दोघें दूर होतात ) [ नाथजी येतात. ]

**नाथ०**—नका ! एकमेकांपासून दूर होऊं नका. तुमचा हा संयोग पुन्हा केव्हांही विस्कळीत न होवो. असेंच दोघेंही मिळून रहा. भगवत् कृपेंकरून आपला पुढचा काळ सुखांत आणि ऐश्वर्यांत जावो.–या भूमीकडे हे कोण येताहेत. [ बाबासाहेब, राधाबाई व बाळ येतात. ]

**नाना०**—काय, बाबासाहेब ? आपण कोणीकडे ? आणि हें कोण ? राधाबाईसाहेब !

**कम०**—( भीतीनें ) अग बाई ! मी आतां जाऊं तरी कुठं ? नारायणा ! तुझ्या मनांत अजून मला क्लेश द्यायचे आहेत का ?

**बाबा०**—कमलाबाईसाहेब ! ही माझी पत्नी आतां पश्चात्तापानं पूर्ण शुद्ध झाली आहे. तुमची क्षमा मागून तिला कांहीं विनंति करायची आहे.

[ राधाबाई कमलेच्या पायावर लोळण घेते.]

**राधा०**—बाईसाहेब, मी तुमच्या दुःखाला कारण झालें ! मला क्षमा करा. मींच तुमच्याविरुद्ध सर्व गारुड उभारलं होतं ! नानासाहेब खरोखर शुद्ध आहेत ! मला क्षमा करा !

**कम०**—( तिला सांवरून धरून ) क्षमा ! पूर्ण क्षमा ! नारायणा ! यांना क्षमा कर !

---

**समाप्त.**